९० चरित्र १३००/१५५





म. ग्रं. सं. ठाणें
चरित्र
क्र. १३००
REFBK-0008913
REFBK-0008913

# ी एकनाथ दर्शन

( एकनाथ चरित्र )

: लेखक :
दादासाहेब धनेश्वर
उपासक मंडळ, अहमदनगर

( मूल्य : ३ रुपये )

चरि ७

अनुक्रम २८६५४
विभाग चरित्र
क्रमांक ८७५
नों. दि. १८/१२/६०

# श्री एकनाथ दर्शन

## (श्री एकनाथ चरित्र)

= लेखक =

**श्री त्र्यंबक गंगाधर ऊर्फ दादासाहेब धनेश्वर,**

अध्यक्ष, वाङ्मय उपासक मंडळ, अहमदनगर

REFBK-0008913

REFBK-0008913

उषा प्रकाशन

मुद्रक–
शरद कृष्णाजी सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस
१६२, मोरबाग रोड, मुंबई १४.

प्रथमावृत्ति : १९६०

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मूल्य ३ रुपये

प्रकाशक–
दत्तात्रेय राजाराम सामंत
बी. ए., एस्. टी. सी., बी. टी.
उषा प्रकाशन
१६२, मोरबाग रोड, मुंबई १४.

# निवेदन

श्री ज्ञानेश्वर दर्शन या सर्वमान्य ग्रंथाचें प्रकाशन झाल्यानंतर श्री एकनाथ दर्शन प्रकाशित करण्याच्या हेतुनें नगर वाङ्मयोपासक मंडळानें लेख मिळविण्याचें कामास आरंभ केला. बरेचसे लेख मिळाल्यानंतर पैठणच्या श्री एकनाथ महाराजांच्या भक्तानीं श्री एकनाथदर्शन प्रसिद्ध करण्याचें कार्य स्वतःकडे घेतलें; त्यावेळेस आमचेकडे आलले लेख त्यांच्या स्वाधीन करण्यांत आले. दर्शनाकरितां श्री एकनाथ चरित्र मी लिहून तयार केलें होतें; परंतु त्याचा समावेश दर्शनांत केला असता तर दर्शनग्रंथ नियोजित आकारापेक्षां मोठा झाला असता. नाथांचें चरित्र सर्व महाराष्ट्राला आदर्शभूत असल्यामुळें व त्यांच्या ग्रंथांची मांडणी प्रासादिक व वाचकाला तल्लीन करून सोडणारी असल्याकारणानें नाथांच्या सर्व ग्रंथांचे दोन तीन वेळ अभ्यासपूर्वक पद्धतीनें पारायण केल्यानंतर हें प्रकाशित होणारें चरित्र लिहिण्याचें भक्तिपूर्वक धाडस केलें आहे. हें चरित्रपुस्तक ज्या महाराष्ट्रावर नाथांचें अलोट प्रेम होतें त्याला प्रिय होईल अशी ग्रंथलेखकाला पूर्ण आशा आहे. ही आशा गुरुमाऊली ज्ञानोबा पूर्ण करो अशी प्रार्थना करून हें अल्पनिवेदन संपवितों.

— त्र्यंबक गंगाधर धनेश्वर

## — आमची उपयुक्त प्रकाशनें —

विद्यार्थी - विद्यार्थिनीस व फुरसुतीचे वेळीं घरीं कलात्मक वस्तू
तयार करणाऱ्या हौशी व उत्साही स्त्रीपुरुषांस अत्यंत उपयुक्त

### शालेय पुठ्ठाकाम

लेखक : **श्री. गो. खांडेकर**

**पृष्ठें १८५** मुबलक आकृत्या **मूल्य रु. २-४**

~~~~~~

मराठी मातृभाषा असलेल्या प्रत्येक आबालवृद्धानें संग्रहीं
ठेवण्यास अत्यंत आवश्यक असें

### मानवाचा विकास

मूळ लेखक : **मिनू मसानी**
अनुवादक : **श्री. वा. रा. पाटणकर**

**पृष्ठें ११२** चित्रें ५६ **मूल्य १-१२**

~~~~~~

अत्यंत सोप्या भाषेंत लिहिलेला **शिवणकलेचा एकमेव स्वयंशिक्षक**

### आदर्श शिवणकला

लेखिका : **सौ. अन्नपूर्णाबाई वैद्य**

**पृष्ठें १७६** आकृत्या सुमारे २५० **मूल्य रु. ३**

पुस्तक विक्रेत्यांस व वाचनालयांस योग्य कमिशन दिलें जाईल.

**— उषा प्रकाशन —**

**१६२, मोरबाग रोड, मुंबई १४**



: लेखक :

**त्र्यं. गं. उर्फ दादासाहेब धनेश्वर**

अध्यक्ष, वाङ्मय उपासक मंडळ, अहमदनगर



गुरुआज्ञेनें नाथांचें योगसाधन

# श्रीएकनाथदर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ८०७३
शाखा

## श्री संत एकनाथ

**संपूर्ण जगदेव नन्दनवनं सर्वेपि कल्पद्रुमाः**
**गाङ्गं वारि समस्तवारिनिवहाः पुण्याः समस्ताः क्रियाः।**
**वाचः प्राकृतसंस्कृताः श्रुतिशिरो वाराणसी मेदिनी**
**सर्वावस्थितिरस्य वस्तुविषया दृष्टे परब्रह्मणि ॥**

— श्रीमच्छंकराचार्य.

ज्याला परब्रह्मसाक्षात्कार झाला आहे त्याला संपूर्ण जगत् नंदनवन आहे, सर्व वृक्ष कल्पतरू आहेत, सगळें जळ गंगाजळ आहे, त्याच्या सगळ्या क्रिया सत्क्रिया असतात, त्याची वाणी संस्कृत असो वा प्राकृत असो — तींत ज्ञानप्रधान वेदांचें सार असतें; तो जेथें जाईल तेथें त्याची वाराणसी आणि तो सर्व अवस्थांत परमात्ममय झालेला असतो. श्रीशंकराचार्यांनीं हे उद्गार परमश्रेष्ठ संताला अनुलक्षून काढले आहेत. अनादिकालापासून आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर अनेक थोर सत्पुरुष होऊन गेले. त्यांनीं जगरहाटी निर्माण केली, तिला वेळोवेळीं योग्य वळण लावलें, ती टिकविली आणि समाजाला अभ्युदय आणि श्रेयस् संपादन करण्याच्या सन्मार्गाला लावून मानवसमाजाचें स्थैर्य आणि उन्नति अढळ केली.

मनुष्यजीवन हा खरोखर अमोल लाभ आहे. त्या जीवनाचा सदुपयोग करणें यांतच मनुष्याचें खरें हित आहे. त्याकरितां मनुष्यानें नेहमीं सावधान असलें पाहिजे. परमेश्वरभक्ति करणें, संतांची शिकवण आज्ञा मानून वागणें, यांतच जीवितसाफल्य आहे. त्यामुळेंच संसारांत

तुम्हांला आनंद वाटेल, संसारयातना नष्ट होतील, चित्ताला शांति मिळेल, कृतार्थ व्हाल आणि भगवंताची कृपा तुम्हांला लाभेल असें संतवचन आहे. संत आणि भागवत एक. जो प्राणिमात्राचें हित करतो, ज्याच्या मनांत रागद्वेष नाहीं, जो जितेंद्रिय, निष्काम आणि शांत असतो, जो मनानें, वाणीनें आणि शरिरानें दुसऱ्याला यत्किंचितहि पीडा करीत नाहीं, जो निःस्वार्थी असतो, मातापित्यांची सेवा करतो, परनिंदा टाळतो, जो सर्व प्राण्यांच्या हिताविषयीं तत्पर असतो, जो समदर्शी, सत्यवादी असतो त्याला भागवतोत्तम म्हणतात, असें थोडक्यांत सांगतां येईल,

**शान्ता महान्तो निवसन्ति सन्तो । वसंतवल्लोकहितं चरन्तः ।**
**तीर्णाः स्वयं भीमभवार्णवं जनानहेतुनान्यानपि तारयन्तः ॥**

वसंतऋतु ज्याप्रमाणें स्वतःचा स्वार्थ बिलकुल न साधतां केवळ परोपकारबुद्धीनें परहित साधण्यांत तत्पर असतो, त्याप्रमाणें शांतचित्त, उदार, स्वतः जीवन्मुक्त, निःस्वार्थ बुद्धीनें इतरांना भवसागरांतून पार नेणारे संत जगांत वास्तव्य करतात, म्हणून जिज्ञासूंनीं त्यांचा आश्रय करून आपल्या कल्याणाचा मार्ग जाणून घ्यावा, असें विवेकचूडामणींत म्हटलें आहे.

म्हणून संतांची संगति धरावी. ती दुर्घट असली तरी एकदां लाधल्यावर कधीं व्यर्थ जाणार नाहीं. कारण ' आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळवेळ मग त्यांसी. ' श्रीमद्भागवत एकादश स्कंधाच्या २६ व्या अध्यायाच्या ३२ व्या श्लोकांत

**निमज्ज्योन्मज्जतां घोरे भवाब्धौ परमायनम् ।**
**सन्तो ब्रह्मविदः शान्ता नौर्दृढेवाप्सु मज्जताम् ॥**

म्हटलें आहे कीं पाण्याच्या प्रवाहांत गटांगळ्या खाणाऱ्यांसाठीं बळकट नौकेप्रमाणें भयानक भवसागरांत बुडणाऱ्या संसारी जनांसाठीं ब्रह्मविद् शांतचित्त संत तारक नौका आहेत.

शीतल चंदन झाला म्हणुन काय उगाळून प्यावा।
सोन्याची सुरी झाली म्हणुन काय उरींच खोवारी।
संकल्प नाशी तो संन्याशी। तेथें तों कल्पना कायसी।
नित्यनैमित्तिक कर्मे आचरावीं। तींही ते पावावी चित्तशुद्धि।
येउनि नरदेहीं वायां जाय। नेणें संतसंग कांहीं उपाय।
ज्यांसी नाहीं संतसंग। ते अभंग दुःख भोगिती।
संतसंगतीनें झालें माझें काज। अंतरीं तें निज प्रगटलें।
कीर्तनीं आवडी जया नरा देखा। चुकतील खेपा जन्म कोटी।
कीर्तनश्रेष्ठ कलियुगीं सेवा। तरले पातकी ते देवा।
योगी शिणती साधनीं। पवन होती ते कीर्तनीं।
कीर्तनीं स्वधर्म वाढे। कीर्तनीं जोडे चित्तशुद्धि।
हेंचि कलिमाजीं साधन। आवडी कीर्तन हरीचें।
म्हणोनि एका काकुलती। कीर्तन करा दिनरातीं।
संसारा आलिया जा रे पंढरपुरा। पांडुरंग सोयरा पहा आधीं।
दक्षिणद्वारका पंढरी। शोभतसे भीमातीरीं।
महाक्षेत्र पंढरपुर। नांदे विठ्ठल साचार।
उदंड तीर्थें पृथ्वीचिया ठायीं। ऐसा महिमा नाहीं कोणें जाणीं।
बहुता काळींचें हें क्षेत्र। सकाळ देवांचें माहेर।
सकळ संतांचें निजमंदिर। पंढरपूर॥
देवासी तो पुरे एक प्रेमभाव। पूजा अर्चा वाव सर्व जाणा।
हरिभक्तीचें सुख जे नर नेणती। त्यांसि भक्तिपदप्राप्ति केंवि होय।
सर्वभूतीं भगवद्भाव। तंव तो भावाचि झाला देव।
एका जनार्दनीं नैराश्य तो धन्य। ज्यासी नारायण सांभाळितु।
जो जो धरसील भाव, तें तें देईल देव। ये अर्थीं संदेह मानूं नको।
पोटासाठीं लागे नीचाचियां पायां। करीना भलीया नमस्कार।
सज्जनांचा धर्म सर्वांभूतीं दया। भेदाभेद तयां न कळे कांहीं।
संतांचा तो धर्म अंतरीं ती शांति। एकाजनार्दनीं वस्ती सर्वांठायीं।

तुम्हांला आनंद वाटेल, संसारयातना नष्ट होतील, चित्ताला शांति मिळेल, कृतार्थ व्हाल आणि भगवंताची कृपा तुम्हांला लाभेल असें संतवचन आहे. संत आणि भागवत एक. जो प्राणिमात्राचें हित करतो, ज्याच्या मनांत रागद्वेष नाहीं, जो जितेंद्रिय, निष्काम आणि शांत असतो, जो मनानें, वाणीनें आणि शरिरानें दुसऱ्याला यत्किंचितहि पीडा करीत नाहीं, जो निःस्वार्थी असतो, मातापित्यांची सेवा करतो, परनिंदा टाळतो, जो सर्व प्राण्यांच्या हिताविषयीं तत्पर असतो, जो समदर्शी, सत्यवादी असतो त्याला भागवतोत्तम म्हणतात, असें थोडक्यांत सांगतां येईल,

**शान्ता महान्तो निवसन्ति सन्तो । वसंतवल्लोकहितं चरन्तः ।**
**तीर्णाः स्वयं भीमभवार्णवं जनानहेतुनान्यानपि तारयन्तः ॥**

वसंतऋतु ज्याप्रमाणें स्वतःचा स्वार्थ बिलकुल न साधतां केवळ परोपकारबुद्धीनें परहित साधण्यांत तत्पर असतो, त्याप्रमाणें शांतचित्त, उदार, स्वतः जीवन्मुक्त, निःस्वार्थ बुद्धीनें इतरांना भवसागरांतून पार नेणारे संत जगांत वास्तव्य करतात, म्हणून जिज्ञासूंनीं त्यांचा आश्रय करून आपल्या कल्याणाचा मार्ग जाणून घ्यावा, असें विवेकचूडामणींत म्हटलें आहे.

म्हणून संतांची संगति धरावी. ती दुर्घट असली तरी एकदां लाधल्यावर कधीं व्यर्थ जाणार नाहीं. कारण ‘ आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळवेळ मग त्यांसी. ’ श्रीमद्भागवत एकादश स्कंधाच्या २६ व्या अध्यायाच्या ३२ व्या श्लोकांत

**निमज्ज्योन्मज्जतां घोरे भवाब्धौ परमायनम् ।**
**सन्तो ब्रह्मविदः शान्ता नौर्दृढेवाप्सु मज्जताम् ॥**

म्हटलें आहे कीं पाण्याच्या प्रवाहांत गटांगळ्या खाणाऱ्यांसाठीं बळकट नौकेप्रमाणें भयानक भवसागरांत बुडणाऱ्या संसारी जनांसाठीं ब्रह्मविद् शांतचित्त संत तारक नौका आहेत.

महाभारतांत संतमहिमा फार सुंदर रीतीनें वर्णन केला आहे.

त्रीण्येव तु सतामाहुः सन्तः पदमनुत्तमम् ।
न चैव द्रुह्याद्दद्यात्सत्यं चैव सदा वदेत् ॥
सर्वत्र हि दयावन्तः सन्तः करुणवेदिनः ।
गच्छन्सतीव संतुष्टा धर्म्यं पन्थानमुत्तमम् ॥
सौहृदात्सर्वभूतानां विश्वासो नाम जायते ।
तथा सत्सु विशेषेण विश्वासं कुरुते जनः ॥
आर्यजुष्टमिदं वृत्तमिति विज्ञाय शाश्वतम् ।
संतः परार्थं कुर्वाणा नावेक्षन्ते प्रतिक्रियाम् ॥
गतिरात्मवतां सन्तः सन्त एव सतां गतिः ।
असतां च गतिः सन्तो न चासन्तः सतां गतिः ॥
विद्यामदो धनमदस्तृतीयोऽभिजनो मदः ।
मदा एतेऽवलिप्तानामेत एव सतां दमाः ॥
दुराचारा दुर्विचेष्टा दुष्प्रज्ञाः प्रियसाहसाः ।
असन्तस्त्विति विख्याताः सन्तश्चाचारलक्षणाः ॥

कोणाचाहि द्रोह न करणें, दान करणें व सत्य बोलणें या तीन लक्षणांमुळें संतांना उत्तम पदवी प्राप्त होते. संत सर्वत्र दयावंत, करुणेनें ज्ञानदाते, संतोषी आणि उत्तम धर्माचरण करणारे असतात. प्राणि-मात्रावर निःस्वार्थ प्रेम ठेवल्यानें विश्वास उत्पन्न होतो. संतांचें सर्वांवर निःस्वार्थी प्रेम असतें. यास्तव बुद्धिमान माणूस संतांवर विशेष विश्वास ठेवतो. विश्वासानें अंतर्ज्ञान फार लवकर होतें. परोपकार करणें हा संतांचा शाश्वत परंपरागत धर्म समजून ते परोपकाररत असतात. संत हे संयमी जनांचें आश्रयस्थान होत. संत सज्जनांचे आधार, संत दुर्जनांचेहि आधार—कारण सदुपदेशानें त्यांना ते सन्मार्गाला लावतात; परंतु असन्त—दुष्टजन— हे संतांची गति नाहीं. विद्यामद, धनमद, थोर कुळांत जन्मल्याचा मद, अशा तीन प्रकारच्या मदांनीं दुष्ट गर्वानें ताठर बनतात. परंतु विद्या, धन आणि थोर कुळांत जन्म यांच्या प्राप्तीनें संत मदोन्मत्त

होण्याऐवजीं दमयुक्त होतात. मद सोडून दम स्वीकारतात हें त्यांचें वैशिष्ट्य होय. व्यवहारांतलें उदाहरण द्यावयाचें झाल्यास ज्याप्रमाणें विष जरी असलें तरी तें सद्वैद्याच्या हातांत शोधनक्रियेनें प्राणरक्षक औषध बनतें. संतांच्या उलट लक्षणें ज्याच्या ठिकाणीं आढळतात त्याला असंत म्हणावें असें महाभारत सांगतें. संत पदवी फार उच्च प्रतीची असल्यामुळें सत्संगति हें आत्मोद्धाराचें—

**सतां संगतिरेवात्र साधनं प्रथमं स्मृतम् ।**

असें श्रेष्ठ साधन असल्याचें श्रीरामानें अध्यात्मरामायणांत शबरीला सांगितलें. सत्संगतीनें ज्ञानप्राप्तीचा अलभ्य लाभ होतो. ' न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ' असें भगवद्वचन आहे. पवित्र हा शब्द ध्यानांत वागवणें अवश्य आहे. ' पवेः—वज्रात् संसाररूपात् त्रायते—इति पवित्रम् । ' संसाररूपी तथा अज्ञानरूपी वज्रापासून रक्षण करतें तें पवित्र. इतकें ज्ञानाचें महत्त्व भगवंतांनीं प्रतिपादन केलें आहे. तें ज्ञान संतांकडून मिळतें.

संतकृपेनें ब्रह्मविद्येचा उदय होतो. ' तृणां अन्तस्तमोहारी साधुरेव न भास्करः ' असें गर्गसंहिता सांगते. अर्थात् बाह्य अंधःकाराचा नाश सूर्य निःसंदेह करूं शकतो, परंतु मनुष्याच्या आंतरिक अंधःकाराचा नाश फक्त संत करूं शकतात. सूर्याकडून तें होत नाहीं. संत शब्दाच्या व्युत्पत्तीकडे थोडेंसें लक्ष पोंचवूं. ' सनति सम्भवति लोकाननुगृह्णति—' सन्त लोकांवर अनुग्रह करणारा असतो. ब्रह्मानंदसंपन्न व्यक्ति, असाहि त्याचा अर्थ करतात. ' सनोति प्रार्थितं फलं प्रयच्छति '—फलदाता तो संत. ऋग्वेदांत फलदात्यांमध्यें अग्निदेवाला श्रेष्ठ म्हटलें आहे. तो गृहपतिसंबंधी रूपानें युक्त असतो, ऋतुदेवाबरोबर यज्ञाचा निर्वाहक आहे, देवकृपेची आकांक्षा बाळगणाऱ्या यजमानासाठीं यज्ञाची निर्विघ्नता संपादन करतो. अग्नीला लावलेला ' सन्त्य ' शब्द भाषेंत संत या रूपांत प्रचारांत आला.

**सद्भावे साधुभावे च सदित्येतत् प्रयुज्यते ।**

विद्यमान वस्तु तसेंच श्रेष्ठ वस्तु यांचा बोध व्हावा म्हणून सत् शब्दाची योजना आहे. ब्रह्मकल्पित सर्व विश्वांत ब्रह्मसत्तेचें अधिष्ठान आहे. म्हणून गीतेनें सांगितलेल्या ब्रह्मत्रयींत सत् शब्दाची गणना केली आहे.

**ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।**

यांत सत् शब्दाचा प्रयोग आला आहे. सत् शब्दाचें अनेकवचन सन्तः. संत या शब्दाचा अर्थ कसाहि लावला तरी त्याचा अर्थ सत्पुरुष असा होतो. संतांत दोन प्रकार आहेत. प्रवृत्तिमार्गी आणि निवृत्तिमार्गी. प्रवृत्तिमार्गी हा कर्मयोगी संत. निवृत्तिमार्गी हा ज्ञानी संत. कर्मयोगी संताचें, ऋग्वेदांत ऋभु नांवाच्या संताचें उदाहरण दिलें आहे. त्यानें कर्मानुष्ठानाच्या अलौकिक सामर्थ्यानें देवपण प्राप्त करून घेतलें. आत्मोन्नतिप्रासादाच्या अत्युच्च शिखरावर पोहोंचण्यास कर्मयोग हा प्रशंसनीय सोपान आहे याचें ढळढळीत उदाहरण पाहणें असल्यास ऋभु नांवाच्या संताच्या चरित्राचें अवलोकन करावें. इतरांप्रमाणें ऋभु हा मनुष्यच होता. परंतु कर्मयोगाच्या प्रभावानें त्याची देवांत गणना झाली. इतकी कीं, इंद्रादि देवांच्या पंक्तींत त्याला स्थान मिळालें.

या चरित्रांत आपल्याला प्रवृत्तिमार्गी अर्थात् कर्मयोगी संताचा परिचय करून घ्यावयाचा असल्यामुळें निवृत्तिमार्गी संताचीं लक्षणें निवेदन करण्याचें विशेष प्रयोजन नाहीं. संतांच्या जीवनांत आठ गुणांचा विकास होतो असें गौतमस्मृति सांगते. ते आठ गुण—

**दया— परे वा बन्धुवर्गे वा मित्रे द्वेष्टरि वा सदा ।**
**आपन्ने रक्षितव्यं तु दयैषा परिकीर्तिता ॥**

आपला असो कीं दुसरा असो, बंधु अथवा मित्र अथवा शत्रु असो, तो विपन्नावस्थेंत असला तर त्याची आपत्ति, त्याचें दुःख, दूर करण्याची हार्दिक इच्छा याचें नांव दया.

**क्षमा—बाह्ये चाध्यात्मिके चैव दुःखे चोत्पादिते क्वचित् ।**
**न कुप्यति न वा हन्ति सा क्षमा परिकीर्तिता ॥**

शारीरिक अगर मानसिक पीडा कोणत्याहि मार्गानें झाली तरी क्रोध उत्पन्न न होणें किंवा मारण्याची भावना न होणें याचें नांव क्षमा.

**अनसूया—न गुणान् गुणिनो हन्ति स्तौति मन्दगुणानपि ।**
**नान्यदोषेषु रमते सानसूया प्रकीर्तिता ॥**

गुणीजनांच्या सद्गुणांचा अपलाप न करणें, अल्पगुणी असतील त्यांचीहि प्रशंसा करून त्यांना प्रोत्साहन देणें आणि दुसऱ्याचे दोष दाखविण्यांत आनंद न मानणें याचें नांव अनसूया.

**शौचम्—अभक्ष्यपरिहारश्च संसर्गश्चापि निर्गुणैः ।**
**स्वधर्मे च व्यवस्थानं शौचमेतत्प्रकीर्तितम् ॥**

अभक्ष्य वस्तूचा परित्याग, दुर्गुणरहित अशा प्राण्यांच्या बरोबर संसर्ग आणि स्वधर्माच्या ठायीं दृढभाव आणि आचरण हें शौच.

**अनायास—शरीरं पीड्यते येन सुशुभेनापि कर्मणा ।**
**अत्यन्तं तन्न कर्तव्यमनायासः स उच्यते ॥**

श्रेष्ठ कर्म कां होईना, पण तें करण्यानें शरिराला जीवापाड कष्ट होत असले तर तें करणें उचित नाहीं. त्याविरहित जें होऊं शकतें त्याला अनायास कर्म हें नामाभिधान दिलें जातें.

**मङ्गल—प्रशस्ताचरणं नित्यमप्रशस्तविसर्जनम् ।**
**एतद्धि मङ्गलं प्रोक्तं मुनिभिस्तत्त्वदर्शिभिः ॥**

सदैव प्रशस्त तथा शुभ आचरण—कर्म—करणें आणि अप्रशस्त न करणें याला तत्त्वदर्शी मुनींनीं मंगल हें नांव दिलें आहे.

**अकार्पण्य—स्तोकादपि प्रदातव्यमदीनेनान्तरात्मना ।**
**अहन्यहनि यत्किंचिदकार्पण्यं हि तत्स्मृतम् ॥**

लहानलहान वस्तूंच्या योगानें अंतरात्मा प्रसन्न ठेवून दररोज कांहीं अल्पस्वल्प दान करणें अवश्य आहे, अशा प्रकारची वृत्ति धारण करणें याला अकार्पण्य म्हणतात.

**अस्पृहा—यथालाभेन संतोषः कर्तव्यो ह्यर्थवस्तुना ।**
**परस्याचिन्तयित्वार्थं सास्पृहा परिकीर्तिता ॥**

लाभ होईल त्यांत संतोष मानून दुसऱ्याच्या अर्थाची, वैभवाची इच्छा न करणें म्हणजे अस्पृहा होय.

एवंगुणविशिष्ट सत्पुरुष असतो. याच्या उलट अशुभ प्रवृत्तीचें वर्णन असें केलें आहे कीं,

**परद्रव्येष्वभिध्यानं मनसानिष्टचिंतनम् ।**
**वितथाभिनिवेशश्च त्रिविधं कर्म मानसम् ॥**
**पारुष्यमनृतं चैव पैशुन्यं चापि सर्वशः ।**
**असंबद्धप्रलापश्च वाङ्मयं स्याच्चतुर्विधम् ॥**
**अदत्तानामुपादानं हिंसा चैवाविधानतः ।**
**परदारोपसेवा च शारीरं त्रिविधं स्मृतम् ॥**
**त्रिविधं च शरीरेण वाचा चैव चतुर्विधम् ।**
**मनसा त्रिविधं कर्म दशाधर्मपथांस्त्यजेत् ॥**

अर्थ सोपा आणि उघड आहे. भल्या माणसानें वर नमूद केलेल्या दहा दोषांचा त्याग करावा.

या मार्गानें सतत जाणाऱ्या कर्मयोगी सत्पुरुषाच्या तोंडून अखेर पुढील धन्योद्गार निघाल्याशिवाय रहाणार नाहींत.

**धन्योऽहं धन्योऽहं दुःखं सांसारिकं न वीक्षेऽद्य**
**धन्योऽहं धन्योऽहं स्वस्याज्ञानं पलायितं क्वापि ॥**
**धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।**
**धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य सम्पन्नम् ॥**

( पंचदशी – तृप्ति – श्लोक ९३·९४ )

संतांविषयीं नाथांनीं उद्गार काढिले ते—

**संतांच्या विभूति । धर्मालागीं अवतरती ॥**
**धर्मरक्षणाकारणें । साधु होताती अवतीर्ण ॥**
**जगा लावावें सत्पथीं । हेचि साधूची पैं कृती ॥**

अशा थोर कोटींतील सत्पुरुषांमध्यें प्रामुख्यानें देदीप्यमान असणाऱ्या साधुश्रेष्ठांच्या जीवनाचें निरूपण, सबंध ग्रंथांतील आवश्यक असा भाग म्हणून करण्याचा प्रयत्न करीत आहें.

## श्रीसंत एकनाथ

**पावन तें कुळ। पवित्र तो देश। जेथें हरीचे दास जन्म घेती ॥**
**स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम्।**
**पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिहीं लोकीं झेंडा ॥**

महाराष्ट्रधर्माचा प्रसार प्रभावी पद्धतीनें व 'बोले तैसा चाले' या मार्गानें करणारे महाराष्ट्रांत नऊशें वर्षांपासून अनेक संत होऊन गेले. त्या सर्वांत श्रेष्ठ स्थान श्रीज्ञानदेवाला मिळालें आहे हें यथायोग्य आहे. त्यानंतर कालानुरोधानें महाराष्ट्रभूमीला पावन करणारें एक नररत्न सोळाव्या शतकांत दक्षिण हिंदुस्थानच्या वाराणसींत जन्मास आलें. त्या रत्नाला एकनाथ हें नामाभिधान प्राप्त झालें. एकनाथनिरूपणांत श्री ज्ञानेश्वरदर्शनाप्रमाणें चरित्रविषयक स्वतंत्र लेखाची उणीव राहूं द्यावयाची नाहीं असें निश्चित केल्यामुळें हा चरित्रात्मक प्रबंध लिहिण्यांत येत आहे.

आधुनिक पद्धतीनें एकनाथचरित्रें आजवर सहस्रबुद्धे, पांगारकर, आजगांवकर आणि ॲबट यांनीं लिहिलेलीं प्रसिद्ध आहेत. ह्याशिवाय प्रा. फाटक यांचें श्री एकनाथवाङ्मय आणि कार्य व पैठणचे नाथ हें एक छोटेंसें पुस्तक पैठणच्या एकनाथ मंडळानें प्रसिद्ध केलें आहे. जुन्या पद्धतीनें संतांचीं चरित्रें कथन करण्याचें कार्य तारहाबादकर महिपतिबावानें अठराव्या शतकांत केलें आहे. महिपतीचे संतचरित्रात्मक असे भक्तविजय आणि भक्तलीलामृत हे दोन ओवीबद्ध ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. मुक्तेश्वरानेंहि एक ८७ ओव्यांचें लहानसें चरित्रात्मक प्रकरण लिहिलें आहे. शिवाय भाव्यांचें महाराष्ट्रसारस्वत आणि पांगारकरांचें एकनाथखंड या पुस्तकांत श्री एकनाथ महाराजांची पुष्कळ माहिती आहे. सुप्रसिद्ध

दासगणूंनीं एकनाथचरित्रावर कीर्तनास अनुरूप अशीं आख्यानें रचिलीं आहेत. न्यायमूर्ति रानड्यांचीं धर्मपर व्याख्यानें व मराठी सत्तेचा उत्कर्ष हा इंग्रजी ग्रंथ यांतही माहिती आहे. याशिवाय उद्धवचिद्घन, रंगनाथ, शिवरामस्वामी, रामवल्लभदास, सिद्धचैतन्य, मुकुंद, जयरामसुत, उद्धवसुत, खंडेराय, श्रीधर, देवदास, एकेश्वरावधूत, अमृतराय, आत्माराम रामदासी आणि मोरोपंत यांनीं नाथांचें वर्णन केलें आहे. श्री एकनाथ चरित्रासंबंधानें एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, त्यांना एक ओंवीबद्ध चरित्र लिहिणारा भाविक भक्त चरित्रकार लाभला आहे. या चरित्रलेखकाचें नांव केशव. त्यानें एकनाथी भागवत जसें एकतीस अध्यायांचें आहे तसे आपण लिहिलेल्या चरित्रांत एकतीस अध्याय घातले असून चरित्रलेखनाचें कार्य शके १७१४ परिधाविनाम संवत्सरे उत्तरायणे माघ शु. १३ इंदुवासरे क्षेत्र पंचवटी श्रीसीतारामचरण सन्निधानें संपूर्ण केलें आहे. मुख्यतः याच चरित्राच्या आधारानें श्रीएकनाथचरित्र आम्ही थोडक्यांत सादर करणार आहोंत. तथापि वर उल्लेखिलेल्या सर्व पुस्तकांचें या कामीं साहाय्य झालेलें आहे हें नमूद केलें पाहिजे.

उत्तर हिंदुस्थानांतील काशीक्षेत्राप्रमाणें पैठण ऊर्फ प्रतिष्ठान हें प्राचीन काळापासून दक्षिणेंतील विद्यापीठ आणि धर्मपीठ मानण्यांत येत होतें. विद्यापीठाबद्दलचा त्याचा लौकिक हल्लीं राहिलेला नाहीं. श्रीएकनाथमहाराज आणि त्यांचेनंतर श्रीशिवदिननाथ केसरी हे दोन सत्पुरुष तेथें होऊन गेल्यामुळें त्यांच्या कीर्तीनें या क्षेत्राची प्रसिद्धि कायम राहिली आहे. पैठणांत जन्म घेऊन या सत्पुरुषांनीं त्या क्षेत्राचें पवित्रपण वाढविलें आहे.

एकनाथांचे पणजे भानुदास परम भागवत होते. ते आश्वलायनसूत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होते. भानुदासांच्या काळीं पैठण क्षेत्रांत चारी वेद, षड्शास्त्रें, पुराणें इत्यादींचें शास्त्रोक्त पद्धतीनें यथासांग अध्ययन

होत असे. धर्मपीठ या नात्यानें पैठण क्षेत्राचा अधिकार एकनाथ महाराजांच्यापूर्वीं निदान तीनशें वर्षें अगोदर महाराष्ट्रांत मानला जात असे, हें ज्ञानेश्वरादि चार भावंडें पैठणच्या ब्रह्मवृंदाकडून शुद्धिपत्र मिळविण्याकरितां मुद्दाम पैठणास गेलीं होतीं यावरून सिद्ध होतें. अशा या पैठणचे भानुदास सुविख्यात रहिवासी होते. आधुनिक काळांत दानशूरत्वाबद्दल कर्णासारख्या नांवाजलेल्या उदारात्म्या दामाजीपंताचे ते समकालीन होते.

स्वतः एकनाथमहाराजांनीं एकनाथी भागवताच्या पहिल्या अध्यायांत भानुदास महाराजांबद्दल फार पूज्य बुद्धीनें आणि आदरानें पुढील उद्‌गार काढले आहेत—

**वंदूं भानुदास आतां । जो का पितामहाचा पिता ॥**
**जेयाचेनि वंश भगवंता । जाला सर्वथा प्रियकर ॥**
**जेणें बाळपणीं आकळिला भानु । स्वयें जाहला चिद्भानु ॥**
**जिंतोनि मानाभिमानु । भगवत्पावनु स्वयें जाला ॥**
**जयाची पद्‌बंधप्राप्ति । पाहों आली श्रीविठ्ठलमूर्ति ॥**
**कानीं कुंडलें जगज्जोति । करितां रातीं देखिला ॥**
**तया भानुदासाचा चक्रपाणी । तयाचाही सुत सुलक्षणी ॥**
**तया सूर्य नाम ठेवुनी । निजीं निज होऊनि भानुदास ठेला ॥**
**तया सूर्यप्रभाप्रतापकिरणीं । मातें प्रसविली रुक्मिणी ॥**
**म्हणोनि रखुमाई जननी । आम्हां लागुनि साचचि ॥**
**हे ग्रंथारंभकाळा । वंदिली पूर्वजमाळा ॥**
**धन्य निजभाग्याची लीळा । आलों वैष्णवकुळा जन्मोनी ॥**

भानुदासाचा काळ शके १४३६ हा होय. ज्ञानेश्वरांच्या समकालीन संतमालिकेंत महिपतीनें भानुदासाला गोंवलें आहे. तो भानुदास एकनाथाचा पणजा असणें संभवनीय आहे असें मानतां येत नाहीं अडीच शतकांचें अंतर एकदम तोडतां येणें अशक्य आहे. तेव्हां

भानुदासाचा समकालीन ज्ञानदेव तेराव्या शतकांतील ज्ञानदेवांहून वेगळा असावा !

पैठणांत एक सूर्योपासक ब्राह्मण राहात असे. त्याला भानुदास नांवाचा मुलगा झाला. लहानपणापासून तो विरक्त असे. इतर अल्पवयी मुलांप्रमाणें त्याचें खेळण्याकडे लक्ष नसे. एकदां हा मुलगा रुसून एका देवळाच्या गाभाऱ्यांत जाऊन बसला. देवाचें ध्यान करीत राहिला. देवाची पूजाअर्चा करण्याकरितां तेथें येणाऱ्या ब्राह्मणाला त्या बालमूर्तीची, त्याच्या वयाच्या मानानें असाधारण अशी वृत्ति पाहून कौतुक वाटलें. तो त्याला प्रतिदिनीं पिण्यास दूध आणून देऊं लागला, व तुझें कल्याण होईल असा त्याला आशीर्वाद दिला. त्याचे आईबाप एकसारखे त्याच्या शोधांत होते. सात दिवसांनंतर भानुदास अकस्मात् देवळाच्या बाहेर आलेला एका ब्राह्मणाच्या दृष्टीस पडला. त्यानें हांक मारतांच तो देवळांत पळून गेला. ब्राह्मणानें त्याच्या पित्याला हा वृत्तांत सांगितला. आईबापांना हर्ष वाटला. मुलगा होता त्या ठिकाणीं ते गेले. तें जुनें ओसाड सूर्यनारायणाचें देऊळ होतें. अशा ठिकाणीं सूर्यनारायणानेंच आपल्या अपत्याचें रक्षण केलें, ईश्वरानेंच याचे प्राण वांचविले म्हणून याला आतां कठीण वचन बोलूं नये असा विचार करून त्याला घरीं घेऊन गेले. पुढें कांहीं काळ लोटल्यावर—

> **आयुष्य सरोनि गेलियावरी । मायबापें निर्वतलीं ते अवसरीं ।**
> **परि भानुदास निर्भय अंतरीं । प्रपंच व्यवहारीं गुंतेना ॥**
> **न करी कोणाचें उपार्जन । उदीम व्यवसाय देणें घेणें ।**
> **न करी कदा राजसेवन । पांडुरंगभजन करीतसे ॥**

अशा स्थितींत प्रपंच चालावा कसा ? घरांत बायको आणि मुलें. त्यांच्या अन्नवस्त्राची काय सोय ? कांतेचें मन हळहळे. तेव्हां चारचौघे गृहस्थ मिळून भानुदासाला म्हणाले : आजवर तुमचे वडील होते, तोंवर संसारांत लक्ष घातलें नाहीं तें ठीक झालें. पण आतां कुटुंब-

पोषणाचें कर्तव्य तुम्हांस केलें पाहिजे. आम्ही तुम्हांला भांडवल देतों. कापड घेऊन व्यापार करा. नफ्यावर प्रपंच चालवा आणि मुद्दल जतन करा. व्यापारांत खोटें बोलूनच नफा मिळविला पाहिजे अशी शिकवण त्याच्या व्यवसायबंधूंनीं त्यास दिली. परंतु 'भानुदासाचें धैर्य मोठें। प्रपंच व्यवहारीं न बोले खोटें। सकळ लोकांसी नवल वाटे। देखोनि निकटें तयासी।' खोट्याच्या पसाऱ्यांत खरें नाणें दृष्टीस पडल्यावर कां नवल नाहीं वाटणार? कापडाची किंमत अमूक, त्यावर नफा इतका, असें एकच वचन तो गिऱ्हाइकाला सांगे. पटलें तर खुषीनें घेणें, नाहीं तर दुसरें दुकान पहाणें असें नम्र वचन बोलून नामस्मरण करीत राही. भानुदासाच्या सत्यव्रतामुळें गिऱ्हाईक त्याच्याकडे लोटे. दुकानदारी भरभराट पावली. इतर व्यापाऱ्यांचें अर्थात् पोट दुखूं लागलें आणि ते तळमळूं लागले. एकदां बाजार ओसरल्यावर सर्व व्यापाऱ्यांसमवेत भानुदासानें आपलें बिऱ्हाड देवळांत लावलें. त्या दिवशीं एकादशी होती. रात्रीं गांवांत हरिदासाची कथा होती. भानुदास आपल्या व्यवसायबंधूंना म्हणाला, 'तुम्हांला कथेला येणें नसेल तर माझें दुकान सांभाळा.' अगोदरच मत्सरग्रस्त, तशांत तोंडसुख घेण्याची त्यांना ही संधि मिळाल्यावर त्यांनीं भानुदासावर यथेच्छ भडिमार केला. खोट्यावर जगणाऱ्यांना खऱ्याचा ऊर्जितकाळ सहन होत नाहीं. प्रत्यक्ष सख्ख्या भावांत असूया, मत्सरग्रस्त स्पर्धा असल्याचीं कांहीं उदाहरणें दृष्टीस पडतात; मग हे तर बोलूनचालून प्रतिस्पर्धी व्यापारी! भानुदासाचा पांडुरंगचरणीं पूर्ण भाव असल्यामुळें तो बिऱ्हाड तेथेंच ठेवून गेला. तो गेल्यावर बाकीच्यांनीं कपटव्यूह रचून त्याचें घोडें सोडून दिलें आणि त्याचें कापडाचें दिंड खड्ड्यांत फेकून दिलें! कथेहून परत आल्यानंतर भानुदासानें विचारल्यावर, आम्हांला झोंप लागली होती, चोरांचें हें कर्म असावें, असें सांगण्याचें त्यांनीं ठरविलें. पण देव ज्याच्या बऱ्यावर, त्याचें कोण वांकडें करणार? मोकळें घोडें पाहून एक ब्राह्मण

तें धरून बसला. धन्याला पाहून हिंसायची घोड्याला संवय असते. भानुदासाला पाहून घोडें हिंसलें. ब्राह्मणानें तें त्याच्या स्वाधीन केलें आणि निघून गेला. दुसऱ्याचें अनहित करणारे जसे कांहीं दुर्जन असतात, तसेच उपयोगी पडणारे कांहीं सज्जन पण सांपडतात. सज्जनाच्या ठिकाणीं सत्त्वगुणाचा अंश अधिक असतो. तो सत्क्रिया स्वाभाविकपणें घडवितो. अशा बारीकसारीक प्रसंगांत सुद्धां भाविक जन ईश्वराला भक्ताच्या साहाय्याला कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें खेंचून आणतात आणि साधुसंतांचीं चरित्रें चमत्कारमय करून सोडतात! वास्तविक जे सत्त्वगुणप्रधान असतात त्यांच्या हातून नेहमीं सत्क्रियाच घडत असते. भानुदासाला जवळच दिंडहि सांपडलें. खरी हकीकत कळल्यावर भानुदासानें वैराग्यानें सर्व वस्त्रें वांटून टाकलीं. शेषायुष्य

**आषाढिकार्तिकी येतां बरी । चालवी पंढरीची वारी ।**
**टाळमृदुंग घोषगजरीं । कीर्तन करी वाळवंटीं ॥**

अशा तन्मय झालेल्या परमभक्तांना त्यांचे अनुयायी कशाचीहि वाण पडूं देत नाहींत असा अनुभव हल्लींसुद्धां येतो तर भानुदासाचा योगक्षेम सहज चालावा, यांत नवल कसलें?

भानुदासाच्या चरित्रांतील आणखी एक महत्त्वाची गोष्ट निवेदन करणें आवश्यक आहे. पंढरीक्षेत्राचें वर्णन एका ब्राह्मणाच्या मुखानें ऐकल्यावर विद्यानगरचा राजा पंढरीस आला. तेथील माहात्म्य पाहून पंढरीची विठ्ठलमूर्ति आपल्या राजधानीस घेऊन जाण्याची त्यास इच्छा झाली. राजाचीच इच्छा ती. तिच्या आड कोण येणार? ‘मनीं वसे तें स्वप्नीं दिसे’ या न्यायानें राजाला साक्षात्कार झाला कीं, ‘मी तुझ्या राजधानीस येण्यास तयार आहें पण मला ब्राह्मणांनीं सोंवळ्यांत तेथें नेलें पाहिजे.’ हा साक्षात्कार रामराजानें शब्दशः पाळला आणि देवाला ब्राह्मणांकरवीं सोंवळ्यानें नेलें! विद्यानगरास देव आले म्हणून जयजयकार झाला. मोठा उत्सव केला राजानें.

इकडे पंढरीस आषाढी यात्रेच्या समयीं देव ठिकाणावर नाहीं म्हणून कोण हाहाःकार उडाला! यात्रेला जमलेल्या संतमंडळींत नानाविध चर्चा सुरू झाली. देवाला परत स्वगृहीं आणावें कसें हाच सर्वांच्या बोलण्याचा विषय झाला. मी जाऊन देवाला घेऊन येतों असा कोणाच्या तोंडून उच्चार होईना. अखेर

**त्यांत भानुदास वैष्णवभक्त। प्रतिज्ञा करून काय बोलत।**
**मी घेऊन येतों रुक्मिणीकांत। नाहीं तरी जीवित न ठेवीं॥**

अशी प्रतिज्ञा करून भानुदास सत्वरगतीनें विद्यानगरास रात्रीच्या समयाला येऊन पोहोंचला. चौकशी केल्यावर त्याला असें समजलें कीं, राजा विठ्ठलमूर्तीची पूजा मंदिरांत एकांतीं करतो. राजाशिवाय इतरांना मूर्तीचें दर्शन होत नाहीं. राजा पूजा करून गेल्यावर कपाटें कुलपें घालून द्वारपाळ रक्षण करतात. अर्धरात्रीं भानुदास त्या मंदिराशीं गेला. कुलपें गळून गेलीं. भानुदासानें आंत प्रवेश करून साष्टांग नमस्कार घातले, अनन्यभावानें प्रार्थना केली आणि पंढरपुरीं परत येण्याविषयीं परोपरीनें आळविलें. रुक्मिणीकांतानें प्रसन्न होऊन आपल्या गळ्यांतला नवरत्नांचा हार काढून भानुदासाच्या गळ्यांत घातला आणि आतां राजा दर्शनास येईल तर तूं आपल्या बिऱ्हाडास जा, म्हणून सांगितलें. पुन्हां कवाडाला कुलपें बसलीं. नित्याप्रमाणें प्रातःकाळीं राजा आला. काकडआरती करूं लागला, तों कंठीं रत्नहार दिसला नाहीं. राजा पुजाऱ्यावर क्रोधावला. सर्वत्र झाडा घेण्यास सुरुवात झाली. शोध करीत असतां गंगातीरावर भानुदास नामस्मरण करीत बसले आहेत व त्यांच्या गळ्यांत रत्नहार आहे असें राजदूतांनीं पाहिलें. त्याला धरून राजाकडे चालविला. मार्गानें चाललेली त्याची धिंडका पाहून हा कसला साधु, निव्वळ भोंदू दिसतो, असें म्हणून लोक हंसूं लागले. राजाला वार्ता कळवितांच चोराला सत्वर सुळावर घालण्याची शिक्षा सांगितली! माझें मरण तर ओढवलें आहेच पण मला शेवटचें पांडुरंगाचें दर्शन घडवा अशी विनंती ऐकून दूतांनीं राजाज्ञेनें

भानुदासास दर्शन घडविलें. त्यावेळीं भानुदासानें सद्गदित अंतःकरणानें व साश्रु नयनांनीं देवाचा धांवा केला. शेवटीं निर्वाणीचे शब्द उच्चारले :

**परि शतसहस्र जन्माअंतीं । तुज मी न सोडीं रुक्मिणीपति ।**
**ऐसें बोलोनि मागुती । नमन प्रीतीं घातलें ॥**

त्यावर दूत त्याला म्हणाले, आतां बाबा, झडकरी ऊठ. चोरी केली नसतीस तर अशी परी कशाला झाली असती? त्याला बाहेर काढून त्याच्या खांद्यावर सूळ देऊन चालविलें. हा प्रकार पहाण्यास असंख्य नरनारींचा समुदाय जमला. सूळ रोंवल्यावर त्यावर भानुदासाला घालण्याच्या वेळीं—

**भानुदास देवातें विनंती करी ॥**
**म्हणे आकाश कडकडोनी पडो मजवरी । तरी तुज अंतरीं आठवीन ॥**
**सप्तसमुद्र समरस जालिया । तरी तुज न सोडीं देवराया ।**
**तुजवरूनि नाशवंत काया । ओंवाळुनियां सांडिली ॥**
**लया जाईल सकल क्षिति । आणि पंचभूतेंहि प्रळया पावती ॥**
**तें तुजवांचुनि रुक्मिणीपति । आणिक सांगाती असेना ॥**
**वडवानळ खाईल त्रिभुवन । तैं तूं माझा जिवलग प्राण ॥**

असे निर्वाणीचे निष्ठावंत सहजोद्गार काढले आणि जगज्जीवनाच्या चरणीं सहजसमाधी लागली. भानुदासाचा निश्चय पाहून जगज्जीवन पावलें. अत्युद्भुत नवल वर्तलें. भक्तकल्पद्रुम धांवला. अनन्यशरणागताचें संरक्षण केलें. रोंवलेल्या शूळाला अकस्मात् पल्लव फुटले. त्याला बहुत फुलेंफळें आलीं. तत्क्षणीं राजाला वार्ता कळविण्यांत आली कीं तस्कर वैष्णवभक्त असून त्याला पंढरीनाथ पावला. राजाला थोर आश्चर्य वाटलें. राजाला अनुताप झाला नि तो भानुदासाला शरण गेला. रामराजानें मूर्ति भानुदासाच्या स्वाधीन केली. तो तिच्यासह पंढरीस आला. भानुदास अजून कसा येत नाहीं म्हणून गरुडपारावर वैष्णवभक्त चिंताक्रांत बसले होते. इतक्यांत त्यांना स्मितवदन भानुदास येतांना दिसला. हरिनामाच्या जयघोषांत आणि वाद्यांच्या निनादांत ते भानुदासाला मूर्तीसह घेऊन आले.

या कथेंत घडलेल्या गोष्टीला कथानक सांगणाराकडून दैवी चमत्काराचें स्वरूप आलें आहे. त्यामुळें रामराजा जरी परमभक्त असला तरी सहज क्रोधाविष्ट होऊन अविचारानें संतांचा छळ करण्यास प्रवृत्त होणारा होता असें मानावें लागतें. पांडुरंगाच्या गळ्यांतील हार भक्तांना प्रसाद म्हणून देण्याची अद्याप वहिवाट आहे. आपल्या गळ्यांतला नवरत्नांचा हार भक्ताच्या गळ्यांत घालून त्याला दारुण संकटांत पाडण्याचें काय कारण? भक्त भक्ताचें अंतर जाणतो. भानुदासाची परमनिर्मळ भक्ति जाणून राजानें आपण होऊन त्याला मूर्ति परत करून सर्व संतमंडळास तुष्ट केलें नसेल कशावरून? भानुदासाची दृढ आणि निस्सीम भक्ति अवलोकन करून भक्त राजानें भागवतोत्तम भानुदासास संतुष्ट केलें हें यथायोग्यच झालें असें याविषयीं तर्कदृष्टया स्पष्टीकरण करितां येण्यासारखें आहे. बाकी समर्थ भक्तकैवारी दयाघनाला काय शक्य नाहीं? भानुदासाविषयीं समस्त माहिती उपलब्ध नाहीं. उपलब्ध असलेली तेवढी आजपर्यंतच्या ग्रंथकारांनीं प्रसिद्ध केली आहे. श्रीएकनाथाच्या गाथेंत त्यांचे थोडेसे अभंग दिले आहेत. त्यावरून ते थोर ज्ञानी आणि प्रेमळ भक्त असल्याची साक्ष पटते. सर्वच अभंग चांगले आहेत. निवडानिवड करण्यानें कमीअधिक मोल ठरविणें वेडेपणाचें होईल.

'संसाराचें जाळें पडतसे गुंती। करितां कुंथाकुंथी निघेचिना॥' अशा स्थितींत 'माझा तो भरंवसा तुझे नामीं आहे। येणें कार्य होय आमुचें देवा।' 'सर्वांभूतीं रामा तूंतेंचि देखे।' 'तुझेनि प्रसादें सदा संतोषें।' 'कल्पनेच्या मागें धांवसी कल्पका।' 'न पवसी सुखा बुडसी वायां।' 'भानुदास म्हणे सर्व हें सोडोनी। एक चक्रपाणी सखा करी।' असे अढळ श्रद्धेचे उद्गार अभंगांत विखुरले आहेत.

अशा या पुण्यशील, सत्त्वशील, भक्तिमान भागवतोत्तमाच्या पावनशील कुळांत नाथांचा जन्म झाला. भानुदासाचा पुत्र चक्रपाणी हाहि भगवद्भक्त होता. त्याचा पुत्र सूर्यनारायण आणि त्याचा मुलगा एकनाथ.



नाथांची कर्तव्यनिष्ठा



श्रीदत्त-दर्शन व प्रसाद ग्रहण

एकनाथ जन्मल्यावर थोड्याच दिवसांत त्याचे आईबाप निवर्तले. त्याबद्दल स्वतः एकनाथानें पुढील उद्गार काढले आहेत—

**मुळीच्या मुळीं एका जन्मला। मायबापें थोर धाक घेतला॥**
**कैसें मूळनक्षत्र आलें कपाळा। स्वयें लागलों दोहींच्या निर्मूळा॥**
**शांति करितां अवघ्याची शांति। मुळीं लागोनियां लाविली ख्याति॥**
**एकाजनार्दनीं मुळींच्या गोठी। मायसकट सगळा बापाचि घोंटी॥**

एकनाथाचा जन्मकाळ नक्की सांगतां येत नाहीं. त्याच्या आजोबानें त्याची पत्रिका केली असेलच. कारण हें बालक मूळनक्षत्रावर जन्मल्याचें एरवीं समजणार कसें? पण आमच्या लोकांत कागदपत्र संभाळून ठेवण्याची आस्था क्वचितच दृष्टोत्पत्तीस येते. नाथांचा चरित्रकार केशव यानेंहि जन्मशक दिलेला नाहीं. तरी स्थूलमानानें तो शके १४५०* च्या सुमारास असावा. कारण दौलताबादेवर आलेलें परचक्र त्यानें निवारण केल्याची हकीकत त्याच्या चरित्रांत आहे. ही स्वारी १५४२ म्हणजे शके १४६४ त झाली. त्यावेळीं नाथ पंधरा वर्षांचा असावा. मालकाच्या ऐवजीं सेनेचें आधिपत्य घेऊन शत्रूला पिटाळून लावण्याची कामगिरी त्यानें बजावली असल्याचा संभव आहे.† एका चरित्रांत नाथांचा जन्मशक १४७० दिला आहे, तो विश्वसनीय वाटत नाहीं. पांगारकर शके १४५५ हा एकनाथाचा जन्मशक देतात.

एकनाथाचे आईबाप लहानपणींच दुर्दैवानें निवर्तल्यामुळें त्याचें पालन-पोषण त्याच्या वृद्ध आजाआजीनें फार ममतेनें व आस्थेनें केलें. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात अशी म्हण आहे. बाळपणास रुचणारे असे खेळ खेळण्यांत न रंगणाऱ्या एकनाथाची ओढ ज्ञानप्राप्तीकडे असल्याचें दिसून आलें. तो कुशाग्रबुद्धि मुलगा होता. भागवतकुलांत जन्मास आल्यानें हरिभक्तीचा आनुवंशिक संस्कार घेऊनच तो आला होता.

* आजगांवकरांना हा शक मान्य आहे.

† सहस्रबुद्धे कृत.

'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते' असें भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांत एकेचाळिसाव्या श्लोकांत भगवंतांनीं म्हटलें आहे. त्यावर ज्ञानदेवाचें व्याख्यान फार सुंदर आहे.

**आइकें कवतिक होये कैसें । जें शतमखां लोक सायासें ।**
**तें तो पावे अनायासें । कैवल्यकामु ॥**
**मय तेथिंचे जे अमोघ । अलौकिक भोग ।**
**भोगितांहि सांग । कवतिक पुरे ॥**
**हा अंतरावो अवचिता । कां वोडवला भगवंता ।**
**दिवि-भोग भोगितां । अनुतापि नित्य ॥**
**पाठीं जन्मे संसारिं । परि सकळ धर्मांचा माहेरिं ।**
**लांबा उगवे आगरिं । विभवश्रियेचा ॥**
**जेयांतें नीतिपंथें चालिजे । सत्यधूत बोलिजे ।**
**देखावें तें देखिजे । शास्त्रदिठि ॥**
**वेदु तो जागेश्वरु । जेया व्यवसावो निजु आचारु ।**
**सारासार विचारु । मंत्रु जेयातें ॥**
**जेयाचा कुळिं चिंता । जालि ईश्वराचि कांता ।**
**जेयातें गृहदेवता । आदिरिद्धि ॥**
**ऐसि निजपुण्याचिया जोडि । वाढिनलि सर्वसुखांचि कुळवाडि ।**
**तियें जन्मे तो सुखाडिं । योगच्युतु ॥**

ज्ञानदेवांनीं म्हटल्याप्रमाणें सकळधर्मांच्या माहेरांत एकनाथाचा जन्म झाल्यामुळें पुराणश्रवणाची गोडी त्यास जात्याच लहानपणीं जडली. भक्तीच्या अंकुराचें हें लक्षण होतें, हें सांगणें नको. वयोमानानें तो भक्तीचा अंकुर जोरानें वाढीस लागला. नाथाची ग्रहणशक्ति पाहून आठव्या वर्षाचे ऐवजीं सहाव्या वर्षींच मौंजीबंधन करून त्याच्या पुढील

अध्ययनाचा मार्ग मोकळा करण्यांत आला. एकनाथानें संस्कृत अध्ययन केलें. त्याची जिज्ञासा दांडगी होती. शंकेचें समाधान झाल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. त्याची ही वृत्ति अवलोकन करून हा मुलगा पुढें थोर आणि नामांकित पुरुष होऊन मोठी कीर्ति संपादन करील असें भविष्य त्याच्या अध्यापकानें वर्तविलें व तें खरें झालें. अल्पवयांतच हा बुद्धिवान मुलगा ज्ञानसंपन्न झाला.

**तैशि दशेचि वाहन पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ॥**
**बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें ।**
**मनचि सारस्वतें दुभे । मग सकळशास्त्रें स्वयंभें । निघति मुखें ॥**

हे उद्गार एकनाथाला लागू पडतात. ज्यांनीं ते उद्गार काढले त्या ज्ञानेश्वराला तर ते सर्वांशीं लागू होते. त्यापेक्षांहि प्राचीन उदाहरण घ्यावयाचें झाल्यास श्रीमज्जद्गुरु आद्य शंकराचार्य यांचें ठळकपणें देतां येईल. निरनिराळ्या देशांत आणि प्रांतांत असे अलौकिक बुद्धिमान् पुरुष होऊन गेल्याचें इतिहासांत नमूद आहे. पूर्वसंस्कारामुळेंच हें घडत असलें पाहिजे, यांत संदेह नाहीं.

## श्री संत जनार्दनस्वामी

**ॐ नमो श्रीजनार्दना । नाहीं भवअभव भावना ।**
**न देखोनि मीतूंपणा । नमन श्रीचरणा सद्‌गुरुराया ॥**

श्रीएकनाथ महाराजांचा सुविख्यात ग्रंथ नाथ भागवत. त्यांतील ही पहिली ओंवी. तींत नाथांनीं आपल्या सद्‌गुरूला नमन केलें आहे. ज्ञानदेवांनीं आपले सद्‌गुरु निवृत्तिनाथ यांचीं भक्तिरसपूर्ण अशीं स्तुतिस्तोत्रें ज्ञानेश्वरींत गायिलीं आहेत आणि गुरूच्या चरणीं असलेली अढळ श्रद्धा व्यक्त केली आहे. या गोष्टींत नाथांनीं ज्ञानदेवाचें अनुकरण केलें आहे. नाथांचे गुरु जनार्दनस्वामी होते. त्यांचा वृत्तान्त उपलब्ध माहितीच्या आधारानें येथें देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

जनार्दनस्वामींचें मूळ ठिकाण पूर्व खानदेशांतील चाळीसगांव. हें तालुक्याचें गांव. तेथील देशपांडे घराण्यांत त्यांचा जन्म झाला. हें देशपांडे घराणें यजुःशाखी असून जनार्दनस्वामींचे गोत्रज अद्याप तेथें देशपांडे गल्लींत नांदत आहेत. पांगारकर आणि आजगांवकर आपापल्या चरित्रांत म्हणतात कीं, जनार्दनस्वामी हे ऋग्वेदी आश्वलायनसूत्री देशस्थ ब्राह्मण होते. पण ते यजुर्वेदी होते हें 'श्री संत जनार्दनस्वामी चरित्र' या पुस्तकांत विष्णु बाळकृष्ण जोशी, कन्नडकर यांनीं प्रतिपादन केलें आहे. जिज्ञासूंनीं तें पुस्तक अवश्य वाचावें.

जनार्दनस्वामींचा जन्म शके १४२६ फाल्गुन कृष्ण ६ ला झाला. ते आपल्या कर्तृत्वशक्तीनें मुसलमानी राज्यांत मोठ्या अधिकाराच्या जागेवर चढले. ते मोठे शूर, करारी, मुत्सद्दी, तेजस्वी पुरुष असून निस्सीम दत्तभक्त होते. त्यामुळें त्यांची ख्याति सर्वत्र झाली. ते विद्याव्यासंगी होते. ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांचें ते नेमानें वाचन आणि मनन करीत. त्यांचें वास्तव्य देवगड ऊर्फ दौलताबाद किल्ल्यावर होतें. मोठा अधिकारी असून सत्पुरुष म्हणून त्यांची कीर्ति दूरवर पसरली होती.

वयोमानानें एकनाथाचा जसजसा अधिकाधिक बुद्धिविकास होत चालला तसतशी बुद्धीची तृष्णा शमविणारा कोणीतरी सद्गुरु भेटावा अशी इच्छा त्यांच्या ठिकाणीं बळावत चालली. याविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, एकदां एकनाथ एका देवळांत जाऊन सत्पुरुषाची भेट व्हावी म्हणून देवाची प्रार्थना करीत असतां आकाशवाणी झाली कीं, देवगिरीस जनार्दनस्वामी नामेंकरून एक महान् साधु आहेत, त्यांना प्रत्यक्ष दत्तात्रय महाराजांपासून अनुग्रह झाला आहे. त्याला तूं शरण जा आणि गुरु कर म्हणजे तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. आकाशवाणी आणि आंतला आवाज एकच!

केवळ भक्तिरसपोषणार्थ ही आख्यायिका योजलेली दिसते. पैठण प्रांतांत त्यावेळीं जनार्दन स्वामींची कीर्ति सर्वत्र पसरली होती ही गोष्ट

अगदीं निर्विवाद आहे. एकनाथाच्या कानावर ती वारंवार पडली असली पाहिजे. गुरु भेटावा असा निदिध्यास लागल्यावर एके दिवशीं दौलताबादेस जाण्याची व स्वामींची भेट घेण्याची त्यास साहजिक स्फूर्ति झाली. आपण आपल्या आजाआजीचें एकमेव प्रेमाचें स्थान असल्याची नाथांस पूर्ण जाणीव असली पाहिजे. तेव्हां ते आपल्याला कोठें जाऊं देणार नाहींत या खात्रीनें त्यानें मनाचा निश्चय केला असावा. म्हणूनच आजाआजीस न विचारतां, एकनाथ उल्हसित मनानें पायीं प्रवास करीत जनार्दनस्वामींच्या द्वारीं येऊन पोहोंचला. त्याची चित्ताकर्षक मूर्ति आणि उत्कंठा अवलोकन करून द्वारपाळासहि कौतुक वाटलें. कोणी मुलगा भेटूं इच्छीत आहे असें कळल्यावर स्वामी बाहेर येऊन त्या बालमूर्तीला पहातांच अनुकूल ग्रह होऊन ' जनार्दनें उचलुनी मुलाला । आलिंगिलें पूर्ण सुखें निवाला. ' ' नाथासही हर्ष अपार झाला । स्वानंदबोधें हृदयीं निवाला । ' ' पाहुनि आदर विशेष गुरुकृपेचा । वंदोनि पाय विनवी अति नम्रवाचा । सेवेंत राहूं निरंतर पादसेवा । प्राप्ति घडे मज गुरु वर हाचि द्यावा ॥ ' असा एकनिष्ठ सेवक भेटल्यावर कोणत्या गुरूला संतोष वाटणार नाहीं ? नंतर मग जनार्दन स्वामींजवळ एकनाथ गुरुसेवेकरितां राहिला.

गुरुसेवा अनन्यभावानें करण्याच्या इच्छेनें एकनाथ सेवेंत सदैव तत्परतेनें राहिला. कधींहि कसल्याहि कामाचा त्याला कंटाळा आला नाहीं. उलट सेवेंत अधिकाधिक उल्हास आणि भक्ति वाढूं लागली. माझ्या सद्गुरूला जरी अनेक सेवक असले तरी मीच एकट्यानें सर्वस्वी सेवा करावी अशी वृत्ति बनून तिचें प्रतिबिंब आचरणांत उमटूं लागलें. गुरूची सेवा करण्यांत सच्छिष्याची वृत्ति कशी असते याचें ज्ञानदेवांनीं अतिशय सुंदर चित्र काढलें आहे. गुरूला विनंति करून भांडारगृहाचे हिशेब ठेवण्याचें काम नाथानें आपल्याकडे घेतलें. बिनचूक हिशेब ठेवण्याची विशेष खबरदारी एकनाथ घेत असे. असें असूनहि एकदां एका अधेल्याची चूक लागली! ती शोधावी

म्हणून नाथ रात्रीं देवघरांत नंदादीपाजवळ डोळ्यांत तेल घालून शोधीत बसला. गुरूच्या अधेल्या दमडीचासुद्धां चोख हिशेब असावा हा मनाचा दृढनिश्चय. चूक शोधून काढल्यावर सद्गुरु नाथाजवळ आले, कृपाहस्तानें त्याचें मुख कुरवाळलें. शिष्याची एकाग्रता अनुभवून आतां हा तत्त्वबोधास पात्र झाला आहे असें स्वामींनीं ठरविलें.

स्नानसंध्या नित्यनेमानें करणें, स्वधर्माच्या आवडीनें सिद्धराजा श्रीज्ञानदेव यांचे ज्ञानेश्वरी आणि अनुभवामृत ग्रंथ पठण करणें, यांत मध्यान्हपर्यंतचा काळ घालवून भोजनोत्तर राजदर्शनार्थ जाऊन तेथील न्यायनीति वगैरेंचें कामकाज पहाणें असा जनार्दनपंतांचा नित्यक्रम असे. त्याचा संग्राहक बुद्धीच्या एकनाथावर सुपरिणाम झाल्याविना राहिला नाहीं. असा जीवनक्रम चालला असतां कोणे एके दिवशीं शत्रूची स्वारी राजधानीनजीक आल्याचें वर्तमान जनार्दनपंतांकडे आलें. त्यावेळीं पंत स्नानसंध्येंत मग्न झाले होते.

दौलताबाद अहमदनगरच्या राजाच्या ताब्यांत होतें. अहमदनगरास त्यावेळीं बुऱ्हाण निजामशहा राज्य करीत होता. जनार्दनपंत किल्लेदार होते. नगरच्या राजाचें आणि विजापूरच्या राजाचें नेहमीं युद्ध चालू असे. दोन्ही राजे मुसलमान. एकदां विजापूरचा राजा व त्याचा वजीर या उभयतांमध्यें वांकडें आलें. ही संधि साधून बुऱ्हाणनें बेदरच्या राजाची कुमक घेऊन विजापुरावर स्वारी करण्याचा बेत केला. विजापूरकरानेंहि वऱ्हाडच्या राजाची मदत मागितली. या भानगडींत वर नमूद केलेला हल्ला दौलताबादेवर झाला. गुरूच्या नित्यकर्मांत व्यत्यय येऊं नये म्हणून पंतांचा लष्करी पेहेराव घालून—चरित्रकार म्हणतात जनार्दनस्वामींचें रूप धारण करून—, एकनाथ राजाकडे गेले. राजानें परचक्र आल्याचें सांगितल्यावर, ‘महाराज, आपल्या बळावर शत्रूचा पराभव करून येतों—’ असें आश्वासन देऊन स्वारी निघाली. पंतांच्या सहवासांत इतर शिक्षणाबरोबर

लष्करी शिक्षणहि नाथांस मिळालें असलें पाहिजे. गुरुकृपा आणि दृढ आत्मविश्वास यांच्या जोरावर नाथ सैन्यासह चाल करून गेले आणि शत्रुसैन्याची दाणादाण उडवून दिली. शत्रु शरण आला. परचक्र आल्याचें व तें नाथानें निवारण केल्याचें वर्णन नाथाचे सर्व चरित्रकार देतात. निश्चित ऐतिहासिक पुराव्याच्या अभावीं मोघम माहितीवर विसंबणें भाग आहे. नाथाच्या हातून स्वामीकार्य यशस्वीपणें पार पडलें. स्वामींना या सर्व प्रकाराची कांहीं माहिती नव्हती. नाथांनींहि परत आल्यावर त्यांच्या कानीं घातली नाहीं. पंत नित्याप्रमाणें दरबारांत गेले तेव्हां बादशहानें त्यांस आदरपूर्वक सन्निध बसविलें व त्यांस म्हटलें, ' आज आपण आमच्यावरचें संकट टाळलें. आपण मोठा पराक्रम केला. ' इतर दरबारी लोकांनीं बादशहाच्या म्हणण्यास दुजोरा दिला. अर्थात् बादशहानें पंतांचा मोठा गौरव केला. हा सर्व प्रकार पाहून पंतांस आश्चर्य वाटलें. ते मनांत म्हणूं लागले, मी तर ध्यानस्थ बसलों होतों. तेवढ्या अवकाशांत शत्रुहल्ला आला आणि त्याचें निवारणहि झालें आणि तें माझ्या हातून झालें असें सर्वजण म्हणत आहेत, आणि मला धन्यवाद देत आहेत. हें काय गूढ आहे? एकनाथानेंच हें सर्व केलें असावें असें लागलेंच त्यांच्या मनांत आलें. पण त्यांनीं कोणापाशीं बोलून दाखविलें नाहीं. स्वगृहीं आल्यावर नाथाला जवळ बोलावून प्रेमानें शाबासकी दिली. नाथाला प्रेमानें आलिंगन दिलें. ' हृदया हृदय एक होतां । प्रेम नावेरे उभयतां । येरयेराची परिपूर्णता । काय मी आतां वदावी ॥ ' असें चरित्रलेखक केशव म्हणतो. या ओवीचें ज्ञानेश्वरींतील ओवीशीं सादृश्य आहे. त्यावरून समाजांतील साक्षरवर्गांत ज्ञानेश्वरीपठण होत असलें पाहिजे हें उघड आहे.

दर शुक्रवारीं जनार्दनस्वामींच्या राजगृहाला सुटी असे. स्वामींचे गुरु श्रीदत्तात्रेय होते. स्वामींची आणि दत्तात्रेयाची वारंवार भेट होत असे. आपला शिष्य नाथ हाहि सद्गुरुभेटीला व कृपेला योग्य झाला आहे हें

जाणून त्यांनीं एका शुक्रवारीं नाथाला भेटीला घेऊन जाण्याचें ठरविलें. ‘ जनार्दनपंत त्या वासरीं । अखंडजाती पर्वताशिखरीं । सहस्रलिंग सरोवर परिसरीं । नेम निर्धारीं अवश्यक ॥ ’ देवगिरीच्या उत्तरेस पर्वतमाथ्यावर हें सरोवर होतें. ती जागा रमणीय होती. रोझ्याजवळील पठारावर दोनचार तळीं आहेत. त्यांपैकीं हें एक सरोवर असावें. तें एकान्त आणि विजनस्थान होतें. पुष्पीं फळीं शोभायमान । वृक्ष लागले असती सघन । देखतां विश्रांति पावे मन । न जावें उठून हें वाटे ॥ तये प्रांतिं धुडितां सकळ । ऐसें रमणीय नसेचि स्थळ । स्वच्छ निर्मळ पाहतां जळ । विश्रांति तत्काळ होय जीवा ॥ असें त्या स्थळाचें महिपतीनें वर्णन केलें आहे.

आज आपल्याला अलभ्य लाभ होणार अशा मनाच्या उल्हासानें शिष्य नाथ स्वामींबरोबर पर्वतशिखरावर जावयास निघाला. सहस्रलिंग सरोवराच्या कांठावर गेल्यानंतर पंतांनीं गुरुमूर्तीचें ध्यान केलें. दत्तात्रेय आले आणि दोघांसहि दर्शन झालें.

**‘ पाहावया नाथाची समता । सर्वभूतीं अद्वयता ।**
**शांतदांत निर्विकारता । श्रीगुरुदत्ता अतिप्रीति ॥**
**अभिनव संपादी सोंग । चर्मवेष्टित अंग ।**
**भासे जेवीं फकीर मलंग । हा मायायोग दाखवी ॥**
**कामधेनु श्वानरूपी । सवें असे सपाडसी ।**
**श्रीदत्त निजस्वरूपीं । सहज समाधीं प्रगटला ॥ ’**

असें केशवनें या प्रसंगाचें वर्णन केलें आहे. जनार्दनांनीं चरणीं माथा ठेवून दत्तात्रेयास अभिवादन केलें. नंतर कांहीं वेळ परस्परांचें संभाषण झाल्यावर श्रीदत्त आणि जनार्दनस्वामी यांनीं एका पात्रांत भोजन करण्यास सुरुवात केली. भोजन झाल्यावर दत्तांनीं नाथाला जवळ बोलावलें, आणि तें पात्र धुवून आणण्यास सांगितलें. पात्र धुतांना

त्यांतील जळ गुरुकृपाप्रसादाचें तीर्थ समजून नाथानें प्राशन केलें. मनाला संतोष वाटला. परत आल्यावर नाथ दोन्ही हात जोडून नम्रपणानें श्रीदत्तापुढें उभा राहिला. श्रीदत्त प्रसन्न होऊन नाथाला अभय वर दिला आणि जनार्दनाला बोलला : हा विठ्ठलाचा मूर्तिमंत अवतार आहे. याच्या प्रसादानें बहुत जन भवसिंधु तरून जातील. याच्या वाग्विलासग्रंथांनीं जन भक्तिपंथाला लागतील. त्यांना पुरतें वैराग्यज्ञान होऊन सायुज्यमुक्तीला पावतील. याची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ स्थिर राहील. सुपवित्र कुळांत याचा जन्म झाला असून तें कुळ याच्या जन्मानें धन्य झालें आहे. ही भविष्यवाणी नाथांनीं आपल्या जीवनानें सर्वस्वी सत्य करून दाखविली. चरित्रकारानें नाथांच्या एकंदर जीवनक्रमावरून हें भविष्य श्री दत्ताच्या मुखांतून वदविलें ! बाकी, गुरु दत्तात्रेयाच्या आशीर्वादानुरूप सर्व घडलें हें मात्र खरें.

या भेटीला अद्भुत चमत्काराचें स्वरूप देण्यासाठीं दत्ताला मलंग बनवून त्याच्याबरोबर एक यवन स्त्री आणली आणि तिच्या करवीं कोंबड्या आणि बोकड यांचें मांस शिजवायला लावून अखेरीस हातांत सुरा घेऊन त्या यवनीला ब्राह्मणांच्या, जे हा चमत्कार पाहण्यास जमले होते, अंगावर सुरा घेऊन धांवावयास लावलें आहे. या गोष्टीचें शेवटीं पर्यवसान श्रीदत्त आपल्या मूळ वेषांत आणि रूपांत प्रकट होऊन नाथाला दर्शन देण्यांत झालें आहे. मलंग रूप घेण्याचें व बरोबर यवन स्त्री आणण्याचें श्री दत्ताला प्रयोजन कां पडलें ही शंका उद्भवते. नाथांचें घराणें विठ्ठलोपासक, जनार्दन स्वामी दत्तोपासक. दत्त तेच विठ्ठल आणि विठ्ठल तेच दत्त अशा अभेदबुद्धीनें नाथाची उपासना होती. एकनाथी भागवताच्या मंगलाचरणांत श्रीदत्तमहाराजांचें वर्णन करतांना 'आतां वंदूं दत्तात्रेया। जो कां आचार्यांचा आचार्या। तेणें प्रवर्तविलें ग्रंथकार्या। अर्थवावया निजबोधू॥' पुढें तेविसाव्या अध्यायांतहि 'माझे निजगुरूचाही निजगुरु। श्रीदत्त परम गुरु। तो भिक्षुगीतें साचारु।

योग्या योगेश्वरु तुष्टला ॥ तेणें तोखलेनि अद्‌भुतें । आदरें आश्वासुनि मातें । अभय देऊनि निजहस्तें । पूर्ण ग्रंथार्थें डुल्लतु ॥' असे श्रद्धापूर्वक उद्गार काढले आहेत.

ज्ञानेश्वराप्रमाणेंच नाथांचीहि आपल्या गुरूच्या ठायीं अलोट भक्ति होती. भक्तियुक्त अंतःकरणानें नाथांनीं जनार्दनस्वामींस गुरूचा अनुग्रह झाल्याच्या प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे :—

**गुरुप्राप्तिलागीं सर्वथा । थोर जनार्दनासि चिंता ।**
**विसरला तिन्ही अवस्था । सद्‌गुरु चिंतितां चिंतनीं ॥**
**देवो भावाचा भोक्ता । दृढ जाणोनि अवस्था ।**
**येणें जाले श्रीदत्ता । तेणें हातु माथां ठेविला ॥**
**हातु ठेवितांचि तत्काळ । बोधु आकळिला सकळ ।**
**मिथ्या प्रपंचाचें मूळ । स्वरूप केवळ स्वबोधें ॥**
**कर्म करूनि अकर्ता । तोचि अकर्तात्मबोधु जाला देता ।**
**देहीं असोनि विदेहता । तेंहि तत्त्वता आकळिली ॥**
**गृहाश्रमु न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां ।**
**निज व्यापारीं वर्ततां । बोधु सर्वथा न मैळे ॥**
**तो बोधु आकळितां मना । मन मुकलें मनपणा ।**
**अवस्था नावरेचि जनार्दना । मूर्च्छापन्न पडियेला ॥**
**त्यासी सावध करुनी तत्त्वता । म्हणे प्रेमा राहे सत्त्वावस्था ॥**
**तोही गिळोनि सर्वथा । होयीं वर्ततां निजबोधें ॥**
**पूजाविधि करोनियां । जंव जनार्दनु लागला पायां ।**
**तंव अदृश्य जाला दत्तात्रेया । योगमायेचेनि योगें ॥**

सद्‌गुरुप्राप्तीचा जनार्दनास एकसारखा ध्यास लागल्यावर जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थांत त्यांनीं सद्‌गुरुस्मरण चालविलें. निस्सीम भक्ति पाहून श्रीदत्त प्रकट होऊन जनार्दनाच्या मस्तकावर

वरदहस्त ठेवतांच साक्षात्काराने अकर्तात्मबोध झाला आणि विदेहता प्राप्त झाली. जनार्दनाची उन्मनी अवस्था पाहून श्रीदत्तांनीं बोध केला कीं, 'बाबा, हें सात्त्विक प्रेम आवरून प्रपंचांतच अकर्तात्मबोधानें राहिलें पाहिजे.' म्हणजे निष्काम कर्मयोग किंवा अनासक्तियोग सांगितला. गृहस्थाश्रम न सांडितां किंवा कर्माची योग्य मर्यादा नुल्लंघितां प्रपंच करीत असतांना आत्मानुसंधान न सुटणें व कर्तृत्वाच्या अहंकाराचा वाराहि न लागणें याला अकर्तात्मबोध म्हणतात. हें गूढ तत्त्वज्ञान श्रीदत्तापासून जनार्दनस्वामींस लाभलें आणि तोच बोध त्यांनीं एकनाथांस केला व एकनाथांनीं आपल्या जीवनांत तो पूर्णपणें स्वतःच्या आचरणानें दाखविला. या संबंधानें पांगारकर म्हणतात कीं, श्रीदत्त स्वतः अनाश्रमी असून त्यांनीं शिष्यास आश्रमधर्मानें वागण्याचा उपदेश केला यांत एक वर्म आहे. कलियुगांत अनाश्रमी राहणें दुर्घट आहे म्हणून संसारांत राहून मुक्तीचा सुखसोहाळा भोगावा यांत स्वहित व परहित दोन्ही साधतात असा श्रीदत्तांचा उपदेश आहे. गीता–भागवतांचें हेंच सार आहे. ज्ञानेश्वरांनीं जो महाराष्ट्रधर्म सांगितला त्यांतील मुख्य तत्त्व हेंच आहे. संत नाथांनींहि आपल्या ग्रंथांत रसाळपणानें जनतेस त्याच तत्त्वाचा उपदेश केला.

## सच्छिष्य नाथ

**अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानांजनशलाकया**
**चक्षुरुन्मीलितमेन तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

पूर्णावतार श्रीकृष्ण भगवान् परमात्मा यांनीं दोन सच्छिष्य पारखून त्यांना सदुपदेश केला. तो सर्व मानवजातीला मार्गोपदेशक झाला. पहिला धनुर्धारी अर्जुन. त्याला ज्ञानवैराग्ययुक्त कर्मयोग सांगून कर्तव्यनिष्ठ बनविलें. उद्धवाला भक्तियोग कथन केला. उपदेशग्रहण करायला

शिष्याची तयारी आणि पात्रता लागतात. गुरूहि समर्थ अधिकारी असावा लागतो. ‘ शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ’ अशा लीन वृत्तीचा शिष्य असल्यावर, त्याला ज्ञान सांगितलें तर तें रुजून त्याचा चांगला परिपाक होईल अशी सद्‌गुरूला खात्री पटते व तो ज्ञानोपदेश इतक्या उत्तम प्रकारें करतो कीं, शेवटीं शिष्याचें अज्ञान आणि अहंकार नष्ट होऊन तो अनन्यभावें शरण येऊन ‘ नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा ’ अशी स्पष्ट कबुली देऊन सद्‌गुरुमहाराज, आपल्या आज्ञेनुरूप उपदेशास स्मरून ‘ करिष्ये वचनं तव ’ असें आश्वासन देतो.

भारताच्या इतिहासांत अनेक नामवंत गुरुशिष्य होऊन गेले. सच्छिष्य होऊन त्यांनीं गुरुपदाची महती फार गायिली आहे. गुरु हा साक्षात् परब्रह्मस्वरूप आहे अशी त्यांची दृढश्रद्धा होती. ही भावना दृढ होण्यास शिष्याच्या अंगीं कोणत्या गुणांची आवश्यकता आहे व गुरु कोणत्या गुणांनीं संपन्न असावा लागतो, याचें थोडेंसें विवरण, एकनाथचरित्र कथन करतांना, अनाठायीं होणार नाहीं असें वाटतें. गुरु कसा असावा आणि शिष्याची योग्यता काय असावी याचें ज्ञान नसल्यानें व स्वार्थपरायण कथेकरी व पुराणिकांनीं श्रोत्यांना मोहून टाकण्यासारखें गुरुमहिम्याचें केलेलें वर्णन श्रवण केल्यानें भाविक लोकांत गुरूपदेशाशिवाय मोक्षाचें द्वार खुलें होणें अशक्य या समजुतीचा प्रसार होऊन गुरूलाहि तोटा नाहीं आणि शिष्यांच्या तर झुंडीच्या झुंडी ! पण या मार्गानें जाणारे खरे गुरु नव्हत आणि शिष्यहि पण खरे शिष्य नव्हत ! तें मोक्षसाधनहि नव्हे आणि त्यायोगें मोक्षप्राप्ति होणें नाहीं.

‘ सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म ’ याचें ज्ञान व्हावें अशी खऱ्या शिष्याची ज्ञानपिपासा असते. ती शमविण्याकरितां तो गुरूला शरण जातो. शिष्याच्या मनाची तयारी असली—ज्ञान ग्रहण करण्याची भूमिका निर्माण झालेली असली तर सत्यप्राप्तीला क्षणाचाहि अवसर लागत नाहीं असें प्राचीन तत्त्ववेत्त्या ऋषींनीं म्हटलें आहे. फक्त ज्ञानावबोध व्हावयास पाहिजे.

ज्ञानावबोध झाल्याबरोबर क्षणार्धांत मनावर दडपण घालणारें भ्रमपटल नष्ट होतें. सत्याचें ज्ञान झाल्यावर मिथ्याभास कसा टिकणार ? दोरीच्या ठिकाणीं सर्पाच्या अस्तित्वाचा आरोप करून मन जें गांगरून गेलें होतें तें सर्प नसून केवळ दोरी आहे या ज्ञानानें तत्क्षणीं शांत होतें आणि ज्ञानाचा प्रकाश उदय पावतो. 'तत्त्वमसि' हें जेव्हां कळतें तेव्हां तें कळायला कितीसा वेळ लागतो ? कितीसें कठीण आहे ? परंतु याचें ज्ञान ज्याचें त्याच्याजवळ असून तें समजण्यास, त्याचें आकलन होण्यास आणि ठसण्यास कितीतरी प्रयास पडतात.

आजपर्यंत कितीतरी तत्त्ववेत्त्यांनीं 'सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म' याचें यथार्थ ज्ञान व्हावें म्हणून ऊहापोह केला आहे. पण या बाबतींत सामान्य जनांची स्थिति पाहिली तर ते आहेत तेथेंच आहेत. अज्ञानाच्या मोह-पटलानें ते गुरफटले आहेत. तें जाळें दूर सारून सत्यज्ञान करून घेण्याची त्यांना उत्कंठा मुळींच नाहीं. एखाद्याला उत्कंठा झालीच तर कोणी वास्तववादी तर कोणी कल्पनावादी वगैरे अशा वादांत शिरलेला असतो.

ज्याला गुरूपासून सत्याचें ज्ञान संपादन करावयाचें आहे त्यानें प्रथम वासनात्याग करावयास पाहिजे. ईश्वर सत्य आहे, जग सत्य नाहीं. ऐहिक उपभोगांची वासना जोंपर्यंत मनांत वावरत आहे व क्रिया करवीत आहे तोंवर सत्य दिसणार नाहीं. आम्ही भलभलत्या कल्पनांच्या आहारीं जाऊन सत्याला पार विसरून गेलों आहों. असत्याला सत्य मानूं लागलों. संसारांतील आधीव्याधींनीं त्रस्त झालेला प्राणी चिरंतन सुखाचा लाभ व्हावा अशी इच्छा न धरितां स्वर्गसुखाची हांव बाळगतो. स्वर्गांत तरी अक्षय टिकणारें सुख आहे काय, याचा त्यानें कधीं विचार केला आहे का ? भोगेच्छा प्रबल असल्यानें स्वर्गांत गेल्यावर नानाविध मिष्ट पक्वान्नें आणि मधुररस चाखावयास मिळतील, अनुपम सुंदर अशा अप्सरांचा समागम घडेल आणि त्यांच्या सहवासांत

रममाण होतां येईल, अमृतप्राशन यथेच्छ करतां येईल, अशा प्रकारचीं वेडगळ स्वप्नें स्वर्गकामांना पडत असतात. ज्ञानेश्वर–एकनाथांनीं या भ्रामक समजुतींचा कडक शब्दांनीं निषेधपूर्वक समाचार घेतला आहे. स्वर्गाची ही मोहक आणि भ्रामक कल्पना कोणत्या सुखलोलुप सुपीक डोक्यांतून निघाली असेल ती असो ! धनिकांनीं स्वर्गप्राप्तीसाठीं तरी आपल्या संपत्तीच्या अंशाचा व्यय करावा म्हणून स्वार्थी व धूर्त पुरोहितांनीं यज्ञयाग, व्रतकैवल्यें वगैरे साधनांची योजना केलेली असावी ! सुईच्या नाकांतून उंट जाऊं शकेल पण श्रीमंताला स्वर्गलाभ होणें अशक्य असें म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. स्वतःचें आणि स्वकीयांचें सुख, विलास, धनलाभ, सत्ता या गोष्टींशिवाय अध्यात्माचा विचार करण्यास श्रीमंताला वेळ सांपडतो कुठें ? जगांत वावरतांना जो अध्यात्माकडे ढुंकून पाहाण्यास तयार नव्हता, तो स्वर्गांत गेल्यावर अध्यात्माकडे काय वळणार आहे ? अप्सरांचें नृत्यगायन आणि सुंदर ललनांचा सतत सहवास, मग त्या सुखाला कांहीं पारावार आहे काय, अशा मनोराज्यांत श्रीमंत सदा गुंग असतो. पण हें सर्व निरर्थक आहे, घातक आहे. मला ऐहिक उपभोग नकोत नि स्वर्गीय सुखेंहि मी वांछीत नाहीं. इंद्रियाधीन राहण्याची माझी इच्छा नाहीं. जड शरीर हेंच मी आहें, त्यालाच मी माझें म्हणतों; पण अतःपर 'मी' हें जड शरिराहून भिन्न आहे, तें वासनारहित आहे, अशी वृत्ति बनणें ही शिष्यत्वाच्या पात्रतेची पहिली पायरी आहे. भूत आणि वर्तमान जाणून आणि भविष्यकाळाचा विचार करीत, संपत्ति कशाला म्हणतात, सुख म्हणजे काय हें जाणून, त्यांचा त्याग करून या पायरीवर अधिष्ठित होत्साता तो एकसारखा सत्याचा शोध करीत राहतो असें विवेकानंद म्हणतात.

शिष्यत्वाचा दुसरा आवश्यक गुण म्हणजे शिष्य संयमी असावयास पाहिजे. पंच कर्मेंद्रियें आणि पंच ज्ञानेंद्रियें त्यानें ताब्यांत ठेवलीं पाहिजेत. त्याशिवाय त्याला अध्यात्माचा अधिकार प्राप्त होत नाहीं. मनुष्यप्राणी

दशेंद्रियांच्या आज्ञेंत सदैव जीवित घालवीत असतो. तो त्यांचा दास बनलेला असतो. इंद्रियाधीन होऊन ज्या त्या इंद्रियाच्या विषयाकडे त्याची ओढ असते. इंद्रियाला प्रिय असा एखादा विषय—पदार्थ—संनिध असला तर त्याकडे तें इंद्रिय त्याला खेंचतें. अत्तर लावून अगर गुलाब घेऊन एखादा जवळून चालला तर माणूस लागलीच म्हणतो, ‘ अहाहा! काय हा सुगंध ! ’ नगरपालिकेची खजिन्याची गाडी अंतरावर असली तरी दुर्गंधामुळें नाकाला चटकन पदर लावतो. हें झालें घ्राणेंद्रियाचें. चक्षूंचेंहि तसेंच. जें कांहीं दृष्टीच्या टप्प्यांत येईल त्याकडे नजर गेल्याशिवाय राहात नाहीं. कानांचेंहि तसेंच आहे. त्यांना स्तुति आणि निंदा, सौम्य आणि कठीण, गोड आणि विषारी, मधुर आणि कर्कश, इत्यादि सर्व प्रकार ऐकावे लागतात. स्तुति ऐकण्यास गोड लागते. पण एखादे वेळीं असा प्रसंग ओढवतो कीं, ऐकणाराला इच्छेविरुद्ध कटु शब्दांचा भडिमार सहन करावा लागतो. अशा वेळीं आपण या माणसाला एवढा मोठा भयंकर हल्ला चढविण्यास अवसर कां दिला असा विचार मनांत येऊन तो फार कष्टी होतो. कोणी शापवाणी उच्चारो वा स्तुतिस्तोत्र गावो, कर्णेंद्रियांना आपलें काम करावेंच लागतें. कांहीं माणसें बहिरीं असतात. पण अनुभव असा आहे कीं, त्यांच्याविरुद्ध कांहीं बोललें तर तेवढें त्यांना नेमकें ऐकूं जातें! तेव्हां हीं सर्व इंद्रियें साधक शिष्यानें आपल्या ताब्यांत ठेविलीं पाहिजेत. कोणी वंदोत अगर निंदोत, शिष्यानें आपल्या स्वहितावर दृष्टि ठेवणें अवश्य आहे.

शिष्य होणाराला इंद्रियदमन आणि संयमन फार कठीण जातें. पण त्या चरकांतून धीमेपणानें बाहेर पडून यश संपादन केलें पाहिजे. मन ताब्यांत ठेवलें पाहिजे. ‘ चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथी बलवद्दृढम् ’ असें अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला आणि ‘ तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ’ असा केविलवाणा सूर काढला. सैरावैरा धांवणाऱ्या मनापुढें जीव अगदीं गाय बनतो हा अनुभव कोणास नाहीं ? श्रीकृष्ण अर्जुनाला

म्हणतातः बापा, तूं म्हणतोस तें 'साचचि। बोलत आहासि तें तैसेंचि। यया मनाचा किर चपळचि। स्वभावो गा ॥' असें जरी असलें तरी हताश होण्याचें काय कारण आहे? हें बघ. 'परि वैराग्येंचेनि आधारें। जरि लाविलें अभ्यासाचिये मोहरें। तरि केतुलेनि एक अवसरें। स्थिरावेल ॥' कारण या मनाचें एक लक्षण चांगलें आहे. 'जे हें देखिले गोडिचिया ठाया सोके। म्हणौनि अनुभवसुखचि कवतिकें। दावित जाइजे ॥' एरवीं ज्यांना विरक्ति नाहीं, जे कधींच अभ्यास करीत नाहींत, त्यांना मन आवरत नाहीं हें सर्वस्वी कबूल. पण यमनियमाचा मार्ग जर पत्करला नाहीं, विरक्तीचें कधीं स्मरण केलें नाहीं आणि केवळ विषयजळांतच डुंबत राहिलें व युक्तीचा चिमटा जर मनाला लावला नाहीं तर मन स्थिर कसें होणार? 'म्हणौनि मनाचा निग्रहो होये। ऐसा उपायो जो आहे। तो आरंभि मग नोहे। कैसा पाहों ॥' मनाचा निग्रह करणें हें योगसाधन आहे. तें हस्तगत झालें तर 'आंगीं योगाचें होये बळ। तरि मन केतुलें चपळ।' हें भगवंताच्या वचनाचें सार ज्ञानदेवांनीं उघड करून सांगितलें आहे. यावरून शिष्याला ज्ञान-प्राप्ति करून घेण्यासाठीं आत्मसंयमन ही महत्त्वाची पायरी आहे.

मन स्थिर राहण्यास शिकूं लागलें तरी मधूनमधून उसळी मारून आपल्या अंगच्या मूळच्या चंचलत्वाकडे निसटून जाण्याची संधि एकसारखी पहात असतें. योग्यांचा देखील असा अनुभव आहे कीं, मनाची एकाग्रता करण्याचा प्रयत्न करीत असतां तें वारंवार अन्यत्र भराऱ्या मारीत असतें. म्हणूनच मनाला अनावर म्हणतात. या अनावरपणाचा एकनिष्ठ साधकाला तिटकारा उत्पन्न होतो. ज्या विचारांचा आणि कल्पनांचा मला स्पर्श देखील होऊं नये अशी माझी उत्कटेच्छा असतां हें मन मला छळतें, माझा पिच्छा सोडीत नाहीं, असा त्याला उद्वेग उत्पन्न होऊन तो गुरूपदिष्ट मार्गानें मनावर विजय मिळविल्यावांचून राहात नाहीं. शिष्यत्वाचा प्रमुख गुण मनोजय हा आहे. याशिवाय शिष्याच्या अंगीं सोशिकपणा अवश्य

लागतो. जोंपर्यंत जीवनक्रम सुरळित चालला आहे, तोंपर्यंत मन आनंदांत नि सुखांत मग्न असतें. पण आपत्प्रसंगीं तें अस्थिर होतें. असें न होऊं देतां ' सुखदुःखे समे कृत्वा ' आयुष्य कंठण्याइतकी सहनशीलता शिष्यानें धारण केली पाहिजे. जगांत सुखदुःखाची भेसळ आहे. 'जगीं सर्वसुखी असा कोण आहे ' हें संतवचन सर्वतोमुखी असून सदैव सुखांत लोळावें अशी मनुष्यमात्राची इच्छा असते आणि क्लेशाचा, त्रासाचा अथवा संकटाचा फेरा आला म्हणजे तो हैराण होतो. अनेक गोष्टी दैवाधीन असतात, त्या मुकाट्यानें सहन करण्याशिवाय गत्यंतर नसतें ही जाणीव जर जागृत राहिली तर साधकाच्या मनाची शांति कदापि ढळणार नाहीं. खरा साधक शांतिब्रह्म असतो.

स्वामी विवेकानंदांनीं आपले गुरु श्री रामकृष्ण परमहंस यांच्याविषयीं याला अनुलक्षून एक प्रसंग नमूद करून ठेवला आहे. रामकृष्ण परमहंस थोर सिद्ध पुरुष होते. स्थितप्रज्ञ ब्रह्मनिष्ठ होते. त्यांचें मानसिक सामर्थ्य अलौकिक होतें. एकदां श्री आजारी पडले असतां एका ब्राह्मणानें त्यांना सुचविलें कीं, आपली योगिक शक्ति समर्थ आहे. तिचा उपयोग करून आपण आपल्या व्याधीचा परिहार करावा. आपल्या योगबळानें तें कार्य सहज होण्यासारखें आहे. त्यावर परमहंसांनीं ब्राह्मणाला उत्तर दिलें: जें माझें मन मी ईश्वरार्पण केलें आहे तें तेथून काढून या माझ्या क्षुद्र शरिराकडे लावूं ? उत्तर अगदीं समर्पक होतें. ज्या मनाला परमेश्वरचरणीं गोडी लागली आहे त्याला इतर गोष्टी क्षुल्लक वाटणारच !

मानवी जीवन धोक्याचें, त्रासाचें, पीडेचें, आधिव्याधींचें, संकटाचें, दुःखाचें, क्लेशाचें व सुखहीन म्हणून तें तुच्छ आणि त्याज्य मानण्याची अनेकांची प्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस येते. शिष्यपदावर अधिष्ठित झालेला यापैकीं कशाचीहि क्षिति बाळगीत नाहीं. सर्व आपत्ति माझ्यावर कोसळल्या तरी त्यांचा भार सहन करण्यास मी तयार आहें. त्या योगानें इतरांचे हाल कमी होत असतील तर मला त्यांत संतोषच आहे अशी

त्याची वृत्ति बनलेली असते. आत्मचिंतनांत तो गढून गेलेला असतो. जगभर एकाच सर्वव्यापी आत्म्याचा संचार आहे असा त्याला प्रत्यय आलेला असतो. म्हणून कर्तव्य करीत राहून तो मनाची प्रसन्नता ढळूं देत नाहीं.

ज्ञानेच्छु शिष्यानें गुरुचरणीं पूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे. शिष्याची ज्ञानसंपादनाची पात्रापात्रता सद्‌गुरु पहातातच पण तो श्रद्धावान आहे कीं नाहीं हें मुख्यत्वें लक्षांत घेतात. श्रद्धावानासच ज्ञान सांगावें असा पूर्वापार दंडक चालत आहे.

**श्रद्दधानाय भक्ताय विनीतायानसूयवे ।**
**भूतेषु कृतमैत्राय शुश्रुषाभिरताय च ॥** भा. ३-३२-४१

श्रद्धा ठेवणारा, नम्र, निर्मत्सरी, सर्वांशीं स्नेहानें वागणारा, गुरुजनादिकांची सेवा करण्यांत आनंद मानणारा, वैराग्यशील, शांत अंतःकरणाचा कोणाचा हेवा न करणारा व शुद्ध मन असलेला असा जो कोणी भक्त असेल आणि ज्याला ईश्वर सर्व प्रिय वस्तूंमध्यें अत्यंत प्रिय वाटतो, त्याला मात्र तत्त्वज्ञान अवश्य सांगावें.

देहबुद्धि शिष्यानें टाकली पाहिजे. देह म्हणजे आत्मा अगर आत्मा हाच देह ही भ्रांति दूर झाली पाहिजे. मी कोण आहें याची जाणीव करून घेण्याची त्याची तयारी पाहिजे. मी म्हटलें कीं, माझ्या मीं म्हणण्याचें उद्दिष्ट काय ? मी म्हणजे माझें जड शरीर असा जर अर्थ असेल तर ' मी ' चा खरा अर्थ समजला नाहीं हें उघड होय. मी म्हटल्याबरोबर चक्षूंसमोर ' विश्व उभें राहिलें पाहिजे. त्या अनंत ब्रह्मांडाचा मी एक त्यांत समावेश झालेला अंश आहें हा प्रत्यय येणें हेंच सत्यज्ञान होय. माया म्हणा अगर अज्ञान म्हणा, यांच्यामुळें, असतें त्याहून निराळें दिसतें. जड देहालाच आत्मा मानण्याची प्रबळ प्रवृत्ति असते. पण तो

जबरदस्त भ्रम आहे. तो टाकून दिला पाहिजे. तसें करण्याची शिष्याच्या आंगची पात्रापात्रता सद्गुरु निरखून पहात असतात.

भाविक लोकांत अशी प्रचलित दृढ श्रद्धा आहे कीं, सिद्ध पुरुष मुक्तावस्थेंतच जन्मास येतात. स्वतःचें मोक्षसाधन त्यांस साधावयाचें नसतें. 'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूति। देह कष्टविती उपकारें।' हें त्यांचें ब्रीद असतें. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।' या भगवद्वचनाचा आधार घेऊन जन्मादारभ्य मुक्तावस्थेचीं बीजें त्यांच्या ठायीं असतात असें मानतात. अध्यात्माचा प्रकाश ते पाडतात. अशांचा ज्यांना संसर्ग घडतो त्यांना ते सहज प्रकाशमान करूं शकतात. अशा रीतीनें सर्वत्र प्रकाशमय होतें. त्यामुळें आरंभींच्या दीपाचा प्रकाश मंद न होतां तो अधिकाधिक दैदिप्यमान होत जातो. पहिलें प्रकाशस्थान गुरु. त्यापासून ज्यांना प्रकाश प्राप्त झाला ते शिष्य. ते पात्रतेप्रमाणें गुरुस्थानीं पुढें विराजमान होतात. अध्यात्माचा प्रवाह ते सतत वाहत ठेवतात; आणि त्यांतील पवित्र जलानें पावन होण्याचा आणि जीवितसाफल्य प्राप्त करून घेण्याचा सन्मार्ग खुला करितात. आजवर जगांत असे गुरु नांदत आले आहेत. त्यांची ओळख पटली पाहिजे. ओळख पटल्यावर त्यांस अनन्यभावें शरण गेलें पाहिजे. अध्यात्माची खरीखरी तहान लागल्यावर ती शमविणारा गुरु कोणत्या ना कोणत्या रीतीनें सन्निध येऊन कृपाप्रसाद देतो.

पुस्तकी ज्ञान संपादन करून ज्ञानी पंडित होईल. आध्यात्मिक तेज प्राप्त होणार नाहीं. त्याला गुरूचा वरदहस्तच लाभला पाहिजे. मग आध्यात्मिक बल एकसारखें वाढत जातें. आत्मानुभवानें ज्याला दैवी ज्ञान प्राप्त झालें आहे असाच हा गुरु होण्यास योग्य असतो. नुसता कानमंत्र सांगणारा किंवा मस्तकावर जलसिंचन करणारा नसतो. प्रेमळपणानें शिष्याला जवळ घेऊन, बाबा, सदाचारानें वाग, परमेश्वराचिंतन कर,

असें सांगतो. शिष्याच्या जीवनक्रमांत एकदम क्रांति घडवून आणतो. 'आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळवेळ मग त्यासी ॥' अशा गुरूला शिष्य परमेश्वररूप मानतो.

आध्यात्मिक ज्ञानप्राप्तीसाठीं शिष्यानें बंधनांतून मुक्त झालें पाहिजे. जगाकडे पाहिलें तर काय दिसतें? हें पाहिजे, तें पाहिजे, हें मिळालें तें कधीं मिळेल, अशी कधीं न भागणारी तृष्णा एकसारखी प्रज्वलित झालेली. त्यांना अध्यात्माची ओळख कशी पटणार? अध्यात्मनगरीची ते वाट चुकलेले. ते नेहमीं सैरावैरा भटकत राहणार! देवाची यदाकदाचित् आठवण झालीच तर देवाजवळ स्वार्थाचें मागणें मागणार! असें असलें तरी अंतःकरणाच्या खोल दरींत सत्य जाणण्याची इच्छा वास करीत असते एवढें खरें. ती जागृत होऊन शिष्य बनण्याची योग्य संधि मिळाल्याबरोबर मनुष्य अध्यात्माकडे वळतो.

खरें शिष्यत्व प्राप्त होण्यास काय साधनसामुग्री लागते याचें येथवर थोडक्यांत विवेचन केलें आहे. हें गांठोडें स्वाधीन करून घेतल्याशिवाय खरा गुरु भेटणार नाहीं. शिष्यवित्तापहारी अनेक भेटतील. एकनाथाची अशी तयारी झाली होती. म्हणूनच त्यांना सद्गुरु भेटले. ज्ञानदेव गुरुप्रसादास पात्र होते म्हणूनच निवृत्तीची कृपा झाली. नाथ गुरुकृपेनें भवसागर तरून पार गेले आणि जनतेला तरून जाण्याचा मार्ग दाखविला. नाथांची गुरुनिष्ठा कशी होती हें आतां आपण पाहूं.

## नाथांची गुरुसेवा

गुरुसेवा करण्यांत नाथांच्या हातून कधींहि कसूर झाली नाहीं. गुरु म्हणजे परब्रह्मस्वरूप या भावानें त्यांची सर्व सेवा होती.

**आसनीं भोजनीं शयनीं । गुरूतें न विसंबे मनीं ।**
**जागृतीं आणि स्वप्नीं । निदिध्यासनीं गुरु केला ॥**

गुरुस्मरण करितां देख। स्मरणें विसरे तहानभूक।
विसरला देहगेहसुख। सदा सन्मुख परमार्थे॥
परि संतांसवें वसतां। योगज्ञानि पैसतां।
गुरुचरण उपासितां। वैराग्येंसि॥
येणेंचि सत्कर्में। अशेषहि अज्ञान विरमे॥
जेयाचें अहं विश्रमे आत्मरूपिं॥ ज्ञा. अ. १५ श्लो. १५

ज्ञानेश्वरांनीं सांगितलेलें आत्मरूप प्राप्त करून घेण्याकरितां नाथांनीं संत जनार्दनासान्निध वास्तव्य करून योगज्ञान संपादिलें. वैराग्ययुक्त गुरुचरणसेवा हेंच सत्कर्म करून, अशेष अज्ञान नष्ट झाल्यावर स्वतःच्या 'अहं'ला आत्मरूपांत विश्रांतिस्थान मिळवून दिलें.

सच्छिष्य गुरूची सेवा कोणत्या दृष्टीनें करतो हें नाथांनीं भागवताच्या बाराव्या अध्यायांत वर्णिलें आहे.

गुरु माता गुरु पिता। गुरु स्वामी कुळ देवता॥
गुरुवांचोनि सर्वथा। आणिक देवता स्मरेना॥
कायावाचा मनें प्राणें। जो गुरुवांचोनि आन नेणें।
तैसाचि भजे अनन्यपणें। गुरुभक्ति म्हणणें त्या नांव॥
तहान विसरली जीवन। क्षुधा विसरली मिष्टान्न।
करितां गुरुचरण संवाहन। निद्रा जाण विसरला॥
मुखीं सद्गुरूचें नाम। हृदयीं सद्‌गुरूचें प्रेम।
देहीं सद्गुरूचें कर्म। अविश्रम अहर्निशीं॥
गुरुसेवेसि गुंतलें मन। विसरला स्त्री-पुत्र धन।
विसरला मनाची आठवण। मी कोण हें स्फुरेना॥

गुरुचरणीं इतकी निष्ठा बाणली पाहिजे. म्हणजे मग 'गुरुवाक्यें ब्रह्म सप्रमाण। येरवीं ब्रह्मपण शब्दमात्र' अशी वृत्ति साहजिक बनते. नाथांनीं केलेल्या गुरुस्तुतीला गाथेचीं सव्वीस पानें गुंतलीं आहेत. गुरूची विनवणी

नऊ अभंगांत केली आहे. एकनाथाला स्वामींनीं जो बोध केला आहे तो बारा अभंगांत दिला आहे. त्याचा सारांशः एकनाथा, विठ्ठलमंत्राचें सर्वकाळ हृदयांत ध्यान कर. तीर्थपर्यटन कशाला ? आधीं मन शुद्ध कर. मन शुद्ध झाल्यावर घरींच देव. यापेक्षां अधिक श्रेष्ठ दुसरा बोध नाहीं. देह शुद्ध करून भजनीं भजावें. दुसऱ्याचे दोषगुण आठवूं नयेत. कांहीं संकट पडलें तर संत साहाय्य करतील. हरिभजनांत आळस करूं नको. दुसऱ्या कोणत्याहि मार्गाचा तूं अवलंब करूं नकोस. संतांना शरण जा. म्हणजे दैन्य उठाउठि जाईल. सर्वांच्या ठायीं एकविध भाव धर. द्वैताची उरी उरवूं नको. ध्रुव, उपमन्यु, बिभीषण, नारद हे याच मार्गानें तरले.

असा बोध केल्यावर एके दिवशीं स्वामींस वाटलें कीं, एकनाथाला आतां अनुष्ठानास बसवावें. ते नाथास म्हणाले कीं, देवगिरीनजीकच सुलभ नांवाचा डोंगर आहे. तेथें सूर्यकुंड तीर्थ आहे. त्या ठिकाणीं जाऊन मध्यान्हापर्यंत नित्यनेमानें श्रीकृष्णाचें ध्यान एकाग्रचित्तानें करावें. अशा रीतीनें कालक्रमणा करीत असतां जर कांहीं नवल घडलें तर परत यावें. गुरूची आज्ञा शिरसावंद्य करून नाथ त्या स्थळीं गेले. तें मार्कंडेय ऋषिस्थान, पुरातन तपारण्य, तेथील दोन कुंडें पाहून नाथांचें मन संतुष्ट झालें. अशा या एकान्त स्थळीं प्रातःस्नान करून नाथ ध्यानस्थ बसूं लागले. श्रीकृष्णस्वरूपाचा साक्षात्कार होण्यास कालावधि लागला नाहीं. सर्व विश्वाला व्यापून राहिलेल्या चैतन्यघन तेजाच्या साक्षात्कारानें नाथ देही असून विदेही झाले. त्या तपोवनांत एक मोठा भुजंग होता. तो नाथांजवळ येऊन नाथ ध्यानस्थ असतांना त्यांच्या शरिराला वेष्टन घाली; आणि नाथांच्या मस्तकावर फणा उभवून सावली धरी. ध्यानविसर्जनाचा समय येतांच, शरिराची हालचाल व्हायला लागल्याबरोबर, तो भुजंग निघून जाई. असें बरेच दिवस चाललें होतें. ही गोष्ट उघडकीस येण्यास कारण असें घडलें कीं, त्या पर्वताच्या पायथ्याला असलेल्या शेतांतील एक धर्मात्मा

शेतकरी शेतराखणी करण्यास येत असे. त्यानें पर्वताच्या शिखरावर नाथाला एकदां पाहिलें. या तपस्वी ब्राह्मणाची आपणाकडून सेवा घडावी असें त्याच्या मनानें घेतलें. आपल्या घरच्या एका गाईचें दूध भक्तिपूर्वक तो नाथाला आणून देऊं लागला. एके दिवशीं शेतकऱ्याच्या बायकोनें दूध नेहमींपेक्षां लवकर आणलें. तो तें घेऊन वर गेला. नाथांची समाधि उतरली नव्हती. वास्तविक ती अवेळ होती. तपस्व्याच्या; डोकीवर फणा काढून नाग छाया करीत आहे, तपस्वी निश्चळ बसला आहे, हें कधीं न दिसणारें दृश्य अवलोकन करून या साधूला हा सर्प डंखील कीं काय अशी भीति वाटून तो फारच घाबरला आणि त्यानें मोठ्यानें ओरडा केला! त्याबरोबर ध्यान भंगलें, शरिराची हालचाल झाली आणि भुजंग निघून गेला. शेतकऱ्यानें सर्व वृत्तान्त कथन केला आणि तुमचें थोर सुकृत म्हणून घोर अनर्थ चुकला असे समाधानाचे उद्‌गार काढले. त्या वेळीं सहजस्फूर्तीनें नाथांच्या तोंडून अभंगवाणी बाहेर पडली.

**आम्हा डंखावया आला काळ। तो काळचि झाला कृपाळ ॥**
**भली वोळखी जाली आतां। चित्त मीनलेंसें चित्ता ॥**
**देहींचा फिटला संदेह। तंव काळचि झाला राव ॥**
**एकाजनार्दनाचे पायीं ] जीण्या मरणा सौरसु नाहीं ॥**

यानंतर गुरूच्या आज्ञेनें अनुष्ठान संपवून नाथ स्वगृहीं आले. गुरूला सविस्तर वृत्तान्त निवेदन केला. पुढें स्वामींनीं नाथाला तीर्थाटणास पाठविण्याचा विचार केला; व कांहीं स्थळीं स्वतः बरोबर जाण्याचें ठरवून नाथाला आपला मनोदय कळविला.

## तीर्थयात्रा

हल्लीं गुरुशिष्याचें नातें बऱ्हंशीं भाडोत्री झालें आहे. अध्ययन-अध्यापनाला वाहिलेले आणि शिष्याला प्रेमानें वागवून त्याजवर कृपा

करणारे गुरुजन फार थोडे. शिष्यांची वागणूक तर विचारूंच नका. ‘हे आमचे गुरूच नव्हत’ हा पाठ मिळाल्यापासून शिष्यगणांत अनादर उत्पन्न होऊन, शाळा – कॉलेजें सोडण्याचा आदेश मिळाल्यानंतर तो शिखरास पोहोंचला. नम्रतेची जागा उद्धटपणानें घेतली आणि शिष्य गुरूंना शहाणपण शिकवूं लागले. या आर्य संस्कृतीविरुद्ध प्रवृत्तीचा प्रयोग जेव्हां स्वैर विचार शिकवणारांवर होऊं लागेल तेव्हां आपल्या शिकवणुकीची अनिष्टता त्यांच्या नजरेस येईल आणि होणारे घातुक परिणाम टाळण्याविषयीं त्यांस उपाययोजना करावी लागेल. पण फार उशिरां ही जाणीव उत्पन्न झाल्यास विस्कटलेली घडी बसण्यास कठीण जाईल.

**केल्यानें देशाटन पंडित मैत्री सभेंत संचार ।**
**शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसे फार ॥**

योगाभ्याससाधन प्राप्त झाल्यावर जनार्दन स्वामींनीं नाथाला बरोबर घेऊन तीर्थयात्रेसाठीं प्रथम नाशिक – त्र्यंबकेश्वराच्या प्रवासास सुरुवात केली. अवश्य तेवढे सेवक घेऊन सुमुहूर्तावर हें प्रयाण आरंभिलें. एक अश्व स्वतःसाठीं, दुसरा नाथासाठीं. बैलगाडीपेक्षां घोड्यावरचा प्रवास जास्त सुखकारक आणि जलद झाला असावा. दरकुच दर मजल करीत एके रात्रीं ते चांदवडास चंद्रमाभट्टाच्या घरीं येऊन मुक्कामास राहिले. त्याचा आश्रम सुशीळ असून तो ब्राह्मण स्नानसंध्याशील, उत्तम तपोनिष्ठ, तेजस्वी व सोज्ज्वळ होता. त्यानें या मान्यवर गुरुशिष्याचा मोठ्या आदरानें सत्कार केला. एक प्रहरनंतर चतुःश्लोकी भागवताचें पठण करण्याचा त्या धर्मशील ब्राह्मणाचा नित्यक्रम असे. रात्रीं भोजनोत्तर चतुःश्लोकीचें सुबोध आणि रसाळ निरूपण उभयतांनीं ऐकलें. स्वामी संतुष्ट झाले. ‘ श्रीनाथासि आपण । आज्ञा करी जनार्दन । मूळ भागवत चतुःश्लोकी जाण । त्याची टीका करी बापा ॥

श्रीहरि ब्रम्ह्याचें ज्ञान। जे परमार्थी निजभूषण। तुझिया मुखें हें व्याख्यान। व्हावें कथन हें वाटे॥' सद्गुरुची आज्ञा प्रमाण मानून लागलीच पुस्तकार्थ चाळण्यास प्रारंभ केला. चांदवडाहून निघून ते दोघें पंचवटींत श्रीराममंदिरांत जाऊन तेथें बिऱ्हाड ठेवलें. त्या मंदिरांत श्रीरामापुढें चतुःश्लोकीवर स्वतः केलेल्या ओव्यांच्या आधारानें सद्गुरूपुढें नाथांनीं प्रवचन केलें. चतुःश्लोकींचें विवरण हाच नाथांचा पहिला ग्रंथ. पहिलाच प्रयत्न असून त्यांत नाथांचें ज्ञान आणि प्रगल्भ विचार ओतप्रोत उतरले आहेत. ही चतुःश्लोकी म्हणजे भागवताच्या द्वितीय स्कंधांत नवव्या अध्यायांत आहे. नाथांचें पुराण श्रवण करून 'ब्राह्मण म्हणे निजमनीं। धन्य धन्य याची वाणी। ब्रह्मसुखाची निजखाणी। चिद्रत्न भूषणीं सुशोभित॥' या प्रमाणें श्रीरामचंद्रांच्या आश्रमस्थानीं पंचवटींत राहून सद्गुरु सन्निध असतांना महाराष्ट्रभाषेंत ही टीका केली. ज्ञानेश्वराप्रमाणेंच नाथांचें मराठीवर प्रेम होतें. नाशिक–पंचवटीहून ते तिघेहि त्र्यंबकेश्वरला गेले. तेथील वास्तव्यांत तिघांची परमार्थपर वर्तणूक पाहून सर्व लोकांना त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि वाटूं लागली. त्र्यंबकेश्वरास अन्नसंतर्पण वगैरे करून निवृत्तिनाथाच्या समाधीचें दर्शन घेऊन ते तिघेहि स्वग्रामाला जाण्यास परतले. निवृत्तिदर्शनानंतर नाथांनीं कांहीं अभंग रचले. त्यांपैकीं कांहीं नमुन्यादाखल पुढें दिले आहेत.

**अजि धन्य दिन जाला। स्वामी निवृत्ति भेटला॥**
**जन्म जरा मरण व्याधि। अवघी तुटली उपाधी॥**
**मन इंद्रियांसहित। पायीं जडलें चित्त॥**
**समूळ अहंकार गेला। निवृत्तिनाथ पाहतां डोळां॥**
**एका विनवी जनार्दन। निवृत्तिनामें जालों पावन॥**
**विश्वाचा तो गुरु। स्वामी निवृत्ति दातारु॥**
**आदिनाथापासून। परंपरा आली जाण॥**
**ज्ञानदेवा ज्ञान दिलें। चांगदेवातें बोधिलें॥**
**तोचि बोध माझे मनीं। राहो एकाजनार्दनीं॥**

स्वामींच्या बरोबर देवगिरीस परत येऊन नंतर मग तीर्थयात्रेस गेले. चंद्रभाभटहि त्यांच्याबरोबर होता. स्वग्रामीं न राहतां तो जनार्दन-स्वामींच्या सहवासांत देवगिरीस राहिला. परमेश्वरचिंतनांत काळ घालवून त्यानें तेथेंच समाधि घेतली. त्याच्या विदेही अवस्थेला अनुलक्षून चांदबोधला हें नांव त्यास प्राप्त झालें. त्याची समाधि कोठें आहे याविषयीं निश्चितपणा नाहीं. समाधिस्थानाविषयीं ब्राह्मण आणि यवन यांच्यामध्यें वाद उपस्थित झाला होता. पण तो संपूर्ण मिटून देवगिरीसच समाधी झाली असें चरित्रकार केशव म्हणतो.

नाथांनीं तीर्थयात्रेंत कोणकोत्या तीर्थांना जावें हें त्यांस सांगण्यांत आलें. नाथा, तूं सर्व तीर्थें पाहून यावें. बदरिकाश्रमादिकरून सर्व उत्तरप्रांत घ्यावा. बदरिनारायणाचें दर्शन झाल्यावर दक्षिण मानस साधावें. बदरिकाश्रम ते रामेश्वर असा तीर्थयात्रेचा नेमप्रकार आहे. कुठें त्रिरात्र तर कुठें पंचरात्र सुक्षेत्र पाहून वस्ती करावी. भगवद्भक्त भेटल्यास विशेष आदर असावा. योगक्षेमाची चिंता वाहूं नको. तुजसवें असणारा श्रीअनंत तुझें संरक्षण करील, असा गुरूंनीं आदेश दिला. लोकसंग्रहार्थ ती आज्ञा पाळली. प्रवासांत असतांना ‘ जनार्दन ध्यानीं वदनीं । जनार्दनाचि देखे नयनीं । चालतां पाऊल अवनी । जनार्दनपणीं अभिन्न ॥ ’ अशी नाथांची मनोवृत्ति होती. जेथें मनोगत रमे तेथें वस्ती करीत. अशा रीतीनें पूर्णा, पयोष्णी, तापी, नर्मदा आणि चर्मण्वती या नद्यांत स्नानें करून वाटेंत लहान लहान क्षेत्रें पाहून अवंती नगरींतील थोर ज्योतिर्लिंगस्थान जें महाकाळेश्वर, त्याच्या दर्शनास नाथ गेले. तेथून श्रीकृष्णाचीं क्रीडास्थानें गोकुळ, मथुरा, वृंदावन येथील उत्साह प्रत्यक्ष पाहिल्यावर, धन्य धन्य येथील जन, धन्य धन्य वृंदावन, धन्य धन्य वृक्षपाषाण, धन्य धन्य ही उघड प्रेमाची बनलेली भूमि कीं जी कृष्णावतारांत श्रीकृष्णचरण-रजांनीं पुनीत झाली. अशा पवित्र स्थळांचें दर्शन झालें ही सद्गुरुकृपा होय असे धन्योद्गार नाथांनीं काढले. श्री प्रभु चैतन्यांनींहि असेच भक्ति-

रसानें ओथंबलेले उद्गार काढून देहभान विसरून गेल्याचें त्यांच्या चरित्रांत भक्तिभावयुक्त वर्णन आहे.

प्रयाग क्षेत्राला गेल्यावर तेथें पंचरात्र मुक्काम केला. प्रयागचा महिमा फार प्राचीन आहे. त्रिवेणी माधवदर्शनाचें महात्म्य फार मानिलें आहे. तेथून मग पाप—तापनाशी अशी ज्या स्थळाची पुराणांत आख्या आहे अशा मुक्तक्षेत्र वाराणशीला नाथ आले. मनकर्णिकास्नान, विश्वेश्वरदर्शन व भैरवकालिकास्थान अवलोकन करून नाथानें अयोध्येचा मार्ग धरला. गयेला जाऊन तेथें विष्णुदर्शन घेतलें. लौकिक रूढीस अनुसरून श्राद्धें वगैरे करण्याच्या भानगडींत नाथ पडलेले दिसत नाहींत ! कारण सर्वोपचारानें एक मन जर श्रीकृष्णाच्या ठिकाणीं अर्पण केलें तर कोटि पितृश्राद्धें आणि तर्पण होऊन पूर्वजांचें उद्धरण होतें. असो. मग बदरिकाश्रमाचें दर्शन घेण्याची इच्छा बाळगून नाथ तिकडे गेले. मार्ग अतिकठीण. शिंक्यांतून जावें लागलें. नेणाराचा पाय घसरला कीं खोल दरी आणि कायमचा मोक्ष ! पण निश्चय आणि निष्ठा असली म्हणजे संकटें पळतात आणि सद्धेतु तडीस जातो. बदरिकाश्रमाहून नाथ द्वारावतीला आले. द्वारकेची अप्रतिम शोभा पाहून नाथाला अतिशय समाधान झालें. तेथील अद्भुत महिमा काय वर्णावा ! नामसंकीर्तनांत सर्व जन रंगून गेलेले, निष्कर्मवृत्तीनें प्रपंच करणारे, देही असोन विदेही. कोणी आरत्या ओवाळतात, तर कोणी हरिनामाचा गजर करतात ! या ठिकाणचा विशेष अपूर्व असा श्रीकृष्णभक्तीचा भाव पाहून, ज्यांनीं भक्तीचा एवढा गौरव केला ते धन्य, असे उद्गार नाथांच्या तोंडून निघणें अगदीं साहजिक आहे. उत्तरेचा प्रवास आटोपून गुजरात प्रांतांतून प्रतिष्ठान नगरीला यावयास नाथ निघाले. दरकूच दरमजल करीत हा ज्ञानपिपासु भगवद्भक्त प्रवासी मार्गक्रमण करीत चालला.

# पैठणास आगमन

नाथांनीं लहानपणींच घर सोडलें. त्यावेळीं त्यांचें वय बारा वर्षांचें असावें. मुलगा लवकर घरीं आला नाहीं म्हणजे घरांतील वडील माणसांना किती काळजी वाटते याचा अनुभव कारणपरत्वें बहुतेकांस आहे. मूल हरवलें म्हणजे त्याचा शोध करण्यांत आईबापांची कशी तारांबळ उडते, हेंहि पुष्कळांनीं पाहिलें आहे. तेव्हां आजाआजीचा एकच एक आशांकुर एकाएकीं नाहींसा झाल्यानें त्यांना एकदम केवढा धक्का बसला असेल याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. कित्येक ठिकाणीं त्यांनीं शोध केला. आमचा जीव कीं प्राण 'एका' कोणी पाहिला असल्यास सांगा हो, असें जो कोणी भेटेल त्यास अश्रुपूर्ण नयनांनीं विनविलें. कोठेंहि शोध लागेना, तेव्हां गंगातीरीं येऊन ते आक्रंदन करूं लागले. आमचा एकोबा कोठें गेला, गंगेंत तर नाहीं बुडाला ? कोणी फूस लावून तर नाहीं ना नेला ? असे एक ना दोन, अनेक कल्पनातरंग मायेनें व्याकुळ झालेल्या त्यांच्या मनांत उठूं लागले. म्हणतात ना, मन चिंती तें वैरी न चिंती ! सर्व पैठण हळहळायला लागलें. नाथाचे गुण आठवून डोळ्यास पाणी आलें नाहीं असा माणूस विरळा ! त्यांत जे विवेकी होते ते त्या वृद्धांचें सांत्वन करूं लागले कीं, नक्की शोध लागल्याशिवाय वृथा शोक करणें बरें नाहीं. मुलगा समंजस, तो भलतेंच कांहीं सहसा करणार नाहीं. त्याला संतचरणांची आवड आहे, पुराणश्रवण त्याला गोड लागतें, सत्पुरुष दर्शनाची त्याला इच्छा आहे. तेव्हां असा तर्क धांवतो कीं, तो कोठें तरी सत्पुरुषाकडे गेला असेल. पुरता शोध करणें हें अगत्याचें आहे. जेव्हां नाथ अदृश्य झाला तेव्हांच ज्याचें पुराण श्रवण करण्यास नाथ नेमानें जाई तो पुराणिकहि परगांवीं गेला. तेव्हां त्या पुराणिकाबरोबर नाथ गेला असेल अशी मनाची समजूत करून घ्यावयास जागा झाली. चिंतामग्न स्थितींत पुराणिकाची वाट

पहात मोठ्या आशेनें लोक राहिले. आतांसारखी त्यावेळीं टपालाची व्यवस्था नव्हती. ठिकठिकाणीं माणसें पाठवावीं तर घरची गरिबी. तेव्हां परमेश्वरावर भार टाकून राहणें त्या वृद्धांस भाग पडलें.

नंतर कांहीं काळानें ज्या गांवीं तो पुराणिक होता तेथें त्याला सर्व वर्तमान समजलें. आपल्यावर हा निष्कारण अभिश्राप आला म्हणून त्याला चिंता उत्पन्न झाली. विचारांतीं त्याला असें वाटलें कीं, नाथ कदाचित् देवगिरीस जनार्दन स्वामींकडे गेला असावा. लहानपणापासून नाथाच्या मनाचा कल तो जाणून होता. तो देवगिरीस गेला. स्वामींची भेट घेतली. नाथ गुरूच्या आज्ञेस अनुसरून तीर्थयात्रेस गेला आहे असें समजलें. नाथाची सविस्तर माहिती मिळविली. आपल्या पुराणश्रवणास येणारा व जिज्ञासू बुद्धीनें प्रश्न विचारणारा बालक केवढ्या थोर योग्यतेस चढला आहे हें जाणून त्याला हर्ष वाटला. देवगडाहून होईल तितक्या जलद पैठणास येऊन तो वृद्धांना भेटला आणि सगळा वृत्तान्त कथन केला. नाथ गेला याचा दोष मजवर येत होता तो नाहींसा झाला. मी अगदीं निरपराध आहे, असें तो पुराणिक म्हणाला. नाथाचें हें कुशल वर्तमान ऐकून कृतज्ञता बुद्धीनें वृद्धांनीं ब्राह्मणास नमस्कार घातला. त्यांच्या जीवांत जीव आला. त्यांना किती आनंद झाला असेल व पैठणवासी जनहि त्या आनंदाचे कसे वाटेकरी बनले असतील याचें काल्पनिक चित्र रेखाटून चरित्रकारांनीं कादंबरी रचली आहे. कादंबरी केव्हांहि मनोरंजक असतेच. वस्तुतः काय घडलें असेल याचें टिपण त्यावेळीं कोणी केलें नाहीं; करण्याची आवश्यकताहि वाटत नव्हती. नाथ हा जगद्वंद्य पुरुष होईल असें त्याच्या गुरूशिवाय कोणास वाटलें होतें? तेव्हां त्याच्या चरित्रांतील विविध प्रसंगांविषयीं केशवानें दिलेल्या त्रोटक माहितीचा आधार घेतला पाहिजे. त्या ब्राह्मणानें त्या वृद्धांस सुचविलें कीं, तुम्ही समक्ष जाऊन जनार्दनपंतांना भेटावें आणि सविस्तर वृत्तान्त

विचारावा. त्याप्रमाणें दोघें देवगिरीला गेलीं. पंतांनीं दोघांचा प्रेमानें आदरसत्कार केला आणि नाथ तुमच्या कुळांत जन्माला येऊन तुमचा वंश धन्य केला असे धन्योद्गार काढले. त्या दोघांस कित्येक दिवस ठेवून घेतलें. नंतर द्रव्यवस्त्रें देऊन संतोषानें निरोप दिला. आमचा बाळ येऊन आम्हांला दर्शन देईल का, अशी निरोप घेतांना त्यांनीं पंतांजवळ पृच्छा केली. मन साशंक राहणें ही मनाला खोड लागलेली असते. बारा वर्षें विरह झालेल्या बाळाच्या भेटीविषयीं ही साशंकता अधिकच असावयाची. जनार्दन हे कारुण्यमूर्ति होते. त्यांनीं शंकासमाधान करून नाथाला स्वतःच्या हस्ताक्षराचें पत्र त्यांजपाशीं दिलें. पत्राचा सारांश हा कीं, हें पत्र पाहतांच पुढील तीर्थयात्रा सोडून प्रतिष्ठानांतच रहावें. जातांना वृद्धांस सांगितलें, थोड्याच महिन्यांत नाथ तुमच्या गांवीं येईल. त्याच्या शोधांत राहा. त्याची भेट झाल्यावर त्याला पत्र द्या. तें वाचून तो तुमच्याजवळ राहील. असें आश्वासन मिळाल्यावर आजाआजी परत आले आणि नाथाची मार्गप्रतीक्षा करीत राहिले. या गोष्टीसंबंधानें कांहीं प्रश्न सहज उभे रहातात. नाथ हा मुलगा घरदार सोडून कां आला, त्याच्या घरचीं माणसें विरहानें व्याकुळ झालीं नसतील का ? वगैरे प्रश्न पंतांपुढें उभे राहावयास पाहिजे होते. तसेंच, मातापितरांच्या पश्चात् ज्यांनीं आपलें प्रेमळपणानें लालनपालन केलें, त्यांना आपली वार्ता कळविण्याचें बारा वर्षांत एकदांहि नाथाच्या मनांत येऊं नये इतकी विरक्ति, कोणी म्हणतील मनाचा निष्ठुरपणा, कां व्हावा ? प्रश्न सयुक्तिक आहेत. पण या प्रश्नांचीं उत्तरें समर्पकपणें देण्यास आपल्याजवळ काय साधन आहे ? नवीन एक चरित्र प्रसिद्ध झालें आहे, त्यांत आजोबांनींच एकनाथाला परवानगी दिली होती असें आहे.

नाथ पैठणला आले. जन्मभूमीचें दीर्घकालानंतर दर्शन घडलें. मायलेकरांच्या भेटीचा आनंद तो ! गंगातीरीं आलेल्या नरनारींचा समुदाय अवलोकन करून नाथ मनांत संतुष्टले. लहानपणीं गांव सोडून

गेलेला बालक बारा वर्षांनंतर ऐन तारुण्याच्या उमेदींत आलेला तरुण सहजासहजीं ओळखूं येणें कठीण. त्यांतहि जेथें फारसे लोक येणार नाहींत अशा पिंपळेश्वराच्या देवळांत नाथांनीं बिऱ्हाड ठेवलें. हें स्थान नाथांच्या समाधीच्या उत्तरेस आहे. स्नानसंध्या आटोपल्यावर माध्यान्हीं गांवांत जाऊन यदृच्छेनें जें कांहीं मिळे, त्याचें भोजन करून सुखासमाधानानें राहूं लागले. ब्रह्मचर्यावस्थेंत माधुकरी मागून निर्वाह करावा व अध्ययन करावें असा शास्त्राचा दंडक असल्यामुळें तोच मार्ग यावेळीं नाथांनीं पत्करलेला दिसतो.

एकदां गांवांतून जात असतां वृद्ध आजाआजींची त्या संधीला गांठ पडली. हा आपला बाळ तर नाहीं ना, अशी त्यांच्या अंतरीं आशा उद्भवली. त्याला थांबवून त्याप्रमाणें विचारण्यास तीं उद्युक्त झालीं. नाथांनीं त्यांना ओळखलें असावें. कारण त्यांची कावरीबावरी मुद्रा पाहून तेथून सुटका करून घेण्यासाठीं नाथ शीघ्रगतीनें जाऊं लागले. वृद्ध धांवतच त्यांच्याजवळ आले आणि नांव विचारलें. त्यानें मौन स्वीकारलें. अंतरींची खूण अंतराला भिडली. वदन न्याहाळल्यावर नयन अश्रूंनीं भरून आले. बापा एका, आतां कां बोलत नाहींस? चित्त कठोर कां केलेंस रे बाळा? माया अगदींच कशी सांडलीस? आम्हां वृद्ध अनाथांना दुःखांत टाकून गेलास. आमचें भाग्य थोर, आज सांपडलास. पण बाळ, तूं आमच्या जीवाचा विसांवा; अद्याप आमच्यावर रुसलासच? याप्रमाणें आजाआजी आळवीत असतांहि नाथ अगदीं स्तब्ध. याला उमजण्याला पत्र तरी देऊन पहावें असें त्यांनीं मनांत योजिलें आणि जनार्दनपंतांचें पत्र त्यांच्यापुढें केलें. गुरूचें हस्ताक्षर पाहिल्याबरोबर मनांत सद्भाव उत्पन्न झाला. ती पत्रिका मस्तकावर धारण केली. नंतर तिचा भावार्थ मनांत आणला. आजाआजीच्या चरणावर मस्तक ठेवलें. झालें. नाथांनीं त्याच ठिकाणीं सहजावस्थेंत राहण्याचें निश्चित केलें.

## पैठणांत वास्तव्य

ज्या जागेवर गुरूचें पत्र मिळालें त्याच जागीं मौनावस्थेंत नाथांनीं काळ कंठण्यास सुरुवात केली. त्या ठिकाणीं लोकांनीं घर बांधून दिलें. आहाराची व्यवस्था लावली. लोकांचें नाथांविषयीं प्रेम आणि भक्ति वाढत चालली. दर्शनाला येणारांची दाटी होऊं लागली. भाविक सात्विक साधक येऊन लोटांगण घालूं लागले. नाथांचें सतत श्रीजनार्दन नामस्मरण चाले. परिपूर्ण गुरुभक्ति असणारा हा थोर सत्पुरुष आहे अशी कीर्ति पसरूं लागली. लोकांचा अपूर्व भाव पाहून त्यांच्या उद्धाराकरितां एकादशीस कीर्तन करण्याचा क्रम नाथांनीं सुरू केला. नाथ कीर्तनाला उभे राहिले म्हणजे मागें ध्रुपद धरायला कृष्ण ब्राह्मण होऊन अतिप्रीतीनें असे. नाथ कीर्तनकार, त्याला साहाय्य करणारा कृष्ण असल्यावर सर्व श्रोत्यांना कीर्तनश्रवणानें संपूर्ण समाधी लागे. अशा रीतीनें कालक्रमण चाललें असतां गोकुळाष्टमी आली. नाथांनीं कृष्णजयंतीचा उत्सव करण्याचें योजिलें. नाथासारखा कीर्तनकार झाला नाहीं अशी सर्वतोमुखी कीर्ति पसरली. देवागिरीस जनार्दनपंतांच्याहि कानावर गेली. स्वतः ज्ञानवैराग्यभक्तियुक्त आचरण करून इतरांना उदाहरण घालून देण्याचें कार्य नाथ करीत आहे ही जनवार्ता श्रवण करून पंतांना आनंद झाला. एकवेळ पैठणास जाऊन नाथाची भेट घ्यावी अशी पंतांना इच्छा झाली. पैठणासच कृष्णजयंतीचा उत्सव करावा या हेतूनें ते पैठणास आले. बरोबर साधनसामुग्री विपुल आणली. नाथांच्या द्वाराजवळ येतात तों त्यांच्या दृष्टीस नवल पडलें. हातांत लखलखीत त्रिशूळ घेतलेले मूर्तिमंत श्रीदत्तात्रेय द्वारपाळ होऊन उभे. ज्याची वृत्ति तन्मय झाली आहे त्याला आपलें आराध्यदैवत सर्वत्र दिसावयाचेंच ! हा चमत्कार पाहून साष्टांग नमस्कार घातला. कंठ सद्गदित झाला, नेत्रीं प्रेमाचा पूर आला, चित्तवृत्ति तटस्थ झाली.

श्रीदत्तांनीं जनार्दनाला हृदयीं कवटाळून सावध केलें आणि एकनाथाच्या अधिकाराचें वर्णन स्वमुखानें केलें. हा एकनाथ जगदीशाचा पूर्णावतार आहे. धर्मसंस्थापनाच्या उद्देशानें मनुष्यवेषांत आला आहे आणि भक्तिमहिमा वाढवीत आहे. अशाचा द्वारपाळ मी झालों म्हणून तूं आश्चर्य मानूं नको. असें पंतांशीं बोलून श्रीदत्त मनुष्यवेषानें आंत गेले आणि पंत आल्याची खबर दिली. तें ऐकल्याबरोबर नाथांना फार आल्हाद वाटला. त्वरेनें येऊन सद्‌गुरूला साष्टांग प्रणिपात केला. सद्‌गुरूंनीं त्यांना उचलून प्रेमालिंगन दिलें आणि नाथा, तूं धन्य आहेस असे गौरवोद्गार काढले. मोठ्या उल्हासानें आणि भक्तीनें सद्‌गुरूला आंत नेऊन आसनावर बसविलें. अगोदरच कृष्णजयंतीची तयारी चालली होती तशांत सद्‌गुरूचें आगमन झालें. आनंदाला आणि उत्साहाला पूर आला. जमा केलेल्या सामुग्रींत पंतांनीं भर घातली. कोणतेंहि न्यून राहिलें नाहीं. गुरूची आज्ञा घेऊन नवरात्राला आरंभ झाला. कीर्तनाचा जयघोष सुरू झाला.

**जनार्दना बैसऊनीं आसन । आपण उभा राहे कीर्तनीं ॥**
**भक्ति उत्कर्ष गाऊन गाणीं । निरोपण वाणी हरिचरित्रां ॥**

भक्तिरसानें ओथंबलेल्या नाथांच्या कीर्तनाला त्यांच्या ध्रुपद्याची साथ उत्तम होत असल्यामुळें कीर्तनांत सर्व श्रोते तन्मय होऊन जात. नाथा, तुला या अमोल रत्नाचा लाभ कुठें झाला असें गुरूंनीं विचारलें. त्याचें नांवगांव समजण्याची उत्सुकता दर्शविली. ध्रुपद धरणारा ब्राह्मण म्हणाला, मी अनाथ आहें, माझें राहतें स्थान नेमस्त नाहीं, फिरत फिरत येथें आलों. येथील आचाररीत पाहून मला बहुत संतोष झाला. कीर्तनांत हर्षयुक्त गाण्याची मला विशेष आवड असल्यानें येथें सत्संगतींत राहिलों. तें ऐकून पंत म्हणाले, नाथा, तुझ्या साहाय्यार्थ भगवंतानेंच निश्चितपणें या ब्राह्मणाला पाठविलें आहे. अष्टमीचा समारंभ अति उल्हासानें पार

पडला. गृहकृत्यें आणि उद्योगधंदे सोडून नवरात्रभर पैठणचे आणि आसपासचे जन कीर्तनश्रवणसुखाचा लाभ मिळावा म्हणून आतुरतेनें येत आणि आल्हादित होत.

**‘ त्या सुखाची सुखप्राप्ति। दुर्लभ ब्रह्मादिकांप्रति ॥**
**नाथकृपा मानवी भोगती। दैववाणि ते स्वर्गस्थ ॥**
**कलियुगीं नरदेह प्राप्ति। अति दुर्लभ भगवद्भक्ति ॥**
**धन्य धन्य सत्संगति। देव वांछिती मृत्युलोक ॥ ’**

हा सुखसोहळा पाहून पंतांचे डोळे निवाले. काला आणि ललित झाल्यावर त्यांनीं देवगडला जाण्याची तयारी केली. जाण्यापूर्वीं नाथांच्या आजाआजीचा निरोप घेण्यास पंत गेले. तेव्हां वृद्धांच्या मनांत विचार आला कीं, जनार्दनांना नाथाच्या लग्नाविषयीं विनंती करावी. पंतांचे चरण धरून ते नम्रपणें म्हणाले कीं, गुरुराया, हा सर्व परमार्थाचा सोहळा ही तुझ्या कृपेची लीला आहे. नाथानें लग्न करावें हा आमचा मनोरथ पूर्ण करणारा, कृपाळा, तूंच समर्थ आहेस. तेव्हां नाथाला आज्ञा व्हावी. नाथाला बोलावून घेऊन पंतांनीं युक्तीनें विवाहाचा विषय काढला.

**म्हणे श्रीनाथा अतिसुबुद्धि। येथें राहिलें पाहिजे सविधी।**
**गृहस्थाश्रम यथाविधी। करुनि त्रिशुद्धि वर्तावें ॥**
**या उभयतांच्या अंगिकारा। केलें पाहिजे अति सत्वरा।**
**कोणेविशीं आग्रह बरा। नाहीं अधिकारा तुझिया ॥**
**होणार न चुके प्रमाणीं। यालागीं नाथ राहिला मौनी ॥**
**जैसे ठेवील चक्रपाणी। काय हानि त्यामाजीं ॥**
**देहाच्या माथां प्रारब्ध। देह तंव स्वप्न प्रसिद्ध।**
**तेथिंचा हर्षविषाद। मज संबंध काय याचा ॥**

अशा प्रकारें उपदेश आणि त्यावर उद्भवलेले विचार असल्यावर गुरूची आज्ञा उल्लंघन करण्याची कल्पनाहि ज्याच्या मनाला शिवणें

शक्य नव्हतें, त्या नाथांनीं मौन धारण करून संमति दर्शविली हें अगदीं साहजिक झालें. निरोप घेतांना पंत नाथांना म्हणाले, नाथा, तुझी सर्व लीला पाहून मी परमसुख पावलों. याच रीतीनें कालक्रमणा करून प्रेमकळा रक्षावी. नाथांनीं गुरुचरणावर माथा ठेवून ' निज निजरूप ऐक्यता । न भंगो कदाहि आतां । ऐसा वर असावा तत्त्वतां । ते निजात्मता सदोदित ॥ ' मला वियोगबाधा कांहींहि होऊं नये असा आशीर्वाद मागितला. तथास्तु म्हणून आपला कृपेचा वरदहस्त नाथांच्या मस्तकावर ठेवून सर्वांचा निरोप घेऊन पंतस्वामी दौलताबादेस परत गेले.

मराठी ... वा. क्र. (२९३

## गृहस्थाश्रम आरंभ

जनार्दनस्वामी गेल्यानंतर वृद्धांना नाथाची लग्नास संमति मिळाली म्हणून ते संतुष्ट झाले खरे. परंतु आपल्या डोळ्यांदेखत लग्न व्हावें अशी उत्कटेच्छा. नाथाकडे येणारे भाविक जन त्यांना म्हणत, जनार्दनकृपेनें सर्व यथास्थित होईल. नाथांचा नित्यक्रम चालू होता. त्यांचीं कीर्तनें अधिकाधिक लोकप्रिय होत चाललीं. पैठणपासून कांहीं अंतरावर असलेल्या विजापूर किंवा बैजापूर या गांवीं रहाणाऱ्या एका गृहस्थाची कन्या उपवर झाली होती. पैठणास नाथ हा वर आहे असें कळल्यावरून तेथें मुलगी देण्याचें त्या गृहस्थाच्या मनांत आलें. मुलीच्या लग्नाबद्दल बापाला नेहमींच काळजी वाटते. तो पैठणास आला. नाथांना अवलोकन करून व त्यांची सर्वतोमुखीं स्तुति ऐकून असा वर आपल्या कन्येला मिळाला तर खरोखर तिचें महद्भाग्य असें त्यास वाटलें. चारचौघांचे अभिप्राय त्यानें विचारले व वृद्धांकडे जाऊन घटित चांगलें उतरत आहे तरी माझ्या कन्येचा आपल्या नातवाकरितां स्वीकार करावा अशी नम्रतेनें विनंती केली. लग्न पैठणास होण्याचें ठरलें. उत्तम स्थळ मिळालें म्हणून आनंदानें सालंकृत कन्यादान करण्याचें त्या गृहस्थानें ठरविलें. त्या गृहस्थाचें

नांव वगैरे माहिती देणें केशव चरित्रकाराला आवश्यक वाटलें नाहीं. प्रतिष्ठानाच्या आग्नेय दिशेस विजापूर येथें नाथांचे आप्तस्वकीय होते. त्यांना कुंकुमांकित पत्रिका पाठविल्या. लग्नाला मंडळी जमली. त्यांत उद्धव नांवाचा एक आप्त सत्पात्र होता. नाथाला पाहिल्याबरोबर नाथावर त्याचें प्रेम आणि भक्ति जडली. सर्व तयारी करण्याचें काम त्यानें आपल्या अंगावर घेतलें. लग्नसमारंभ यथासांग शास्त्र आणि रूढी यांना अनुसरून पार पडला. वधूचें नांव गिरिजाबाई ठेविलें. उभयतां वृद्ध वडिलांना या लग्नसोहळ्याचें कौतुक पाहून आनंद झाला. सर्व मंडळी परत गेली परंतु उद्धवानें नाथांजवळ राहून सेवा करण्याची मनीषा प्रकट केली. नाथांनीं त्याची प्रेमभक्ति ओळखून त्याला ठेवून घेतलें.

गिरिजाबाई लग्नांत किती वयाची होती हें सांगतां येत नाहीं. नाथाचें वय पंचवीस सव्वीस तरी असावें. त्याकाळीं मुलगी आठ वर्षांची झाली म्हणजे तिला उपवर समजत. आईबाप तिला उजवण्याच्या तयारीला लागत. अकराबारा वर्षांची मुलगी अविवाहित राहणें डोक्यावरून पाणी गेल्यासारखें होई. आजाआजींच्या देखत नाथांच्या गृहस्थाश्रमास सुरुवात झाली. घरांतील सर्व कारभार, ने आण, कमी जास्ती, आहे नाहीं हें सर्व पहाण्याचें काम उद्धव करी. भोजनसमयाला कोणी अतिथि अभ्यागत आल्यास त्यास नाथाच्या घरीं भोजन निश्चित मिळे. उद्धवानें आपला वर्तनक्रम निरभिमानत्वानें ठेवला आणि नाथाची सेवा चालविली. रात्रीं नाथ एकटेच असले म्हणजे त्यांच्याशीं तो परमार्थाच्या गोष्टी बोले. एके दिवशीं नाथांनीं आपला मनोदय त्याला कळविला कीं षष्ठीचा महोत्सव कर्तव्य आहे, त्याकरितां साहित्य गोळा करा. कोणत्या निमित्तानें हा उत्सव करावयाचा हें कृपा करून निवेदन करावें अशी उद्धवानें विज्ञापना केली. नाथांनीं त्याची उत्कंठा जाणून ‘ बाबा, ऐक, सांगतों ’ असें म्हणून—

वद्य षष्ठि फाल्गुनमास । श्रीजनार्दन जन्मदिवस ।
दत्तात्रेय दर्शनविलास । प्राप्त त्यास तेचि दिनीं ॥
आम्हासी जनार्दनाचि भेटी । जाली तेव्हां हेचि षष्ठि ।
त्याचि योगें अभिनव दृष्टि । सर्व सृष्टि अद्वयत्वें ॥
श्रीजनार्दन स्वच्छंदगति । येचि दिनीं देहाकृति ।
लोपोनियां सुखस्थिति । निजधामाप्रति पैं गेला ॥
चारी पर्व निश्चित । उत्साह करणें निश्चित ।
जाणोनियां यथास्थित । करावें उचित साहित्या ॥
पांचवें पर्व येचि दिनीं । होतां पुढें देखसी नयनीं ॥
षष्ठि पंचपर्वश्रेणी । विख्यात जनीं भावार्थियां ॥

जनार्दन स्वामींचा जन्म, श्रीदत्तात्रेयाचा जनार्दनस्वामींस अनुग्रह, स्वामींचा नाथास उपदेश आणि दत्तात्रेय भेट, स्वामींची समाधि व एकनाथांची समाधि अशा पांच गोष्टी फाल्गुन वद्य षष्ठीस घडल्या. याकरितां पैठण प्रांतीं हा दिवस अत्यंत शुभ आणि पवित्र समजला जातो. किंबहुना साडेतीन मुहूर्तांपेक्षांहि फाल्गुन वद्य ६ चें महत्त्व अधिक मानलें जातें. नाथांनीं सुरू केलेला हा उत्सव अद्याप चालू आहे.

पहिला उत्सव फार थाटाचा आणि मोठ्या प्रमाणावर झाला. नाथांची उत्कंठा जाणून सामग्री तयार करण्यांत उद्धवानें कोणत्याहि तऱ्हेची उणीव राहूं दिली नाहीं. अनाथ, आंधळे, पांगळे, दुबळे, या सर्वांना नाथांच्या घरीं मुक्तद्वार होतें. अन्नदानासारखें दुसरें पुण्य नाहीं, त्यांतून तें क्षुधितांना देण्यांत महत्पुण्य. पण पापाचें क्षालन व्हावें अगर पुण्य-प्राप्ति व्हावी ही भावना नाथांच्या ठिकाणीं नव्हती. स्वतःचा जसा आत्मा तसाच इतरांचा अशी विश्वबंधुत्वाची जाणीव नाथांच्या अंतरीं बाणली असल्यामुळेंच, नाथांच्या पाशीं भेदाभेद मुळींच नव्हता. समताबुद्धीमुळें

भूतमात्रांविषयीं प्रेमभावना ठेवल्यामुळें उच्चनीचपणाच्या कल्पनांना त्यांच्या अंतःकरणांत मुळींच थारा नव्हता.

अन्नसंतर्पणाच्या बाबतींत मुक्तद्वार असल्यानें खर्च फार आला. सावकाराची उचापत करून हा सर्व खर्च उद्धवानें केला. उत्सवसमाप्ती-नंतर सावकारानें तगादा सुरू केला. सावकार म्हटला म्हणजे तो द्रव्यलोभी असावयाचा, हें अगदीं ठरलेलें! नाथ ज्या पुण्यनगरींत राहात होते तेथें जरी तो राहून आपली सावकारी करीत असला, तरी सत्पुरुषानें केलेल्या सत्कार्याप्रीत्यर्थ आपण कर्जाऊ रक्कम दिली आहे, तिच्याबद्दल निकडीचा तगादा करूं नये असा सुविचार त्याच्या मनाला शिवला देखील नाहीं. उलट ताबडतोब वसूल करण्याची खटपट जर आपण केली नाहीं तर कालावधीनें अशा साधुसंतापासून काय घेणार, असें त्यास वाटलें असावें. एके दिवशीं या सावकारानें उद्धवास बजावलें कीं, आजच्या आज सर्व रक्कम मिळाली नाहीं तर दुसरे दिवशीं उपोषण करीन. रक्कम बरीच मोठी होती. ती लागलीच कुठें मिळणार? उद्धव चिंतातुर झाला. नाथांच्या कानावर गोष्ट गेली. व्यवहारदक्षतेस अनुरूप असें सावकाराचें म्हणणें आहे. त्याला दूषण लावण्यास जागा नाहीं. आपणच व्यवस्था लावावयास पाहिजे होती, असे नाथांनीं उद्गार काढले. आपल्यामुळें सावकाराला उपवास घडणार, त्याच्या शरिराला क्लेश घडणार, तेव्हां आपणहि उपवास करण्याचें नाथांनीं ठरविलें.नाथांना उपोषण घडणार म्हणून खरी सहधर्मचारिणी सुशील गिरिजाबाई हिनेंहि त्यांचें अनुकरण केलें. अर्थात् परमभक्त उद्धव अन्नग्रहण कसें करणार? अंतःशुद्धीकरितां म्हणा किंवा कशाकरितां म्हणा, हें उपवासाचें तंत्र अलीकडेच महात्माजींनीं प्रचारांत आणिलें असें नसून नाथांनींहि तें आचरणांत आणलें, यावरून त्याची परंपरा जुनी आहे हें उघड आहे. नाथांनीं व त्यांच्या कुटुंबियांनीं उपोषण केल्याचा बोभाटा लागलीच पैठणांत झाला असावा आणि सर्वतोमुखीं तो चर्चेचा विषय झाला असावा. परमभक्ताचें संकट निवारण करण्याची भक्तवत्सल प्रभूला

काळजी. त्यानें उद्धवाचें रूप धारण करून रात्रींच्या वेळीं सावरकाराच्या घरीं जाऊन सर्व रकमेची सव्याज भरपाई करून पावती आणली आणि नाथांच्या नित्य वाचनांत असलेल्या पोथींत ती ठेवून दिली. इतक्या रात्रीं रक्कम आणून दिल्यामुळें व नाथांनीं सहकुटुंब उपोषण केल्याचें समजल्यानें, सत्पुरुषाला आपल्यामुळें फार कष्ट झाले म्हणून सावकाराला खेद वाटला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं क्षमा मागण्यासाठीं तो सावकार नाथांच्या वाड्यांत गेला. नाथांना साष्टांग प्रणिपात करून क्षमेची याचना केली. हें काय कोडें आहे, याचा उद्धवाला उलगडा होईना. नाथ पोथी वाचीत होते, त्यांच्या पावती दृष्टीस पडली. परमेश्वर आपल्या साह्यास धांवला हें नाथांनीं लागलीच जाणलें. खेद करण्याचें कांहींएक कारण नाहीं असें त्या सावकारास आश्वासन दिलें. तुम्हालाच आमच्यामुळें क्लेश झाले तरी क्षमा असावी, अशी नाथांनीं उलट प्रार्थना केली. धन्य नाथांची !

जे सत्पुरुष परमभक्त असतात त्यांना परमेश्वर कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें सदैव साहाय्य करतो ही गोष्ट निःसंशय आहे. जगांत सात्विकगुणी सत्प्रवृत्तीचे सज्जन फार थोडे असतात. स्वार्थांधांची संख्या अधिक असली तरी संतसेवा घडावी, लोकांच्या उपयोगी पडावें, परदुःख हरण करण्यास साहाय्य करावें असें वाटणारे व तदनुसार वागणारे कांहीं थोर उदार मनाचे लोक असतात. नाथांच्या उपदेशाचा आणि 'बोले तैसा चाले' अशा आचरणाचा अनुकूल परिणाम कांहींच्या मनावर झाल्याशिवाय कसा राहिला असेल? अशांपैकीं कोणातरी धनिक औदार्यवान नाथभक्तानें त्याच्या कानीं सावकाराच्या तगाद्याची गोष्ट गेल्यावर दैवी स्फूर्तीनें त्यानें सावकराचें सर्व देणें देऊन टाकलें असावें, ही गोष्ट अगदीं शक्य कोटींतील आहे. थोर साधुसंतांचा योगक्षेम यथास्थित रीतीनें चालत आल्याचें आपण ऐकलें आहे व पहातहि आहों. प्रत्येक सत्कृत्य दैवी स्फूर्तीनें म्हणजेच सत्त्वगुणाच्या प्रकर्षानें होतें. अशीं स्वयंस्फूर्तीनें सत्कर्में करणाऱ्या विभूति आणि त्यांचे अनुचर आजपर्यंत अनेक

झाले आहेत व सध्यांहि आहेत. नगरास नुकतेच एक वारकरी पंथाचे निरिच्छ बाबा होऊन गेले. एकदां त्यांच्या मनांत आलें कीं, सप्ताह करावा व नंतर भंडारा करावा. असें त्यांनीं म्हणावयाचा अवकाश, लागलीच सर्व सिद्धता. याप्रमाणें पुढें दरवर्षी त्यांचा मनोरथ पूर्ण होत असे. म्हणून आमचें म्हणणें असें आहे कीं, भल्या माणसांना त्यांच्या भल्या कृत्यांबद्दल धन्यवाद देऊन इतरांना तसें वागण्याची स्फूर्ति व ईर्षा उत्पन्न करण्याऐवजीं संतचरित्रांत प्रत्येक कामांत ईश्वराला निरानिराळीं रूपें धारण करून राबावयास कां लावावें बरें ? माणसाच्या दैवी गुणांचें श्रेष्ठत्व अजिबात कां विसरून जावें ? त्या दैवी गुणांचा प्रकर्ष कांहीं असामान्य विभूतींत असतोच ना ? तसें पाहूं गेलें तर सर्व परमेश्वरच करतो. कर्ता करविता तोच.

## नाथांचा आदर्श गृहस्थाश्रम

**सानन्दं सदनं सुताश्च सुधियः कान्ता न दुर्भाषिणी ।**
**सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ॥**
**आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मृष्टान्नपानं गृहे ।**
**साधोः सङ्गमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥**–भर्तृहरि.

गृहिणी गृहमुच्यते । गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते । यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । गृहस्वामिनीची पदवी याप्रमाणें प्राचीनांनीं वर्णिली आहे. गृहस्थाश्रम सर्वस्वीं गृहस्वामिनीवर अवलंबून असतो. सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम हा उच्च मानला आहे. त्याची प्रशंसा मनूनें केली आहे.

**यथा वायुं समाश्रित्य वर्तन्ते सर्वजन्तवः ।**
**तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्व आश्रमाः ॥**

गृहस्थाश्रमाचें केवढें महत्त्व आहे आणि त्या योगें किती मोठ्या प्रमाणावर सत्कार्य करतां येतें, हें नाथांनीं आपल्या संसारानें उत्तम रीतीनें दाखवून जनांस उत्तम उदाहरण घालून दिलें. संसार यथासांग होऊन जीवितसाफल्य होण्यास त्याचें मुख्य अंग भार्या होय. नाथचरित्रांत जो त्रोटक वृत्तान्त आहे आणि कांहीं प्रसंगांची जी हकिकत आली आहे तीवरून नाथांना अगदीं योग्य, अनुरूप व अनुकूल अशी धर्मपत्नी लाभली होती हें स्पष्ट दिसतें. पति हेंच दैवत आणि पत्नी ही देवता या आर्यसंस्कृतीच्या ध्येयानुरूप आमच्या समाजाची रचना झाली आहे व त्या आधारावर ती टिकली आहे. हें ध्येय स्त्रियांनीं आपल्यापरी पाळण्याची पुरुषांपेक्षां अधिक दक्षता बाळगिली आहे हें विचारी माणसें प्रांजलपणें कबूल करतील. नाथांची भार्या गृहकृत्यांत दक्ष, मृदुभाषिणी, उदार, मायाळू, कनवाळु, दयाळु, धर्मनिष्ठ आणि पतिनिष्ठ पतिव्रता साध्वी होती. भवनदी तरून जाण्यास अशा पत्नीचें सतत सहकार्य होतें. गिरिजाबाई माउलीप्रमाणें अनाथांना आणि अतिथि अभ्यागतांना प्रेमानें वागवी. रात्र असो दिवस असो, वेळ असो वा अवेळ असो, भूतदया दाखविण्यांत त्या माउलीला कधींहि आळस शिवला नाहीं. नाथांचा शब्द झेलावयास ती सदा तत्पर. भुकेलीं माणसें आलीं आहेत, त्यांना खाऊं घाला, असा नाथांचा आदेश मिळावयाचा अवकाश, कीं स्वयंपाकाची तयारी करण्याची सिद्धता. दाराशीं आलेला भुकेला माणूस सहसा या दयाळू माउलीनें विन्मुख जाऊं दिला नाहीं. अन्नदानासारखें पुण्य नाहीं. तें नाथांनीं गिरिजाबाईच्या स्वयंप्रेरित सहकार्यानें भरपूर गांठीं बांधलें. नाथांचें घर आनंदमय झालें. घरधनीण गोड आणि मधुरभाषिणी असल्यामुळें कर्कशपणाला त्या घरांत थारा मिळाला नाहीं. नाथांना मातृसुख लाधलें नाहीं. बालपणीं पुत्रवात्सल्यानें आजीनें लालन-पालन करून मातेची जागा करून काढली. गुरुगृहीं राहून अध्ययन वगैरेंत बारा वर्षें कालक्रमणा केल्यावर, गृहस्थाश्रमाचा अंगिकार

केल्यातर स्त्रीच्या ठायीं वसणाऱ्या सर्व सद्‌गुणांचा अनुभव घेत नाथांनीं आपला प्रपंच असा थाटला कीं, सर्वतोमुखीं धन्यवाद मिळविले. ‘प्रपंच साधुनी परमार्थाचा लाभ ज्यानें केला। तो भला भला।’ असें पैठणच्या सुप्रसिद्ध कवीनें काढलेले उद्गार नाथाला उद्देशूनच असले पाहिजेत.

नाथ गृहस्थाश्रमी असून स्थितप्रज्ञ होते. भगवंतांनीं स्थितप्रज्ञाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत, ज्यांचें विवेचन ज्ञानदेवांनीं उत्तम केलें आहे आणि एकनाथी भागवतांत ज्याचा विस्तारपूर्वक विचार झाला आहे त्या स्थितप्रज्ञत्वाच्या गुणांचा समुच्चय नाथांच्या ठिकाणीं वास करीत होता. स्थितप्रज्ञाची भूमिका कांहीं आधुनिक तार्किकांना अशक्य कोटींतील वाटते! पण सरड्या, तुझी धांव कोठवर—असें म्हणून सोडून द्यावें झालें!

पंच पंच उषःकालीं उठून ईशचिंतन केल्यावर प्रातर्विधि झाल्यानंतर गंगास्नान करावयाचें, तेथेंच संध्यावंदन वगैरे झाल्यानंतर स्वगृहीं आल्यावर पूजाअर्चा. तदनंतर गीताभागवतादि ग्रंथवाचन—माध्यान्ह संध्या झाल्यानंतर अतिथीसह भोजन. ज्ञाते आणि विद्वान् मंडळी त्यांच्याकडे भोजनोत्तर येण्याचा नित्यक्रम असे. त्यांजबरोबर अध्यात्मविषयावर चर्चा चाले. तिसऱ्या प्रहरीं ज्ञानेश्वरी, भागवत, रामायण यांपैकीं एखादें पुराण सांगणें. सायंसंध्याहि गंगातीरीं कधीं चुकावयाची नाहीं. कीर्तन जनहिताविषयींच्या कळकळीनें ओथंबलेलें असावयाचें.

नित्य हें अनुष्ठान। प्रातःकाळीं करुनि स्नान। नित्यनेम सारून। पुराणपठण प्रिय सदा॥ माध्यान्हीं गंगातीरीं। ब्रह्मयज्ञादि सर्व करी। ब्राह्मणपूजा तदनंतरीं। ब्रह्मभाव अंतरीं बोधठसा॥ ब्राह्मण तीर्थप्राशन। केलियावरी आपण। करावें युक्त भोजन। तीन प्रहर वर्तन यापरी॥ त्यानंतरें निजासनीं। बैसोनियां समाधानीं। ग्रंथटीकाकाव्य वदनीं। स्रवे वाणी अमृतवृष्टि॥ संध्याकाळीं संध्यावंदन। करूनि करावें

हरिकीर्तन । एवं नित्य अनुष्ठान । जगदोद्धारण जगहिता ।। आरती जालिया पाही । शेषरात्र उरालियाही । आसनींच कांहींबाहीं । निद्रेसीही मान दिजे ।। पंच पंच उषःकाल । एकांत भजनवेळ । होतांचि प्रातःकाळ । सारी निर्मळ स्नानातें ।। अहोरात्र परमार्थ । आचरे लोकसंग्रहार्थ । ऐसा श्रीनाथ समर्थ । क्षणहि व्यर्थ जावों नेदी ।। याप्रमाणें समर्थ श्रीनाथ अहोरात्र लोकसंग्रहासाठीं परमार्थ आचरण्यांत सर्व काळ घालवीत. एक क्षण देखील व्यर्थ जाऊं देत नसत.

## नाथांचें पुराण आणि कीर्तन

**धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।**
**तै आम्हां येणें घडे । संसारस्थिति ।।**

**नाना मतें पाषांड । कर्मठता अति बंड ।**
**तयाचें ठेंचणें तोंड । हरिभजनें ।।**

नाथांनीं संतांच्या कार्याविषयीं केलेल्या या उल्लेखाचें भगवद्वचनाशीं साम्य आहे. स्वतःच्या ध्येयास अनुरूप असा त्यांनीं लोकांस उपदेश करून त्यांना सन्मार्गाला लावण्यास नाथानीं पुराण आणि कीर्तन या दोन प्रभावी आणि परिणामकारक साधनांचा यशस्वी रीतीनें उपयोग केला. जनतेला ज्ञानलाभ होईल आणि कर्तव्यनिष्ठा बळावून जन्माचें साफल्य करून घेतां येईल असें त्यांच्या कीर्तनाचें धोरण असे. एतद्विषयक नाथांचें पुढील सुंदर पद फार लोकप्रिय झालें असून तें पुष्कळांच्या तोंडीं आहे.

**संतसंगें अंतरंगें नाम बोलावें ।**
**कीर्तनरंगीं देवासन्निध सुखें डोलावें ।।**

**सगुणचरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं ।**
**निराभिमानें सज्जनवृंदें आधीं वंदावीं ।।**

**भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरां न कराव्या ।**
**मनोभावें वैराग्याच्या युक्ति जोडाव्या ॥**
**जेणें हृदयीं सत्वर मूर्ति ठसावे हरीची ।**
**ऐशी कीर्तन मर्यादा आहे या संत घरची॥**
**श्रवण मननें अद्वय भजनें वाजवी करटाळी ।**
**एकाजनार्दनीं मुक्ति झाली तत्काळीं ॥**

हरिकीर्तन श्रवण करून मनुष्याची अंतःकरणशुद्धि व्हावी, संसारांतील तापत्रयापासून सुटका मिळून मुक्ति मिळावी आणि हरिस्मरण करीत राहून प्राप्तकर्म उल्हासानें ईश्वरार्पण बुद्धीनें करीत राहावें हा नाथांच्या उपदेशाचा मुख्य उद्देश होता. कीर्तनाचें महत्त्व ज्यांत वर्णन केलें आहे असे नाथांचे उद्गार त्यांच्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं विखुरलेले आहेत. लोकांना पटेल, त्यांच्या मनावर चांगला ठसा उमटेल अशा आबाळ सुबोध रीतीनें ते पुराण सांगत आणि कीर्तनांत हरिनामाचा गजर करून सर्वांचीं मनें आकर्षून घेत. कीर्तनाला रंग चढला म्हणजे कीर्तनकार आणि श्रोते तत्क्षणीं तन्मय होऊन जाणें अशी अलौकिक शक्ति नाथांच्या वाणींत होती. श्रोतृगणाची काय अपेक्षा आहे, हें जाणून त्यांच्या आत्म्यांशीं स्वतःच्या आत्म्याचें तादात्म्य करूं शकतो तोच खरा कीर्तनकार आणि लोकशिक्षक. असा लोकमान्य शिक्षक लोकवंद्य होऊं शकतो. हें स्थान नाथांनीं आपल्या अलौकिक कामगिरीनें मिळविलें. जनीं जनार्दन ही त्यांची अढळ श्रद्धा होती. विषयनिरूपणाची उभारणी नाथ स्वानुभवावर करीत असल्यामुळें कीर्तनास अपार श्रोतृसमुदाय लोटत असे यांत नवल नाहीं. लोकशिक्षणाच्या कामीं कीर्तनाला नाथांनीं विशेष प्राधान्य दिलें होतें. नाथ म्हणतात :

कीर्तनें स्वधर्म वाढे । कीर्तनें स्वधर्म जोडे । कीर्तनें परब्रह्म आंतुडे । मुक्तिकीर्तनापुढें लाजोनि जाये ॥ भावें करितां हरिकीर्तन । तेणें संतोषे

जनार्दन । उभयतां पडे आलिंगन । मिठी परतोन सुटेना ॥ तेव्हां सबाह्याभ्यंतरीं । देव प्रगटे चराचरीं । दुजें देखावया संसारीं । सर्वथा उरीं उरेना ॥ एवं योगयोगादि तपसाधनें । पोरटीं केलीं हरिकीर्तनें । कलियुगीं नामस्मरणें । जड उद्धरणें कीर्तनीं ॥

—ना. भा. अ. ५

नाथांचें पुराण आणि कीर्तन श्रवण करून श्रोत्यांची काय अवस्था होते असे हें चरित्रकार केशवानें सांगितलें आहे.

**भक्तिज्ञानवैराग्य युक्त । व्याख्यानीं रस अद्‌भुत ।**
**नित्य नूतन गोडी उपजत । प्रेम ओसंडत श्रवणार्थिया ॥**
**लांचावलें सुखें चित्त । नित्य आनंद भोगीत ।**
**उत्कर्ष वाढला भक्तिपंथ । नामगजर होत घरोघरीं ॥**

जनमनावर उत्कृष्ट परिणाम होण्यास त्यांची अमोघ वाणी तर होतीच पण तिला शुद्ध आचरणाची जोड मिळाली होती. निरलसता आणि निर्लोभता यांजमुळें जनसमूह त्यांनीं उपदेशिल्या मार्गाकडे वळला. एखादा कीर्तनकार वक्तृत्वशाली असतो, सशास्त्र आणि सुरेल गायनानें गुंगविणारा असतो, निष्काम कर्मावर निरूपणहि यथासांग करतो; परंतु कीर्तनसमाप्तीचे प्रसंगीं प्राप्तीवर त्यानें दृष्टि ठेवली कीं त्याची किंमत कमी झाल्याशिवाय राहात नाहीं. नाथांना कशाचीही अपेक्षा तर नव्हतीच पण आपण पुराण आणि कीर्तनानें शेकडों लोक भक्तिमार्गाला लावले म्हणून त्यांना अभिमानहि कधीं शिवला नाहीं. उलट देवाच्या साहाय्यानें सर्व कांहीं घडतें असे लीनतेचे उद्गार त्यांनीं काढले आहेत.

**तुम्ही करूनिया सेवा । वाढविलें मज नांवा ।**
**ऐसा कृपाळु उदार । पांडुरंगा तूं निर्धार ॥**
**नानापरी उपचार । नित्य पुरवा अपार ।**
**उतराई नोहे देखा । म्हणे जनार्दन एका ॥**

मुसलमानी राज्य, त्याजकडून होणारा हिंदुधर्मीयांचा छळ, या गोष्टी लक्षांत घेतां राजकारणाचा स्पष्ट उल्लेख करणें शक्य नव्हतें. मुख्य धर्मरक्षणाचें कार्य नाथास करावयाचें होतें.

## समाजसेवा

दुःखितांचें दुःख निवारण करणें, पीडितांची पीडा दूर करणें, अनाथांना थारा देणें, संकटग्रस्तांना संकटांतून मुक्त करणें, क्षुधितांची क्षुधा शमन करणें, तृषार्तांना जल देणें, वस्त्रहीनांना शरीरसंरक्षणासाठीं वस्त्रप्रावरणाची तरतूद करणें, भयभीतांना अभय देणें, अज्ञान्यांना सज्ञान करणें, दुष्टांना सज्जन बनवणें, सैरावैरा धांवणाऱ्यांना सन्मार्ग दाखविणें, मोहग्रस्तांचा मोह सारणें, जडवाद्यांना अध्यात्माची ओळख करून देणें, सर्वभूतांच्या ठायीं समदृष्टि ठेवून त्यांचें हित साधणें वगैरेंचा जनसेवेच्या क्षेत्रांत समावेश होतो. इतक्या उंच पातळीवरून जनसेवा करून धन्यवाद मिळवून आपलें नांव अजरामर करून ठेवणाऱ्या पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या देशांत आजपर्यंत अनेक थोर विभूति होऊन गेल्या आहेत. श्रीराम, श्रीकृष्ण, आणि बुद्ध, ज्यांची गणना अवतारांत करण्यांत येते, यांची गोष्ट जरी सोडली तरी ठळकपणें अगदीं मोजक्या विभूतींचा नामनिर्देश करावयाचा म्हटल्यास व्यास, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, नामदेव, रामदास, रामानंद, कबीर, प्रभुचैतन्य, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, गोखले, टिळक, गांधीजी हीं नांवें लागलीच स्मृतिपंथांत आल्याशिवाय राहात नाहींत. ‘बुडत हे जन। पाहवेना डोळा’ अशी जनसेवेची त्यांना तळमळ लागली होती. आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं ते अत्यंत कळकळीनें झटले आणि श्रमले पण खेद कधींहि केला नाहीं. समाजसेवा हा त्यांचा ध्रुवतारा असल्यानें त्यांचा किती जरी उपहास झाला, निंदकांनीं त्यांची

किती जरी निंदा केली, दुष्टांनीं त्यांना किती जरी छळलें, पराकाष्ठेच्या हालअपेष्टा जरी त्यांस सोसाव्या लागल्या तरी स्थितप्रज्ञ असल्यामुळें स्वधर्मापासून म्हणजे स्वकर्तव्यापासून यत्किंचित् ढळले नाहींत.

अशा थोर विभूतींपैकीं श्रीएकनाथ महाराज एक प्रमुख होते. त्यांचा नित्याचा जीवनक्रम समाजसेवेवर उभारलेला होता हें मागील प्रकरणांत आपण ढोबळ दृष्टीनें पाहिलें आहे. आतां या प्रकरणांत समाजाचे निरनिराळे घटक त्यांजकडे कोणत्या दृष्टीनें पहात होते याचें दिग्दर्शन करावयाचें आहे. सर्व चराचर जगांत नाथांना प्रेमळ दयाळु जनार्दनमूर्ति दिसत होती. त्या दृढ भावानें ते कीर्तन करीत. नाथांच्या पुराण आणि कीर्तनाची कीर्ति दूरवर पसरली. लोक भक्तिमार्गाला लागले, सदाचारसंपन्न होऊं लागले. दूरदूरचे लोक नाथदर्शनाला, भेटीला आणि नाथांच्या वाणींतून स्रवणाऱ्या अमृतधारांच्या वर्षावाचा लाभ मिळावा म्हणून पैठणास येऊं लागले. विठ्ठलाचें दर्शन व्हावें म्हणून पंढरीला एक भक्त तपश्चर्या करीत बसला होता. त्याला दृष्टांत झाला कीं, पैठणास जा, तेथें नाथमंदिरांत तुला माझें दर्शन होईल आणि तूं अंतरीं सुखी होशील. जशी जो दृष्टि ठेवील तसें त्याला दिसतें. नाथसदनीं आल्यावर तो कीर्तनाचा समारंभ, हरिनामाचा गजर, कीर्तनकार नाथ आणि ध्रुपदधारी ब्राह्मण यांची तन्मयता अनुभवून त्या ब्राह्मणाचा हर्ष मावेना, त्याला विठ्ठलमय दिसायला लागलें. त्यानें साष्टांग नमस्कार घालून नाथांच्या आणि त्यांच्या ध्रुपदधाऱ्याच्या चरणावर मस्तक ठेवलें. मला विठ्ठलदर्शन झालें अशी पंढरीच्या ब्राह्मणानें गर्जना केली, तेव्हां नाथांचा अपार महिमा लहानथोर वर्णन करूं लागले. या ब्राह्मणाप्रमाणेंच अनेक भक्तांना अनुग्रह झाला. ते नाथांच्या भजनीं लागले. त्यांच्या उपदेशाप्रमाणें वागूं लागले.

कोणताहि धर्म घ्या, आणि त्या धर्मानुयायांतील सनातनी म्हणविणारे लोक घ्या. त्याच्या अनुयायांमध्यें अथवा त्या सनातन्यांमध्यें एक कर्मठांचा

वर्ग असतो. नाथांनीं पैठणची ‘ प्रतिष्ठान महाक्षेत्र । काशीसमान अतिपवित्र । दाक्षिणदेशीं माहिमा थोर । पावन अग्रहार शिष्टांचें ॥ ’ एवढी प्रतिष्ठा स्थापन केली. पण कर्मठ ब्राह्मण जळफळूं लागले. त्याचा संताप त्यांना आवरेना, संतापातिरेकानें ते बरळूं लागले. ही एकनाथाची धाड कशाला निर्माण झाली? आजपर्यंतची रीतभात यानें लोकांना सोडावयास लावली. आम्हांला कोणी मानीनासे झाले. एकनाथ भला दिसतो, पण यानें आमचा संसार बुडविला. आम्हीं लोकांना अनेक व्रतें करायला लावून प्राप्ति मिळवीत होतों. तें सर्व खुंटलें. भोळ्या लोकांना यानें मोहिनी घातली आहे आणि त्यांना ठकवीत आहे! याला आतां काय उपाय योजावा म्हणून एकत्र जमून आपापसांत ते विचार करूं लागले.

**मिळोनियां पांच पंचवीस । बैसोनि रिकामे चावडीस ।**
**म्हणति करोनि विचारास । एखाद्या पैशुन्यास शोधावें ॥**
**अहो धोंडभट्ट कोंडभट्ट । वेणीं यावें शामभट्ट ।**
**पाचारून गजाननभट्ट । विचार निकट करा म्हणती ॥**
**तुमचे आमचे यजमान । केवळ अज्ञान होऊन ।**
**संसार सोय सोडून । महाराष्ट्र पुराण ऐकती ॥**
**स्नानसंध्येची अधिक आस्था । जाली त्यांची हे अवस्था ।**
**सांडूनि तुमची संस्था । कर्म अन्यथा मांडिलें ॥**
**नेणों तया एकनाथें । चेटक काय केलें यातें ।**
**रात्रंदिवस त्याचे मतें । नुसत्या नामातें घोकिती ॥**
**आहीं वेदशास्त्रसंपन्न । आम्हां न पुसती यजमान ।**
**सर्वस्वें एकनाथास मानून । रामकृष्ण म्हणोन नाचती ॥**
**सांडूनियां लोकलाज । कीर्तनीं नाचती निर्लज्ज ।**
**किती सांगावें हें चोज । कांहीं उमज धरितीच ना ॥**

**डोळेझांक करितां आतां । प्रवृत्तिमार्ग बुडेल तत्त्वतां ॥**
**यालागी करून ऐक्यता । याचि पंथा मोडावें ॥**

उत्पन्नाला काट बसला. कोणी पुसेनासें झालें. यजमान देखील दुर्लक्ष करावयास लागले. मग या सर्वाला कारण अशा व्यक्तीची प्रतिष्ठा कमी कशी होईल, नव्हे, त्याची अप्रतिष्ठा कशी करतां येईल, या विचाराचा पगडा बसून ब्राह्मणांनीं संगनमत केलें. मान्यतेला धक्का बसविण्याचे प्रतिष्ठित गणले गेलेले दोन मार्ग. धर्माच्या नांवावर दोष काढून यथेच्छ निंदा करणें हा एक, आणि वाळींत टाकणें म्हणजे रोटीबेटीव्यवहार बंद करणें हा दुसरा. पहिल्या मार्गांत निष्कारण कुरापती काढून सळो का पळो अशी अवस्था निर्माण करण्याच्या साधनांचा उपयोग करावा लागतो. दुसऱ्या मार्गांत जुल्म-जबरदस्तीचा उपयोग करण्यांत येतो. या दोहोंचाहि, त्यांचा उत्कर्ष न साहणाऱ्या लब्धप्रतिष्ठितांकडून नाथांवर प्रयोग झाला. त्याला त्यांनीं मोठ्या धैर्यानें आणि शांतीनें तोंड दिलें, हें त्यांच्या आयुष्यांतील ज्या ठळक गोष्टी ग्रथित करून ठेवल्या आहेत त्यांवरून स्पष्ट होतें.

थोर पुरुष निंदकांकडून होणारा छळ अनुपमेय क्षमाशीलतेनें सहन करीत असतात. क्षमा हा गुण संतांच्याच ठिकाणीं सांपडतो. ‘ क्षमा वसे ज्याचे चित्तीं । त्याची धरावी संगती । हेंचि नावडतें मना । देवा पुरवावी वासना ॥ ’ अशी तुकारामानें देवाजवळ याचना केली आहे. मनाचा क्षोभ होऊं न देतां शांति बाळगणें हें फार कठीण पण संतपद इच्छिणाऱ्याला अत्यंत आवश्यक आहे. संताचीं वस्त्रें धारण करणारे आणि मुखानें वेदांताचा प्रवाह सोडणारे मनाविरुद्ध कांहीं झाल्याबरोबर जमदग्नीचा अवतार धारण करणारेच फार असतात. अशांविषयीं नाथ म्हणतात:

**शिष्याचे क्षोभ न साहवती । निंदकाची निंदा न जिरे चित्तीं ।**
**तैं तो कोरडाचि परमार्थी । क्षोभें निश्चितीं नागवला ॥**

कुटाळांनीं नाथांचा छळ करून त्यांच्या शांतीची कसोटी पहाण्याचा जणूं काय विडाच उचलला होता. नाथांच्या घरीं मुक्तद्वार होतें. कोणालाहि अन्न मिळे. मग ब्राह्मणांना मिळाल्यास त्यांत काय नवल आहे? नाथांची ही वृत्ति पाहून पांथस्थ ब्राह्मणांना त्यांच्या घरीं वेळीं अवेळीं पाठविण्याचा नाथांच्या छळकांनीं क्रम ठेवला. एकदां रात्रीच्या समयीं चार आगंतुक पांथस्थ ब्राह्मण आले. त्यांना नाथांचें घर दाखविण्यांत आलें. सात दिवसांची पावसाची झड त्यावेळीं लागली होती. त्या ब्राह्मणांनीं नाथांच्या दाराशीं येऊन हांक मारली. नाथांनीं उद्धवाला दरवाजा उघडण्यास सांगितलें. ब्राह्मण आंत आल्यावर, आम्ही क्षुधित आहोंत असें म्हणाले. इतकी रात्र झाली, आतां कसलें भोजन, असें सामान्यपणें कोणीहि म्हणेल. पण नाथ म्हणजे भूतमात्राविषयीं मूर्तिमंत कळवळा. उद्धवाला त्यांनीं ब्राह्मणांची इच्छा कळविली. गिरिजा माउलीहि उठली. अन्न आहे, शिजविण्यास माउली सिद्ध आहे, पण इंधन नाहीं. हे उद्धवाचे खेदाचे उद्गार ऐकून नाथ म्हणतात, अरे बाबा, हें सर्व घर इंधनानें भरलें आहे. मंचक लांकडाचाच आहे, त्याचीं घ्या लांकडें. स्वयंपाक झाला. इतक्या रात्रीं ब्राह्मण जेवून तृप्त झाले. दुसऱ्या दिवशीं त्यांच्या मुखानें नाथांची स्तुति ऐकल्यावर त्या कुटाळांच्या तोंडून देखील 'धन्य धन्य नाथ' असे त्यांच्या कुटाळपणाला विरुद्ध उद्गार निघाले! पण नाथांचा छळ करण्याचें त्यांनीं सोडलें नाहीं. पण नाथ या कुटाळांच्या कसोटीला हटकून उतरले!

एकदां पितृतिथीच्या दिवशीं स्वयंपाक झाल्यावर नाथांच्या अंगणांत तीन मलंग आले. ते वेषधारी कोणी असोत किंवा म्लेंच्छ असोत. ते हिंदु नव्हते असें चरित्रकार म्हणतो. ब्राह्मण तर नव्हतेच नव्हते. फकिरांत मलंग हा एक पंथ आहे. भुके आहों—आम्हांला भोजन दे, असें त्यांनीं म्हटल्याबरोबर नाथांनीं त्यांना जेवूं घातलें. ते वाड्यांतून बाहेर पडावयाची वेळ आणि निमंत्रित ब्राह्मण गंगेवरून स्नान करून

येऊन नाथगृहीं प्रवेश करण्याची वेळ एकच आली. मलंगांनीं तृप्तीची ढेकर दिली आणि नाथाला आशीर्वाद दिला. हा प्रकार पाहून ब्राह्मण कोपायमान झाले. पितृतिथीच्या दिवशीं पितरस्वरूपी ब्राह्मणांना संतुष्ट करण्यापूर्वीं तूं मलंगांना जेवूं घातलेंस, आतां आमचें येथें बसण्याचें काय प्रयोजन? 'श्राद्धीं मलंगांना जेवूं घातलेंस–बाबा, तुझ्या वडिलांचें धन्य सुकृत–' वगैरे खूप निर्भर्त्सना केली. त्यांची कोपवाणी श्रवण करून नाथ म्हणाले, 'ते क्षुधित होते म्हणून जेवूं घातले. क्षमा करा. पुन्हा स्वयंपाक करवितों आणि यथासांग श्राद्ध करतों.' नाथाच्या उपाध्यायाला ते ब्राह्मण म्हणाले कीं, तुमचे यजमान स्वतःला मोठे पंडित म्हणवतात आणि श्राद्धाला मलंग बसवतात, कशी आहे गाढ विद्वत्ता! आणखी भ्रष्टाचार आणि स्वैराचार तो काय असणार? एकदां तोंडाचा पट्टा सुटल्यावर आणि तो सोडण्यासारखी आयती सुसंधी सांपडल्यावर, मग त्या ब्राह्मणांनीं तरी मागें कां घ्यावें? नाथांवर बहिष्कार घालण्याचा उच्चार झाला. बहिष्कारास्त्र म्हणजे ब्राह्मणांच्या हातीं असलेला अणुगोळाच! नाथांनीं वारंवार क्षमा मागितली. पण ते अविवेकी ब्राह्मण उपहास करीत राहिले. 'नाथमहाराज, आपला पुण्यप्रभाव इतका दांडगा आहे कीं, आपले स्वर्गस्थ पितर भोजनाला आपण आणूं शकाल!' नाथांच्या अढळ शांतींत यत्किंचितहि चंचलता क्षोभ उत्पन्न करणाऱ्या व्यंगोक्तीनें उत्पन्न झाली नाहीं. नाथ म्हणाले, तथास्तु–आपलें ब्राह्मणवचन खरें होवो.

**गगनपंथें तिन्ही मूर्ति । येऊन स्वस्थानीं बैसती ।**
**पाहतांचि ब्राह्मण समस्तीं । माना हालविती ते काळीं ॥**
**गळां विराजत ब्रह्मसूत्रें । शुद्ध नेसोनियां धोत्रें ।**
**हातीं सुवर्णाचीं पवित्रें । मुखीं वेदमंत्र पढताती ॥**
**तेजस्वी दैदिप्यमान । ब्रह्मस्थिति परिपूर्ण ।**
**नाथें करून वंदन । सुखसंपन्न निजस्थिती ॥**

हा चमत्कार पाहून निमंत्रित विप्र, जे तेथें मुद्दाम काय होतें तें पहाण्यास जमले होते, ते अगदीं थक्क झाले. विप्रांचें छळण खुंटलें आणि ते निवांत बसले. हा कधीं न घडणारा चमत्कार खरोखरच घडला असेल किंवा जशी ज्याची भावना असेल तसा त्यानें तो खरा खोटा मानावा. नाथांची शांति लवमात्र ढळली नाहीं, हा चमत्कार मात्र दृष्टोत्पत्तीस पडला. ब्राह्मणांचें गर्वहरण झालें. मुकाट्यानें ब्राह्मण पाटावर येऊन बसले. लौकिक दृष्टया श्राद्ध पार पडलें. इतकें झालें तरी पुन्हा नाथांचा छळ करणें ब्राह्मणांनीं पुढें बंद ठेवलें असें नाहीं.

गरीब ब्राह्मणानें भिक्षा मागून द्रव्य गोळा करून आपल्या मुलाची मुंज करण्याचा परिपाठ फार जुना आहे. एकदां असाच एक ब्राह्मण पैठणास आला. पांथस्थावर टेहेळणी करणारे ब्राह्मण क्षेत्राच्या ठिकाणीं असतात. शिवाय नाथांना हरतऱ्हेनें छळणारी चांडाळचौकडी पैठणास होतीच. या पांथस्थ आणिं गरजू ब्राह्मणास या कुटाळांनीं गांठलें. त्याला मुलाच्या व्रतबंधाकरितां दोनशेंची अपेक्षा होती. त्याला सांगितलें कीं, नाथ फुशारकी मारतो कीं आपण कधीं कोणावर रागावत नाहीं. ही त्याची घमेंड तूं घालवलीस, जर नाथाला राग आणलास, तर आम्ही तुला दोनशें देऊं. ब्राह्मणाला वाटलें, माणसाला राग येत नाहीं असें कसें होईल? आपण नाथाला सहज रागवायला लावूं नि दोनशें रुपये मिळवूं. तो नाथांच्या वाड्यांत गेला आणि नाथ पूजा करीत बसले होते तेथें जाऊन अंगावरील कपड्यांसुद्धां त्यांच्या मांडीवर बसला. नाथांनीं त्याला कुरवाळलें आणि आपल्या भेटीचा लाभ झाला, आनंद वाटला, असें म्हटलें. ब्राह्मण खजील झाला, नमस्कार करून दूर बसला. पहिला बार तर फसला असें वाटून तो ब्राह्मण खिन्न झाला. नाथांनीं त्याला भोजनासाठीं राहण्यास सांगितलें. पात्रावर बसल्यावर शेवटीं गिरिजाबाई तूप वाढावयास आल्या. ओणव्यानें वाढीत असतां ब्राह्मण उडी मारून त्यांच्या पाठीवर बसला. नाथ म्हणाले, हं, संभाळा. बाळ पडेल बिडेल!

कांहीं पडूं देणार नाहीं, मला हरीला पाठीवर घेऊन काम करण्याची संवय आहे, असें ती माउली उद्गारली. झालें. पाण्यांत ढेंकूळ विरघळावें तसा तो ब्राह्मण विरघळला आणि नाथांचे चरण धरून त्यांना खरी हकीकत सांगितली. नाथ हंसले आणि म्हणाले, प्रथमच कां नाहीं सांगितलेंस दोनशें रुपये पाहिजेत म्हणून ? इतके विनाकारण श्रम वांचले असते. ही गोष्ट वर्णन केल्याप्रमाणेंच हुबेहूब घडली असेल, तींत अतिशयोक्तीचा भाग नसेल किंवा रानदांडगेपणाच्या ऐवजीं उद्धटपणाचा प्रकार निराळ्या तऱ्हेचा असेल, अशी वस्तुस्थिति असण्याचा संभव आहे. पण या गोष्टीवरून नाथांची पराकोटीची शांति मात्र कसोटीला लागली ! असे शांतिब्रह्म फार विरळ म्हणूनच ते जगद्वंद्य होतात.

समाजसेवेचे विविध प्रकार आहेत. जनमनाला विवेकभ्रष्टतेनें आंधळा भाविकपणा ग्रासणार नाहीं अशी काळजी समाजाचे नेते म्हणजे समाजाचे खरे सेवक घेत असतात. पैठणांत एक परमहंस संन्यासी होता. विरक्त विरक्ताला चटकन् ओळखतो. दोघांच्या भेटींत अंतरींची खूण एकमेक जाणतात. हा परमहंस नेहमीं आत्मस्थितींत गर्क असे. ' आत्मवत् सर्वभूतानि ' अशी त्याची वृत्ति होती. जो भेटे त्याला तो लोटांगण घाली त्यामुळें त्याचें नांव दंडवत पडलें. नाथांचा तो परमभक्त होता. वाटेल त्याला तो दंडवत घाली म्हणून लोक त्याला पिसाट समजत. नाथ-दर्शनाला तो नित्य नेमानें येई. लहर लागे तेव्हां पुराण श्रवण करी. एके दिवशीं तो गंगेवर स्नानाला जात असतां कुटाळांनीं वाटेवर मेलेलें गाढव पडलें होतें त्याला लोटांगण घालावयास लावलें. त्यांना त्यांच्या इच्छेनुरूप केलें. कुटाळ उपहासानें म्हणाले, अरे मेल्या, गाढवाला काय वंदन करतोस ? जिवंत करून त्याला वंदन केलेंस तर खरा परमहंस ! पुन्हां त्या गाढवाला त्यानें लोटांगण घातलें नि तें गाढव उठून चलनवलन करूं लागलें. दंडवत स्वामींकडून घडलेल्या या चमत्काराची वार्ता सर्व पैठणभर पसरली. पण अशा सिद्धींत परमार्थ नसतो. योग्यानें ऋद्धिसिद्धीच्या मोहांत पडून

योगभ्रष्ट होऊं नये असें ज्ञानेश्वरांनीं स्पष्टपणें बजावलें आहे. नाथांनींहि 'नाहीं परमार्थ सिद्धीमाजीं' असें स्पष्ट म्हटलें आहे. कारण मग तो साधक सिद्धीच्या नादांत गुरफटून जातो आणि भगवत्प्राप्ति दूर राहते. भोंदू लोक अल्पस्वल्प सिद्धींच्या अनुकूलतेनें भोळ्याभावड्यांना बुचाडण्याचा धंदा चालवितात. नाथांसारखे सत्पुरुष या प्रकाराला सर्वथैव त्याज्य मानतात. एकनाथी भागवताच्या पंधराव्या अध्यायांत ऋद्धिसिद्धीचें वर्णन देऊन परमार्थेच्छूनें त्यांच्या नादांत पडूं नये असा स्पष्ट इशारा देण्यांत आला आहे. त्यांनीं दंडवत स्वामीला सांगितलें, बाबा, हें बरें केलें नाहींस. लोक तुझ्यामागें एकसारखे लागतील. राज्यकर्ते यवन तुला छळतील. करितां तूं समाधी घे. स्वामीनें देहत्याग केल्यावर नाथांच्या छळकांना नाथांचा छळ करण्यास पुन्हा एक संधी सांपडली. दंडवत स्वामींच्या मरणाचा दोषारोप त्यांनीं नाथांवर केला. नाथांच्या हातून ब्रह्महत्त्येचें पाप घडलें असें ते म्हणूं लागले. पण केशव म्हणतो, निश्चयाचा मेरू अचळ। श्रीनाथ मनीं निश्चळ। प्रसन्न श्रीमुखकमळ। बुद्धि अविकळ निजस्थिति ॥' या हत्त्येचें प्रायश्चित्त म्हणून पाषाणाच्या नंदीला जर गवत खावयाला लावलें तर पापक्षालन होईल असा प्रायश्चित्तविधि ब्राह्मणांनीं सांगितला. नाथांच्या हातचा गवताचा घांस नंदीनें जीभ बाहेर काढून तोडांत घेतला. तेव्हां ब्राह्मणांनीं नाथांस दोषमुक्त केलें. तो नंदी अद्याप पैठणास नदींत दाखविण्यांत येतो. या सर्व प्रकारांत कितपत तथ्य आहे हें सांगणें अगर निश्चित करणें कठीण आहे. कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् अशी शक्ति नाथांच्यापाशीं होती असें मानल्यास मग कोणतीच गोष्ट अशक्य नाहीं. पण मेलेल्या गाढवाला जिवंत करण्याची अद्भुत शक्ति प्रकट करून तिचा उपयोग करणें ज्या नाथांस अनुचित वाटलें तेच नाथ दगडाच्या नंदीला चारा खावयास लावण्याची लोकोत्तर जादू आपल्यापाशीं आहे असें जनतेंत प्रदर्शित करतील असें तर्कदृष्ट्या मानतां येईल का? भाविकांनीं लादलेल्या अनेक चमत्कारां पैकीं हा एक

असावा. खरा प्रकार काय घडला तो एका जनार्दनाला माहीत! ज्यांचा विश्वास बसेल त्या भाविकांची श्रद्धा डळमळावयास लावण्याचा प्रयत्न करण्यांत हांशील नाहीं.

तंबाखू खाणाऱ्यांना पिकाच्या पिचकाऱ्या रस्त्यावर आणि घराच्या कोनाकोंपऱ्यांत आणि अंगणांत बेसुमार टाकून चितारून ठेवण्याची वाईट संवय असते. तिच्यामुळें कित्येकांना कांहीं प्रसंगीं त्रास होतो हा अनुभव बऱ्याच जणांना आहे. नाथांवर एकदां असाच प्रसंग आला. कोणा नीच वर्णहीन जातींतील 'उन्मत्त प्राण्यानें तमाखु भक्षुनि पिक थुंकतां' नाथांच्या अंगावर पडला. न संतापतां नाथ शांतपणें गंगास्नानास गेले. शुचिर्भूत होऊन आल्यावर त्या प्राण्याच्या सदनाला जाऊन अत्यादरानें त्याला नमन केलें. तो घाबरला. नाथ त्याला म्हणाले, तुम्ही आपल्या नेहमींच्या स्वस्थानीं बसून पीक टाकला. माझ्या अंगावर पडला. तुमचा काय अपराध? अपराध माझा. मी विचार करून दुरून जावयास पाहिजे होतें. हें सौजन्यपूर्ण भाषण ऐकून तो प्राणी द्रवला आणि नाथांचे चरणीं लागला. नाथांनीं त्याला बोध केला. चरित्रकार केशव म्हणतो, 'शरणगतासि बोधु। कारिताति ऐकिले साधु। अपराधियासि उद्बोधु। बुद्धि विरुद्धु कोठें नसे॥

एके दिवशीं नाथ गंगेवर स्नानसंध्या करून स्वगृहीं परत जात होते. त्यावेळेस एक अनामिक स्त्री घाईघाईनें पाण्याला नदीवर गेली. मागून तिचें लेंकरूं रडत आलें. नदीचें पात्र रुंद असून पाण्यासाठीं वाळू तुडवून जावें लागतें. उन्हाळ्याच्या दिवसांत आणि एरवींसुद्धां वाळू तापते. मोठ्या माणसांना झरझर चालून जाण्याची संवय झालेली असते. मुलांचें तसें नाहीं. तें लेंकरूं वाळूंत पडलें पाय पोळल्यामुळें. नाथांच्या दृष्टीस पडतांच 'धांवत येऊन जवळीं। हस्तकमळीं उचलिलें॥ खांद्यावर बैसवून। त्यासि पुसती आलास कोठून। हातें घर दावी दुरून। चाले लक्षून त्या खुणें॥' त्याला त्या घराशीं नेऊन सोडलें.

याला म्हणतात भूतमात्रीं समदृष्टि आणि दया व समाजसेवा. नाथमहाराज भूतमात्रांचे सेवक होते.

या कृत्याचा संबंध लावून नाथचरित्रांत एक आख्यायिका चरित्रकारानें नमूद केली आहे. एक कुष्टरोगी ब्राह्मण आपली पीडा नष्ट व्हावी म्हणून अनुष्ठान करण्यास त्रिंबकला आला. तेथें एक तपपर्यंत राहून त्यानें नामस्मरण, प्रदक्षिणा, उपोषणें, फळमूळें सेवन करून कठीण तपश्चर्या केली. शरीर अगदीं कृश झालें. स्वप्नांत त्याला दृष्टांत झाला कीं, तूं पैठणास जा, तेथें ज्ञानी एकनाथ आहे त्याचे पाय धर आणि अनामिकाचें पोर खांद्यावर वाहून नेण्याचें त्याचें पुण्य माग. त्यानें तें दिलें म्हणजे तुझा रोग समूळ जाईल. तो ब्राह्मण पैठणास आला. पुण्याची याचना केली. नाथ म्हणाले, असें पुण्य संपादन केल्याचें आपल्याला स्मरत नाहीं. तथापि त्र्यंबकेश्वरची तशी तुला आज्ञा असल्यास तें देण्याचा मी संकल्प सोडतों. असें म्हणून संकल्पाचें पाणी ब्राह्मणाच्या हातावर ओतलें. ब्राह्मणानें तें सर्वांगाला लावलें. त्याचा कुष्ठरोग तत्काळ समूळ गेला. आयुर्वेदचिकित्सकांनीं मनन करण्यासारखी ही घटना आहे. अर्थात् चिकित्सक बुद्धीचा उपयोग करून ज्ञानांत भर टाकण्याची उत्कंठा असावयास पाहिजे ! कांहीं असो, अनामिकाकडे समदृष्टीनें पाहणें हें पुण्यकर्म आहे असें मानणारे त्या काळींसुद्धां होते !

नाथांचें पुराण श्रवण करण्यास अनेक भाविक नरनारी येत असत. नारींमध्यें सौभाग्यवती श्रीगंगा श्रवण करण्यास येत असे. तिच्या दिव्य देहावर दिव्य अलंकार असत. ती नित्य येऊन एका कोंपऱ्यांत बसून एकाग्र मनानें श्रवण करी. वाती करण्याची तिला आवश्यकता नव्हती. तिचें लावण्यसुंदर स्त्रीरूप कित्येकांच्या मनांत विकल्प उत्पन्न करण्यास कारण झालें व ते विपरीत जल्पना करूं लागले. पण ‘ स्त्री पुरुष भावना अभेद । श्रीनाथदृष्टि पूर्णबोध । श्रीगंगेचा भाव शुद्ध । श्रवणीं अनिरुद्ध सादर ॥ ’ ही रूपवती आहे तरी कोण, याचा ठाव पाहण्याचा दोघांचौघां

कुटाळांनीं बेत केला. पुराणानंतर एके दिवशीं ती नाथमंदिरांतून बाहेर पडल्यावर तिच्या मागून ते चालले. जातांना तिच्या कानावर जाईल अशा रीतीनें कुटाळांच्या जल्पना चालल्या. केशव म्हणतो, 'तंव ती जाऊनि गंगेंत। निजरूपीं जाली गुप्त। ऐसें देखोनि ते समस्त। नवल करीत आश्चर्य ॥' कुटाळांना वाईट वाटलें व दुसऱ्या दिवशीं त्या माउलीची क्षमा मागण्याचें ठरविलें. पण दुसऱ्या दिवशीं ती पुराणाला आली नाहीं. तिची अनुपस्थिति अवलोकन करून नाथांनीं जाणलें कीं, कोणाच्या तरी मनांत विकल्प येऊन त्या माउलीचा उपमर्द झाला असावा, व त्याप्रमाणें त्यांनीं बोलून दाखविलें. आम्ही दुष्ट दुरात्मे आहोंत असें कुटाळांनीं कबूल केलें व सर्व वृत्तान्त कथन करून क्षमेची याचना केली. त्यांना बोध करून शुद्धान्तःकरणानें भजनशील राहण्यास सांगितलें. गंगा प्रत्यक्ष स्त्रीरूप धारण करून येत असे असें कथन करण्यांत या गोष्टीला दैवी चमत्काराचें स्वरूप देण्यांत आलेलें दिसतें. वस्तुतः थोर घराण्यांतील रूपयौवनसंपन्न कुलभूषण सदाचारी कुलस्त्री पुराणश्रवणास येत असावी. विकल्पी लोकांच्या जल्पनांमुळें उद्वेग वाटून तिनें पुराणाला जाणें बंद केलें असावें. त्यांची कानउघाडणी करून त्यांना नाथांनीं बोधामृत पाजलें हें यथाक्रम झालें. नाथ कोणाची भीडभाड ठेवीत नव्हते.

नाथांचा एक शेजारी होता. धंद्यानें उदमी. शेंकडो लोक नाथांच्या पुराणकीर्तनश्रवणास येत पण यानें चुकून सुद्धां एकदांहि वाड्यांत पाऊल टाकलें नाहीं. नाथांच्या ही गोष्ट लक्षांत आल्यावर तो दारावरून जात असतांना एकदां दिसल्यावर त्यास बोलावून घेतलें. मोठ्या आदरानें जवळ बसविल्यावर त्याची सर्व चौकशी केली. परमार्थसाधनाकडे दिवसभरांतून दोन घटका तरी देत जा, असें त्यास मधुर वाणीनें सांगितलें. संसारांत आणि द्रव्यार्जनांत मग्न असलेला तो गृहस्थ चटकन उद्गारला, कसली संध्या नि कसलं काय? येथें धंद्यामुळें एक पळहि सांपडणें कठीण! नाथ म्हणाले,

धरून यजमानाच्या घरीं जाईतों जेवढा अवकाश असतो, तेवढा वाटचालीचा वेळ आम्हाला द्या. नाथांची कळकळ पाहून त्यानें मान्य केलें. विष्णुसहस्रनामांतला एक श्लोक त्यास वाटेनें पाठ करावयास सांगितला; व नंतर स्नान झाल्यावर वस्त्रपरिधान करणें संपेपर्यंत सबंध विष्णुसहस्रनाम म्हणण्याचा परिपाठ ठेवण्यास व नंतर भोजन करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो शेवटपर्यंत वागला. पुढें तो कथेसहि येऊन बसूं लागला. नाथांच्या कृपेनें त्यास अध्यात्मज्ञान झालें. अंतकाळीं विष्णुसहस्रनामाचा पाठ संपल्याबरोबर त्याचें देहावसान झालें. 'अंते मतिः सा गतिः'.

एक महार चोरीवर उपजीविका चालवी. गुन्ह्यांत सांपडल्यावर तो बंदिखान्यांत पडला. आतांसारखें त्याकाळीं बंदिवानांच्या सुखसोयीकडे अधिकारी लक्ष देत नसत. उलट कैद्यांचा अमानुष छळ करीत. या काळांतहि केव्हां केव्हां होत नाहीं असें नाहीं. पण पूर्वीं सरसहा ती पद्धत असली पाहिजे असें दिसतें. त्यावरून सर्वच बाबतींत काळ कसा पालटत चालला आहे हें प्रत्ययास येतें. हा महार पटाईत चोर असल्यामुळें कारागृहांत त्याच्या पायांत शृंखला घालून त्याला ठेवलें होतें. पोटभर अन्न मिळत नसे. त्यामुळें त्याचीं गात्रें विकल झालीं. नेत्रांत प्राण उरले. डोईवर केस वाढले आणि जीवन क्लेशमय झालें. अशा स्थितींत त्याच्या बेड्या काढून त्यास तुरुंगाच्या अंगणांत पडूं दिलें. हा आतां कसचा निसटणार, म्हणून रक्षकहि उपेक्षा करीत. मोकळेपणा मिळाल्यावर विनाकारण दुःखांत कां आयुष्य कंठावें, असा विचार एके रात्रीं त्याच्या मनांत आला. हरिनामाचा गजर कानावर पडला. अवसान धरून खुरडत तो बाहेर पडला. गजराच्या रोखानें तसाच चालला. हरिनामाची गोडी मनांत उत्पन्न झाली. 'नाथांचें मुक्तद्वार। कीर्तनकाळीं निरंतर। आंत येउनी सादर। श्रवणीं तत्पर पाडिलाचि॥' कीर्तन संपल्यावर सर्व माणसें गेलीं. घरचींहि झोंपलीं. निद्रिस्त होण्यापूर्वीं नाथ आसनावर सहजस्थितींत बसले असतां पडून

राहिलेल्या महाराकडे नजर गेली. नाथ म्हणजे मूर्तिमंत कारुण्यमूर्ति! लागलीच त्याच्याजवळ गेले. त्याच्यानें बोलवत नव्हतें. खुणेनेंच भूक लागल्याचें दर्शविलें. नाथांनीं गिरिजाबाईला उठवलें. त्या क्षुधापीडिताला पचेल असाच मिताहार दिला. थोडें पाणी प्याल्यावर हुषारी आली; आणि नाथांना म्हणाला, दयाळु मायबाप, मरत्याला वांचविलेंत. त्यानें नंतर नाथांना आपला वृत्तान्त निवेदन केला. नाथांनीं त्याला अभयदान दिलें आणि स्वस्थ चित्तानें राहण्यास सांगितलें. सर्व धर्मांत दया वरिष्ठ आहे. तें नाथांचें मुख्य लक्षण होतें. अधिकाऱ्यांना नाथांनीं निरोप पाठविला. तो मान्य झाला. दीनाचें संरक्षण केलें अशी नाथांची कीर्ति झाली.

नाथांच्या हातून कांहीं सत्कृत्य घडलें कीं त्याचें पुण्य मागण्याकरितां चरित्रकार कोणाला तरी उभा करतो. गंगेला स्नानाला जाण्याच्या नाथांच्या वाटेवर एक मोठा जुनाट अश्वत्थ वृक्ष होता. रात्रीं महाराचा उद्धार केल्यावर दुसरे दिवशीं नाथ गंगेला जात असतां त्या झाडाची एक फांदी कडकडून अकस्मात् खालीं पडली. नाथ झाडाखालींच बाजूला होते. फांदी पडल्या-बरोबर एक दीर्घ विक्राळ ब्राह्मण नाथांच्या समोर येऊन साष्टांग नमन करून नाथांना करुणा उत्पन्न व्हावी अशा रीतीनें म्हणाला, मी ब्रह्मराक्षस असून शंभर वर्षें येथें राहात आहे. आज मी आपलें ब्रह्मरूप पाहिलें. माझा उद्धारसमय आला. आपल्या कृपाप्रसादानें माझी मुक्तता होईल. तूं पतितपावन असें तुझें बिरुद आहे. आजवर जें ब्राह्मणसंतर्पण केलें, त्याचें पुण्य किंवा रात्रीं दीन, पतित अत्यंज आला त्याला अन्नदान केलेंस तें पुण्य मला दे म्हणजे माझी मुक्तता होईल. विचार करून ब्रह्मराक्षसानें रात्रीचें पुण्य मागितलें. नाथांनीं संकल्पाचें पाणी त्याच्या हातावर सोडतांच तो मुक्ति पावला. ‘ब्रह्मराक्षस उद्धरण। हें ऐश्वर्यदयेचें चिन्ह। श्रीनाथाचें सहजपण। करीत पावन जगातें॥’ चमत्कारांमध्यें हा अद्भुत

चमत्कार आहे. नाथांना छळणाऱ्या ब्राह्मणांपैकीं हा एखादा अनुतापी ब्रह्मराक्षस असावा.

चोरी करण्याच्या उद्देशानें कांहीं चोर एका रात्रीं कीर्तनाला येऊन बसले. दोन प्रहर रात्रीं कीर्तन संपल्यावर सर्व निघून गेले. चोरटे तसेच बाजूला दडून राहिले. सगळे निजले आहेत असें पाहून आपला उद्देश सिद्धीस नेण्याचें त्यांच्या मनांत आलें. त्यांस कांहीं दिसेनासें झालें. चापसूं लागले. हातासि कांहीं लागेचिना–हातानें कांहीं घडेचिना–मनाला कांहीं उमजेचिना–चिंता उत्पन्न झाली. मन उद्विग्न झालें. विवेक उत्पन्न झाला. पश्चात्तापाची झळ लागली. मागें मुरडून पाहिलें. आसनस्थ बसलेली नाथ महाराजांची मूर्ति दिसली. त्यांना ते शरण गेले. आम्ही चोर असून ज्या उद्देशानें येथें राहिलों, ती वृत्ति आतां पालटली. आपल्या ह्या आश्रमांत आल्यावर आम्ही आंधळे झालों. पुन्हां आपलें दर्शन झाल्याबरोबर चोरीचा कंटाळा आला आणि आपले चरण वंदिले. आम्ही अधम निंद्य वृत्तीचे. आम्हाला विवेक कोठून सुचणार? पण महाराजा, तुझ्या दर्शनानें कृतार्थ झालों. नाथांनीं त्यांना हातीं धरून घरांत नेलें, शंका न धरतां वाटेल तें घ्यावयास सांगितलें. विन्मुख जाऊं नका म्हटलें. तें ऐकल्यावर चोरांस विशेषच अनुताप वाटला. आमच्या डोळ्यांवर भ्रांतिपटल होतें तें जाऊन आमची दृष्टि निर्मळ झाली आहे, आपल्या दर्शनानें आमचा उद्धार झाला आहे, असें ते म्हणूं लागले. चोरी करावयास आले पण कीर्तनांतील निरूपणाचा महिमा इतका दांडगा कीं त्यांची पहिली पापी दृष्टि आंधळी बनली आणि नवी दिव्य दृष्टि प्राप्त झाली. नाथांचें कांहींच न लुबाडतां त्यांच्या विवेकज्ञानवैराग्ययुक्त संपत्तीचा त्या चोरांना वांटा मिळाला. संतांच्या उपदेशामृताचा असा सुपरिणाम सदैव घडत असतो.

श्रीनाथ अहोरात्र लोकसंग्रहार्थ परमार्थ आचरून क्षणमात्र व्यर्थ जाऊं देत नसत. नाथांची कीर्ति ऐकून त्यांच्या सहवासांत काळ कंठण्याकरितां एक ब्राह्मण आला. कोण, कोठले, विचारतां जेथें मन रमेल तेथें राहतों,

या देहाला कृष्ण म्हणतात, मनांत कसलाहि लोभ नाहीं; निष्कपट सेवा करून भल्या संगतींत संतोषानें राहीन असें श्रीखंड्या नामाभिधान प्राप्त झालेला श्रीकृष्ण म्हणाला. नाथांनीं त्याला ठेवून घेतलें. कावडीनें गंगाजळ आणणें, पिण्याकरितां माठ भरून ठेवणें, स्नानाच्या पाण्यानें रांजण भरणें, सडासंमार्जन करणें, पूजेकरितां गंध उगाळून ठेवणें, उच्छिष्ट पत्रावळी काढणें, धोतरें धुणें वगैरे कामें निर्मळपणानें व मोठ्या आवडीनें तो करीत असे. बारा वर्षें अतिनिष्ठेनें त्यानें याप्रमाणें सेवा केली. त्याची कार्यनिष्ठा अनुभवून सर्वजण त्याजवर अगदीं संतुष्ट होते. इकडे द्वारकेस एका तपोनिष्ठ ब्राह्मणानें कृष्णदर्शन व्हावें म्हणून एकाग्र मनानें बारा वर्षेंपर्यंत तप केलें. त्याला स्वप्नांत दृष्टान्त झाला कीं, माझें दर्शन तुला पैठणांत नाथांच्या घरीं होईल. तेथें मला कृष्ण श्रीखंड्या या नांवानें ओळखतात. तेथें तूं जा. तो ब्राह्मण पैठणास आला. गंगेला वंदन करून नगरींत नाथांच्या वाड्यांत आला. नाथांनीं त्याला आदरानें जवळ बसविलें. कुशल प्रश्न विचारून सर्व चौकशी केली. कृष्णदर्शनाकरितां आलों आहें, तो तुझ्या घरीं नांदतो आहे, तो अर्थ कृपाळूपणें पुरव असें विनविलें. 'नाथ म्हणे कृष्णावीण। एकही न दिसे रिकामें स्थान। कृष्णचि भरला पूर्ण। मुख्य दर्शन या नांव ॥' अहो, या ब्रह्मज्ञानानें मला समाधान होत नाहीं. तुमच्या घरांत कृष्ण श्रीखंड्या कोण आहे, तो आणून भेटवा. त्याशिवाय खरें समाधान होणार नाहीं, असें म्हणून नाथांचे चरण धरले. त्यांनीं उद्धवाला हांक मारून श्रीखंड्याला लौकर बोलावण्यास सांगितलें. त्यावेळीं श्रीखंड्या महाराज देवघरांत गंध उगाळीत होते. त्या ब्राह्मणाला तेथें दर्शन घडलें. 'चतुर्भुज सुकुमार। शामतनु अति सुंदर। कांसे कसिला पीतांबर। गळां हार वैजयंती ॥' ब्राह्मणानें पाहतांच साष्टांग नमन केलें. सार्थक झालें असें उद्गारला. श्रीकृष्ण म्हणाले, तीन तपें येथें राहिलों, आतां परत द्वारकेला जातों. 'नाथ नमी चरणासी। तुजविण चाळक कोण

देहासी। प्रतिपाळिशी अहर्निशीं। हृदयस्थ होशी अवलीळा।'

ही श्रीखंड्याची गोष्ट नाथांच्या सर्व चरित्रकारांनीं कमीअधिक विस्तारानें दिली आहे. नाथांसारख्या परम भगवद्भक्ताचा भगवान् श्रीकृष्ण पूर्ण साह्यकर्ता होता हें उघड आहे.

कृष्णदास नांवाचा एक विद्वान् ब्राह्मण होता. तो मराठींत ओंवीबद्ध रामायण रचीत असतां ग्रंथ आपल्या हातून समाप्त न होतां आपला मरणकाळ आला आहे असें वाटून त्याला चिंता उत्पन्न झाली. नाथांकडे येऊन त्यानें आपली भीति प्रदर्शित केली. झालेली पोथी दाखविली. हा ग्रंथ हातून पूर्ण व्हावा अशी मनीषा आहे. पण मरणसमय समीप आल्यानें तो पुरा न करतांच जाणें प्राप्त आहे. ग्रंथाची समाप्ति आपण करावी अशी नाथांना विनंति केली. ग्रंथ अवलोकन करून नाथ प्रसन्न चित्तानें त्याला म्हणाले, तुम्हींच हें करावें. ग्रंथलेखनाचें कार्य शेवटास जाईपर्यंत तुम्हांस मरण येणार नाहीं, असें दीनदयाळ नाथांनीं कृष्ण-दासाला आश्वासन दिलें, आणि आपल्या घरींच ठेवून घेतलें. कित्येकांना मरणाची भीति फार वाटत असते, परंतु 'अभय, तत्त्वसंशुद्धि, ज्ञानयोगव्यवस्थिति' हें ऐश्वर्य भोगणारे भीतिग्रस्तांना धीर देत असतात व त्यांच्या हातून सत्कार्यें घडवितात. नाथांसारख्या योग्यांना आपोआप अशी सिद्धि प्राप्त झालेली असते कीं, इतरांना वाटणारे चमत्कार त्यांच्या आयुष्यांत सहजगत्या घडणाऱ्या गोष्टी असतात.

पैठणच्या एका ब्राह्मणाजवळ परीस होता. त्याला काशीयात्रेस जावयाचें होतें. परिसासारखी अमोल वस्तु कोणाच्या स्वाधीन करून जावें या मोठ्या विचारांत तो पडला असतां एकनाथ हे पूर्ण निःस्पृही भक्त जाणून त्यांजपाशीं दिला आणि निर्धास्तपणें यात्रेला गेला. नाथांनीं तो देव्हाऱ्याखालीं ठेवला. इतरांस तें माहीत नव्हतें. उद्धवाच्या हातून निर्माल्यांत तो गंगेंत जाऊन पडला. यात्रेहून परत आल्यावर ब्राह्मण


नाथांकडे गेला. नाथांच्या गांवींहि ती परिसाची गोष्ट नव्हती. ब्राह्मणाच्या मनांत शंका उत्पन्न होऊन तळमळ सुरू झाली. नाथ कांहींच बोलेनात तेव्हां नाथांना अभिलाष उत्पन्न झाला असें त्या ब्राह्मणाला वाटलें. स्पष्ट मागणी केल्यावर उद्धव म्हणाला, निर्माल्याबरोबर तो गंगेंत गेला असेल. ब्राह्मणाला तें कुठचें खरें वाटणार? त्याची खिन्न स्थिति ओळखून नाथांनीं त्याला गंगेवर नेलें. दोन्ही हातांत मावतील इतके प्रवाहांतील गोटे वर काढले आणि यांच्यांतला तूं आपला परीस ओळखून घे असें त्या ब्राह्मणाला म्हणाले. ब्राह्मणानें पाहिलें, सगळे परीसच. नाथांनीं त्याला फक्त आपला परीस असेल तो घ्यावयास सांगितला. बाकीचे पुन्हा गंगेंत टाकले. त्यांना कसलाच लोभ नव्हता. नाथांची लोक–विलक्षण निर्लोभता पाहून तो अतिशय विस्मित आणि लज्जित झाला. नाथांच्या अलौकिक निर्लोभतेची निदर्शक म्हणून ही आख्यायिका अस्तित्वांत आली असावी.

महार जातींत राण्या आणि त्याची बायको हें जोडपें नाथांचें भक्त होतें. नाथांच्या कीर्तनश्रवणास नित्यनेमानें जाई. एकदां नाथ स्नानाला जात असतांना त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्याशीं संभाषण केलें. ते बोलत उभे राहिलेले तिघांनीं पाहिले. नाथांच्या हातून केवढा भ्रष्टाचार घडला, हें दुराचरण आहे, असें विप्र त्याला म्हणाले. ‘ नाथ म्हणे ब्रह्ममूर्ति। तुम्हांसारखी हेही आकृती। कोणें लक्षणें या प्रती। अनामिक निश्चित जाणतसां॥ ’....‘ दिसतो आत्मत्वें परिपूर्ण। सर्वांसमान सारिखा। त्याच्या अनामिकपणाचें लक्षण। कोणतें द्यावें निवडून॥ ’ हें ऐकतांच ब्राह्मण भडकले. ‘ जळो ऐसें ज्ञान–भ्रष्टाकार पूर्ण झाला ’ असें ते ब्राह्मण संतापानें उद्गारले. ब्राह्मणांचा कोप पाहून नाथांनीं क्षमा मागितली. दुराचरण करून पुन्हा क्षमा मागण्याचीहि तयारी? धन्य आहे या नाथाची! सचैल स्नान करून तूं प्रायश्चित्त घेतलें पाहिजेस. त्यालाहि कबूल. नाथांना प्रायश्चित्त देण्यांत ब्राह्मणांना धन्यता वाटली. इकडे राणबाची बायको त्याला म्हणाली,

या सत्पुरुषाची सेवा आपल्यासारख्या मंदभागी लोकांना कसची घडणार? तिला फार वाईट वाटलें. बायकोचा भावार्थ जाणून तो म्हणाला, काळजी करूं नकोस. नाथ समबुद्धि आहेत. आपला हेतु पूर्ण करतील. राणबानें नाथांची भेट घेऊन दंडवत घालून भोजनाला बोलाविलें. नाथांनीं कबूल केलें. राणबाला व त्याच्या बायकोला हर्ष वाटला. त्यांनीं जेवणाची यथासांग सर्व सिद्धता केली. या गोष्टीचा पुकारा सर्व ब्रह्मवृंदांत झाला. आपापलीं कामें सोडून नाथाला अनामिकाच्या घरीं पकडण्यासाठीं ते स्थळोस्थळीं राहिले. आधीं बोभाटा न करतां पात्रावर बसल्यावर मग पकडावें असा मनसुबा ठरला. स्वयंपाक झाल्यावर तो अनामिक बोलावूं आला. तूं पान मांड मी आलोंच, असें सांगून त्यास पाठविलें. तो घरीं येऊन पोहोंचतो तों नाथहि आले. पाटावर बसून गंधपुष्पमाला घालून पूजा केली. पान वाढलें. ब्राह्मणांत एकच धांदल उडाली. महाराच्या घराजवळचे ब्राह्मण लगबगीनें नाथांच्या घराकडे धांवत आले आणि तेथल्या ब्राह्मणांना म्हणाले, येथें कां उभे नुसते? तो तर तिकडे जेवायला बसला. वाड्याजवळचे ब्राह्मण म्हणाले, काय बोलतां भलतेंच? तो पहा आंत आसनावर बसला आहे. कोणालाच उलगडा होईना. वाटेल तें बरळूं लागले. नवराबायकोनें नाथाला जेवूं घातलें आणि म्हणाले, 'धन्य धन्य तूं समर्था । आम्हां अनाथां उद्धरिलें ॥' नाथ म्हणाले, 'तुमची आवडी निस्सीम । म्हणोनि आचरलों हें कर्म । संतोषला मनोधर्म । प्रेमसंभ्रम पाहोनी ॥' इकडे वाड्यांतहि नाथांनीं नित्याप्रमाणें प्रसाद घेतला. 'जैसा भाव तैसा देव । हा केशवाचा अनुभव । श्रीनाथकृपेचा नवलाव । न कळे लाघव अभिमानियां ॥' असेंच आपणहि केशवाप्रमाणेंच म्हटलें पाहिजे. सद्‌बुद्धीला जें पटेल-आंतल्या आवाजानें मान्य केलेलें-नाथ निःशंकपणें आचरीत हें यावरून सिद्ध होतें. दैवी चमत्काराचें रूप देऊन नाथांच्या जाज्वल्य समताबुद्धीवर पांघरूण घातलें आहे. देवाला काय, वाटेल तें करण्यास तो मोकळा आहे असें म्हटलें म्हणजे झालें!



कनवाळू नाथांचा दयाळूपणा



श्री नाथांच्या ग्रंथराजाची मिरवणूक

एक गृहस्थ नाथांची कीर्ति ऐकून त्यांच्याकडे आला. त्याला ईशदर्शनाची विशेष उत्कंठा उत्पन्न झाली होती. नाथांना म्हणाला, मला देवदर्शन घडवा. तें फुकटचें नाहीं, त्याला जपतपसाधन करावें लागतें असें नाथ म्हणाले. तें कांहीं नाहीं, तुम्ही महान् भगवद्भक्त आहांत, तुम्हांला काय अशक्य आहे? असा त्याचा हट्ट दिसल्यावर नाथ त्याला म्हणाले, कोणत्या तरी झाडाची डहाळी हातांत घे. तिला दुसऱ्याच झाडाचें नांव देऊन पुकारा करीत कोल्हापुरांत हिंड. जो कोणी तूं म्हणशील तें नांव कबूल करील त्याचे पाय धर. तेंच तुला ईशदर्शन. कारण ज्याची भेदबुद्धि नष्ट झाली तो ईश्वरी अंशच होय.

एका विधवाबाईच्या एकुलत्या एक मुलाला रोग जडला होता. औषधाचें पथ्य तो पाळीना आणि रोग कांहीं हटेना. बिचारी रडकुंडीस आली. अखेर नाथांकडे येऊन आपली करुण कहाणी निवेदन केली. अश्रूंनीं नाथांचे चरण न्हाऊं घातले. नाथांना दया आली. मुलाला वाड्यांत आणून ठेवण्यास सांगितलें. जेवणाच्या वेळीं त्याला शेजारीं बसवूं लागले. वैद्यानें त्याला जे पदार्थ वर्ज्य केले होते ते नाथांनीं स्वतः वर्ज्य केले. नाथांच्या थोर आणि प्रेमळ अंतःकरणाची ओळख लवकरच पटल्यावर त्या मुलानें पथ्य पाळण्याचें व्रत केलें; कांहीं दिवसांनीं तो रोगमुक्त झाला व स्वगृहीं गेला.

माणूस कितीहि दुराचारी असला तरी त्याच्या अंतःकरणांतील सद्वासना सर्वथैव नष्ट होत नाहीं. नाथांच्या घरीं पुराणाला आणि कीर्तनाला मुक्तद्वार होतें. पैठणांतील एक वेश्या पुराणश्रवणास येत असे. तिनें पिंगलाख्यान श्रवण केल्यावर तिचें मन हरिभक्तीकडे वळलें. मानवदेह अमंगल व्यवसायांत वापरण्याचा तिला तिटकारा उत्पन्न झाला. अनुताप तीर्थांत नहाल्यावर समूळ पापक्षालन होतें असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. नाथांनीं तिला सदाचरणानें

वागण्याचा उपदेश केला आणि तिनें पुढील आयुष्य भगवच्चिंतनांत घालविलें.

नाथांचें वास्तव्य पैठणांत सुमारें अर्धशतक होतें. इतक्या अवधींत वर नमूद केल्यासारख्या अनेक गोष्टी घडल्या असतील. तृषिताला जलपान, क्षुधिताला अन्नदान, मोहग्रस्ताला ज्ञानदान हें नेहमींच चालावयाचें. नाथांच्या प्रयाणकालाला साडेतीनशें वर्षें झालीं. त्यांच्या-संबंधानें बऱ्याच आख्यायिका अद्याप पैठणांत आणि हरदासांच्या कथांत रूढ आहेत. थोरांच्या आख्यायिकांत त्यांच्या पश्चात् नेहमींच भर पडत असते.

वर वर्णन केलेले सर्व प्रसंग नाथांच्या जनसेवेच्या विविध प्रकारांचे निदर्शक आहेत. त्यावरून लोकांच्या दुःखांचा परिहार करण्यास ते सतत झटत असले पाहिजेत हें स्पष्ट होतें. त्यांची सत्यनिष्ठा, समता आणि मनोधैर्य अनुपम होतीं एवढें मात्र खरें !

## धैर्यशाली नाथ

नाथांच्या अनेक गुणांपैकीं धैर्य हा प्रभावी गुण होता. धैर्यानें त्यांनीं जीवनयात्रा केली. धैर्यानें वागून ते अनेकदां संकटांतून पार पडले. सत्यनिष्ठपणानें, सद्बुद्धीच्या प्रेरणेनें त्यांचें आचरण होत असल्यामुळें सामान्य कुटाळांचा छळ त्यांना सोसावा लागला. त्यांच्या धैर्याची कसोटी पाहणारे अनेक प्रसंग त्यांच्यावर आले असतील. त्यांपैकीं महत्त्वाचा एक प्रसंग चरित्रकार केशवानें प्रामुख्यानें नमूद केला आहे.

नाथांनीं ग्रंथलेखनाला आरंभ चतुःश्लोकीवरील टीकेनें केला. नंतर प्रतिष्ठानांत येऊन वास्तव्य केल्यावर अनेक अभंगरचना आणि लीला-वर्णनें केलीं. मग हस्तामलक शुकाष्टक आणि स्वात्मसुख हींहि

लहान लहान टीकात्मक प्रकरणें लिहिलीं. भक्तिमार्गांत भागवताला महत्त्वाचें स्थान आहे. पुराणांत भागवत श्रेष्ठ समजतात. त्यांतल्या त्यांत ज्यांत भक्तीचा अद्‌भुत उत्कर्ष आहे व वैराग्ययुक्त निजज्ञान सांगितलें आहे तें उद्धवगीत भक्तजनांस फार प्रिय आहे. म्हणून त्यावर टीका करण्यास नाथांनीं आरंभ केला. दोन अध्यायांची ओंवीबद्ध टीका संपूर्ण झाल्यावर नाथांना पूज्य मानणाऱ्या एका गृहस्थाला ते अध्याय फार गोड लागले. त्यानें त्यांची आवडीनें प्रत करून घेतली. तो स्नानसंध्याशील सुशील ब्राह्मण होता. तो त्या अध्यायांचें नित्य पठण करीत. असे पुढें नाथांची आज्ञा घेऊन वाराणशी तीर्थाला सुमुहूर्तावर त्यानें प्रयाण केलें. तेथें पोंचल्यावर एकदां मनकर्णिकेच्या कांठावर स्नान केल्यानंतर वीरासन घालून श्रीभागवत अध्याय पठण करीत नेहमींप्रमाणें बसला. त्या घाटाच्या मठाधिपतीचे दोन शिष्य गंगातीरीं स्नानाला आले. हा कोणीतरी पंडित आहे असें वाटून त्याच्याजवळ मर्यादेनें बसले. कोण, कुठले वगैरे चौकशी करून कसलें पठण चाललें आहे असें संस्कृत भाषेंत विचारलें. प्रतिष्ठानाहून आलों आहें आणि पुस्तक श्रीभागवतांतील उद्धवगीत आहे म्हणून सांगितलें. विद्यार्थ्यांनीं सुवाच्य वाचण्याची विनंति केली. महाराष्ट्र भाषा ऐकल्यावर गीर्वाण वाणीचा या योगानें अव्हेर होईल, म्हणून ते विद्यार्थी रागावले. एक विद्यार्थी सत्वर गेला. स्वामीला सविस्तर वर्तमान कथन केलें. स्वामीजी संतापले आणि पांचसात शिष्यांना त्या गृहस्थाला आणण्यास पाठविलें. हें काय संकट अकस्मात् उद्‌भवलें, म्हणून गृहस्थ प्रथम घाबरला. पण गुरुस्मरणानें त्याला धीर आला. मठांत गेल्यावर स्वामींनीं प्रश्न केल्यावर त्यानें सांगितलें कीं मी मूढ आहें. या पुस्तकाचा कर्ता ख्यातनाम श्रीनाथ आहे. तो परम भगवद्भक्त असून प्रतिष्ठान क्षेत्रीं राहत आहे. तो जनांना सन्मार्गाला लावीत आहे. त्यानें भक्तिमार्गाचा प्रसार केला आहे, असें निवेदन करून अध्याय परत घेतले आणि ब्राह्मण मठाबाहेर पडला.

मठाधिपतीनें पैठणच्या ब्राह्मणांस पत्र लिहून आपल्या दोन शिष्यांबरोबर पाठविलें. आपण क्षेत्राचे अतिसमर्थ ब्राह्मण असून मराठी भाषेंत पुस्तक लिहिणारास तुम्ही शासन कां करीत नाहीं ? हें पाषांड मोडलेंच पाहिजे. तुमचें कांहीं चालत नसेल तर त्यास बहिष्कृत करावें. एकनाथालाहि निराळें पत्र दिलें. विद्यार्थ्यांना आपली कामगिरी निर्भीडपणें बजावण्यास सांगितलें. विद्यार्थी पैठणास आल्यावर ब्रह्मवृंदाला पत्र दिलें. नंतर एकनाथाकडे गेले.

इतक्या या कालावधींत नाथांचे पांच अध्याय संपूर्ण झाले होते. वाराणसीचे दोन ब्राह्मण वाड्यांत येतांना दृष्टीस पडल्यावर नाथ सामोरे जाऊन आदरसत्कार केला. नाथांच्या या पहिल्या भेटींतच खरडपट्टी काढण्याच्या हेतूनें आलेले ब्राह्मण शिथिल पडले आणि विवेकयुक्त आणि मवाळ बोलूं लागले. येण्याचें प्रयोजन सांगितल्यावर विश्वेश्वराची खरोखर महत्कृपा, दर्शनाला पाचारिलें असें उल्हासयुक्त उत्तर नाथांनीं दिलें. ब्राह्मणांबरोबर वाराणसीला जाण्याचें ठरलें. सर्व व्यवस्था बघा, असें उद्धवाला सांगितलें.

नाथांनीं बरोबर आपले पांच अध्याय घेतले. पैठणचें कोणीहि बरोबर घेतलें नाहीं. उद्धवानें मागाहून दोघांस पाठविलें. मनकर्णिकेवर आल्यावर नाथांस फार हर्ष वाटला. गंगातीरावर नाथांना बसवून मठाधिपतीला ते आल्याचें सांगण्यासाठीं शिष्य निघून गेले. स्वामींनीं आपल्या तीनशें शिष्यांस नाथांना शासन करण्याची आज्ञा केली—' पांच पांच दंड तयातें । शासन करावें ।' अशा प्रकारचें शासन फर्माविण्याचा अधिकार स्वामींस कसा प्राप्त झाला होता देव जाणे ! स्वामीपेक्षां त्याचे शिष्य अधिक विचारी होते. ते आपसांत म्हणूं लागले, ही शासनपद्धति अयुक्त आहे. त्यांनीं ठरविलें कीं एकेकानें जाऊन नाथांच्या लक्षणाचें निरीक्षण करावें. गुर्वाज्ञेप्रमाणें शासन केल्यास ब्रह्महत्त्येचा अनर्थ होईल. एकेक जेव्हां नाथदर्शनास आला, तेव्हां दर्शनाबरोबर प्रत्येकाच्या चित्तांत सद्भाव उत्पन्न होऊन

नम्रतेनें प्रत्येकजण अभिवादन करता झाला. स्थितप्रज्ञ ब्रह्मविदाचें अनुपम तेज नाथांच्या मुद्रेवर झळकत होतें. त्यानें दिपून जाऊन सर्व तटस्थ झाले. नाथ म्हणजे शांतिब्रह्म, समदृष्टि, आनंदमूर्ति. त्यांचा प्रभाव ते कोठेंहि गेले तरी पडल्याशिवाय कसा राहील? नाथांची मूर्ति आणि आचरण अवलोकन करून शिष्यगण गुरुस्वामीकडे जाऊन नाथगुणगानच करूं लागला. 'ओसाड खेडें' हें गोल्डस्मिथ कवीचें इंग्रजी काव्य आहे. त्यांत 'जे हेटाळणी करण्याच्या उद्देशानें आले ते प्रार्थना करण्यास राहिले' अशी एक ओळ आहे, त्याप्रमाणें हें झालें. कांहीं थोर पुरुष असे असतात कीं, त्यांचें दर्शन घडतांक्षणींच त्यांजविषयीं आदरभाव उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं.

एकदोन शिष्यांनीं स्वामीला येऊन सांगितलें कीं, महाराज, ज्यांना आपण शासन करण्याची आज्ञा देऊन पाठविलें तेच नम्रभावानें नाथाला वंदन करीत आहेत. स्वामी आश्चर्यचकित होऊन स्वतः नाथांचा समाचार घेण्याचें त्यांनीं ठरविलें. स्वतःच्या थोरपणाची विशेष प्रौढी मानीत असल्यानें पाखंड्याचें दर्शन घडूं नये म्हणून मध्यें पडदा लावून नाथांशीं संभाषण करण्याचें त्यांनीं ठरविलें. वादांत या पैठणच्या ब्राह्मणाला आपण सहज जिंकूं असा त्यानें मनांत निश्चय केला. शिष्यांची स्थिति पाहून त्याला मोठा विस्मय वाटला. सर्व शिष्य एकसारखा श्री एकनाथ, श्री एकनाथ असा जयजयकार करीत होते. पडद्याच्या आड जवळच आसनस्थ होऊन यतिराज अभिमानानें नाथांस म्हणाले, मी वरिष्ठ, तुझ्या कपटाची परीक्षा करायला आलों आहें. पण नाथ सहजसुखसंपन्न असल्यामुळें यतीच्या या कठोर वाणीनें त्यांची शांति ढळली नाहीं. ते विनम्र भावानें स्वामीला म्हणाले,

**अहो स्वामी श्रीसमर्था। तुमचे चरणीं माझा माथा।**
**कृपा करोनियां अनाथा। कीजे मनोरथा परिपूर्ण॥**

इतुका दूर पंथ क्रमून । बोलाविलें दर्शना लागून ।
मध्यें अंत्रपाट आणून । विषमपण किमर्थ मनीं ॥
नाहीं वेदशास्त्रसंपन्न । कवितेचा नसे अभिमान ।
समर्थी न मानतां कोण । उपेग लक्षण ग्रंथाचें ॥
संकल्पविकल्पाचें शून्य । गुरुकृपा निवांत मन ।
या काव्याचा अभिमान । या देहीं जाण पैं नसे ॥
कृपा करुनी करुणानिधी । शांतउनि कोपबुद्धि ।
दर्शना देउनी प्रसिद्धी । अनाथ त्रिशुद्धि तारावा ॥
जितुकें झालें लेखन । व्याख्यानीं लागतां दूषण ।
करावें जळीं निमग्न । मणिकार्पण सहजचि ॥

या मधुर नम्र वाणीनें स्वामीचा शिष्यगण देहभान विसरला आणि स्वतः स्वामी संतुष्ट झाला. नाथांचा विनम्रभाव पाषाणालाहि पाझर फोडणारा होता. संन्यासी मनांत उमगला आणि नाथांना साष्टांग प्रणिपात केला. नाथांनीं स्वामीला उचलून धरून आसनावर बसविलें व एका श्लोकावर व्याख्यान केलें. नाथांवर गुरुकृपा पूर्ण होती. ते ज्ञानसंपन्न होते. आत्मविश्वास अगदीं पुरेपूर होता. तेव्हां गुरुकृपा स्रवणारी त्यांची वाणी परिणामकारी झालीच पाहिजे. नाथांचें प्रवचन ऐकून संन्यासी निजबोधानें चित्तांत निवाला. सर्वांचा एकविचार होऊन नाथांना मठांत सत्कारानें ठेवून घेतलें व एकनाथी भागवत म्हणून सुप्रसिद्ध असलेलें संपूर्ण करण्याविषयीं विनंती करण्यांत आली.

पैठणास राहिलें किंवा काशीस राहिलें, नाथांस सारखेंच. सहा महिन्यांत ग्रंथ संपूर्ण झाला. यति आतां नाथांचा पुरस्कर्ता बनला होता. पण दुसरे कांहीं अहंमन्य संस्कृतज्ञ पंडित होते. त्यांना यतीचें हें वर्तन रुचलें नाहीं. नव्हे, असह्य झालें. पण यतिमहाराजांचें प्रस्थ बडें होतें. आपण करतां हें शास्त्रविरुद्ध आहे असें सांगायला एकालाहि धीर

होईना. विचारान्तीं सर्वांनीं मिळून जाऊन सांगण्याचें ठरविलें व मठांत गेले. आपण थोर शास्त्रज्ञ संन्यासी असून नीचवाणीचा गौरव मांडण्यांत निंद्य आचरण होत आहे. क्षेत्राचा मान राखावयाचा असेल तर होत असलेला अधर्म थांबवा, असें ते पंडित म्हणाले. यतीनें उत्तर दिलें कीं या सत्पुरुषाचा महिमा न जाणतां मीहि त्याच्याशीं उद्धट वर्तन केलें. त्याचें ऐश्वर्य आणि शांति पाहून हा अवतारी पुरुष आहे असा माझ्या मनाचा निश्चय झाला आहे. हें संन्याशाचें बोलणें ऐकून पंडित संतापले व बळेंच ग्रंथ घेऊन मठांतून बाहेर पडले. नाथ सहजसमाधिलक्षण असल्यामुळें त्यांच्या ठायीं यत्किंचितहि चळबिचळ दिसून आली नाहीं. त्यामुळें यतीची आदरबुद्धि दृढ होऊन तिला भक्तीचें स्वरूप प्राप्त झालें. या अभिमानी पंडितांनीं तो ग्रंथ गंगाजळांत झुगारून दिला. त्याबरोबर, चरित्रकार म्हणतो,

**ते काळीं भागीरथी । दोनी हात करुनी वरती ।**
**चुडे कंकणें रत्नदीप्ती । शोभा शोभती सौभाग्य ॥**
**श्रीनाथकृपा ग्रंथासी । परी चढले आदरेसी ।**
**समस्त पाहती कौतुकासी । अघटित पंडितासि वाटलें ॥**
**देखोनि ऐसें विंदान । संन्यासी आला धावोन ।**
**उडी घालोनि आपण । पुस्तक वंदोन घे मस्तकीं ॥**

स्वामींच्या जीवीं प्रेमाचा पूर येऊन नेत्रांतून आनंदाश्रू ओघळूं लागले व मुखानें श्रीनाथनामाचा गजर, जयजयकार होऊं लागला.

वर वर्णिलेल्यापैकीं पहिली चमत्कृति आहे. भाविक श्रद्धाळूंच्या मनोवृत्ति उचंबळविणारी आहे. तसें घडलें असेल किंवा नसेल. स्त्रियाहि भागीरथीवर स्नानास जातात. अशांपैकीं एखाद्या स्त्रीनें तो ग्रंथ नदींत पडल्याबरोबर उचलला असण्याचा संभव आहे. तितक्यांत स्वामींची स्वारी तेथें येऊन थडकली व स्वतः उडी टाकून पुस्तक मस्तकावर धरलें

आणि जयजयकार केला हे स्वामींच्या त्यावेळच्या प्रेमभक्तीच्या वृत्तीला अनुसरूनच झालें. प्रथमचा कट्टर विरोधी स्वतःच नाथांचा परमभक्त झाला. केवढा हा नाथांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव! मग इतरेजन, ज्ञानी आणि अज्ञानी, नाथांच्या भजनीं लागले यांत नवल तें कसलें?

स्वामींची नाथाविषयीं निष्ठा इतकी दृढ झाली कीं नाथांची हत्तीवरून मिरवणूक काढण्याची मनीषा त्यांनीं जाहीर केली. अंबारीसहित हत्ती आणला. रोषनाईची दारू सोडण्यासाठीं नळे, चंद्रज्योत सज्ज ठेवले. षोडशोपचार पूजाद्रव्य गोळा केलें. पंडितांस सांगितलें कीं नाथांची प्रार्थना करून उल्हासानें पूजा करा. पण 'नाथ म्हणे हें अनुचित। तुम्ही समस्त मज पूज्य।' नाथ कबूल होईनात तेव्हां पुस्तकाची—नाथ—भागवताची—निष्ठेनें पूजा करावयाचें ठरलें. त्याप्रमाणें पूजा झाल्यावर ग्रंथ अंबारींत ठेवून गजरांत भव्य मिरवणूक निघाली. नाना परींचीं वाद्यें वाजताहेत, संन्यासी सहपरिवार पंडितांना बरोबर घेऊन श्रीनाथांचा हात धरून हर्षयुक्त चालला आहे, वैष्णवजनांचा मेळावा कीर्तनरंगीं नाचत आहे, हर्षानें बुक्का उधळीत आहेत आणि भक्तगण जयजयकारें गर्जना करीत चालला आहे असा हा अपूर्व सोहळा पाहण्यास नागरिक नरनारींची अर्थातच गर्दी उसळली. मिरवणुकीनंतर स्वामींनीं पाळी-पाळीनें पंडितांकडून प्रत्यहीं अन्नसंतर्पण सात दिवस करविलें; आणि नाथांच्या कीर्तनाचा सप्ताह पार पडला. नाथांच्या वाणींत ब्रह्मानुभवबोध विपुल असल्यामुळें त्यांचें निरूपण पंडितजन निवांतपणें श्रवण करीत. बोध करण्याच्या सामर्थ्यानें आणि अपूर्व वक्तृत्वाच्या प्रभावानें महाभिमानी पंडितांचें लक्षण पालटलें. पंडितांचा अभिमान गळाला, न कळत अमर्यादा घडली, त्याची क्षमा असावी असें त्यांनीं नाथांना विनविलें. या सर्व प्रसंगांतील अखेरची विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं पंडितांनीं नाथ—भागवताच्या प्रती करून घेतल्या.

ही नाथचरित्रांतील विशेष महत्त्वाची गोष्ट असल्यामुळें तिचें बऱ्याच

विस्तारानें वर्णन दिलें आहे. आपल्या चारित्र्यानें, विद्वत्तेनें आणि ग्रंथकर्तृत्वानें नाथांनीं हा दिग्विजय मिळविला असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. संस्कृत भाषाभिमान्यांच्या दृष्टीनें घडलेल्या अपराधाचा जाब देण्यासाठीं नाथांस पाचारण झालें. नाथ त्या दिव्यांतून विजयी होऊन अधिक प्रकाशमान झाले. आपल्या मायभाषेचा झेंडा संस्कृताच्या माहेरघरीं त्यांनीं उभारला. यापेक्षां अधिक मोठा पराक्रम कोणता व्हावयाचा होता ?

लूथर नांवाचा एक प्रख्यात सुधारक सोळाव्या शतकांत युरोपांत होऊन गेला. त्याच्या चरित्राचें नाथांच्या चरित्राशीं वरील गोष्टीच्या बाबतींत पुष्कळ साम्य आहे. तो प्रामाणिक, उत्साही आणि जिज्ञासु होता. युरोपांत त्या काळीं धर्मगुरु पोपचें फार मोठें प्रस्थ होतें. त्याच्या अनुमतीनें पाप्यांच्या पापांचीं क्षमा करणारीं क्षमापत्रें विकून पापीजनांना मुक्त करण्याचा सपाटा चाललेला पाहून लूथरनें त्याचा कडक निषेध केला. अर्थात् धर्मज्ञानाची भांडवलशाही माजविणारांना तें रुचलें नाहीं. लूथरच्या विरुद्ध सर्वत्र कोल्हेकुई माजली. त्यास बहिष्कृत करण्यांत आलें, त्यास बंदिवास सोसावा लागला. पण या सर्व गोष्टी ध्यानें धैर्यानें सहन केला. ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ बायबल लॅटिन भाषेंत होता. लॅटिन भाषा ही संस्कृतची बहीण. जनतेला त्या भाषेचें अज्ञान. स्वार्थसाधु धर्माधिकारी सांगतील तें मान्य करावयाचें, ही दुःस्थिति लूथरला सहन झाली नाहीं. त्यानें नव्या कराराचें लोकभाषेंत भाषांतर केलें आणि धर्मज्ञान सुगम केलें. अधिकारीवर्गाचा त्यामुळें प्रक्षोभ झाला. पण लूथर न डगमगतां सत्यनिष्ठेच्या जोरावर यशस्वीपणानें जनतेच्या आदरास पात्र झाला. त्याच्या चारित्रांतली ही सर्व हकीकत वाचनीय आहे. त्यावरून कोणताहि देश असो वा कोणतेहि लोक असोत, तेथील कर्मठांकडून सत्यान्वेषी धर्मज्ञांचा छळ झाल्यावांचून राहत नाहीं, असें स्पष्ट दिसून येतें. पण अखेर सत्यमेव जयते.

नाथांचें वास्तव्य काशींत असतांना ज्या स्थळांचा त्यांच्याशीं संबंध आला व हल्लींहि संबंध सांगण्यांत येतो, त्याविषयीं माहिती संतवाङ्मयाचे निस्सीम भक्त श्री. रसाळ यांनीं नुकतीच ( फेब्रुवारी १९५० ) आणली ती पुढें देत आहें.

**पंचगंगा** असा उल्लेख आलेला आहे त्या ' कीरणा धूतपापा च पुण्यतोया सरस्वती । गंगायमुनाचैव पंचनद्यः प्रकीर्तिताः ॥ ' पांच नद्या एकामागून एक मिळत येऊन जेथें एकरूप झाल्या असें मानण्यांत येतें त्या स्थळीं गंगेच्या तीरावर जो घाट आहे, त्याला **पंचगंगाघाट** असें नामाभिधान प्राप्त झालें. तो गंगेच्या उत्तरतीरीं सुप्रसिद्ध आहे. वाराणशींतील वास्तव्यांत नाथांचा या घाटाशीं फार संबंध येतो.

**पंचमुद्रापीठ**—या पीठाचा ( योगासनवाचक ) उल्लेख भागवताच्या समाप्तींत आहे. बिंदुमाधवाच्या पूर्वेस पंचगंगाघाटावर पंचमुद्रेश्वर नांवाचें श्रीशंकराचें देवालय आहे. पिंडीस पांच मुखें आहेत. त्यांच्या ठेवणी योग शास्त्रांतील पंचमुद्रासदृश आहेत. योगाभ्यासी साधकांना मुद्रासिद्धि या शिवालयांत लवकर प्राप्त होते असें सांगतात. त्याला पंचगंगेश्वरहि म्हणतात.

दुसऱ्यानें जेव्हां नाथ काशीस गेले तेव्हां तेथें त्यांनीं हरिमूर्तीची स्थापना केली. मंदिरांत मुरलीधर गोपाळकृष्णाची मूर्ति आहे. मंदिरास द्वारकानाथ मंदिर म्हणत. तें बिंदुमाधवाच्या जुन्या देवळाजवळ आहे. नेपाळांतून नाथांना ही सुंदर मूर्ति मिळाली असें म्हणतात. देवालय लहानच असून सभामंडप नवीन पद्धतीच्या बांधणीचा आहे. पुजारी दक्षिणी ब्राह्मण आहे.

**त्रैलिंग किंवा तैलंग स्वामी मठ**—वाराणशीस गेल्यापासून नाथांचें मठांत वास्तव्य होतें. द्वारकानाथ मंदिराच्या मागील दारानें या मठांत जातां येतें. तेथें सुमारें आठ हात उंचीचें शिवालिंग आहे.

जवळच्या ओसरीवर एका लहान हौदांत तैलंगस्वामीचा भव्य पुतळा आहे. भोंवतालची जागा प्रशस्त आहे. नाथांचें पुराण येथेंच चालत असे. एकनाथी भागवत येथेंच संपूर्ण झालें.

येथून दोन बोळी पलीकडे जुनी मठी नांवाचा संन्याशांचा मठ आहे. जो प्रथम प्रतिस्पर्धी असून पुढें भक्त बनला तो संन्यासी येथें राहात होता असें सांगतात. ब्रह्मघाटाहून मोहल्यांत जातांना मोठें दत्तमंदिर आहे. मंदिरांतील एकमुखी षड्हस्ती दत्तमूर्ति दर्शनीय आहे. नाथांचीं कीर्तनें या मंदिरांत होत असत.

**अग्नेश्वर**—अग्निघाटावर अग्नेश्वराचें मंदिर आहे. नाथपुत्र हरि पंडित त्या मंदिरांत राहात होते. यावरून ते माध्वसंप्रदायी नसून कट्टर मीमांसक होते. नाथांचे वंशज हल्लीं तेथें कोणी नसल्याचा शोध लागला.

## पुत्र हरि पंडित

जनांना सन्मार्गानें वागण्यास लावावें. भेदाभेद न करतां सर्वांशीं समबुद्धीनें वागावें. लोक धर्मभ्रष्ट होत चालले होते, खऱ्या धर्माला पारखे झाले होते. परदास्यानें विमूढ बनले होते. आंधळेच बनले होते म्हणा ना ! ही अवनति जाणून तिचा उच्छेद करण्याचा नाथांनीं संकल्प सोडला होता असें त्यांचें चरित्र सांगतें. धर्मस्थापनेकरितां ‘ सततं कीर्तयन्तो मां यतंतश्च दृढव्रताः ’ या भगवंताच्या उक्तीप्रमाणें पुराण आणि कीर्तनद्वारां नाथांनीं आपलें कार्य सतत चालू ठेवलें होतें. तें करितांना ‘ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न ’ ही त्यांची दृष्टि कधीं ढळली नाहीं. जगाचा उद्धार करण्यासाठीं सतत झटणाऱ्या थोर संतांच्या प्रत्यक्ष घरांत त्यांना विरोध उत्पन्न होत असतो, अशीं साधुसंतांच्या बाबतींतच केवळ नव्हे, तर इतरहि थोर लोकांच्या बाबतींत उदाहरणें घडलीं आहेत.

नाथकृपेला सत्पात्र झालेली त्यांची पत्नी गिरिजाबाई हें मागें सांगितलेंच आहे. गिरिजाबाईला एक पुत्र व दोन–कोणी म्हणतात तीन–मुली झाल्या. पुत्र हरि आणि कन्या गोदूबाई व गंगाबाई. (व उमादेवी सर्वांत धाकटी. तुंगभद्रातीरीं तिचें सासर असल्याचें डॉ. तुळपुळे म्हणतात). गोदूबाई पैठणासच दिली आणि धाकटी कर्नाटक प्रांतांत दिली. पुत्राच्या अध्ययनाकडे मुळींच दुर्लक्ष झालें नाहीं. उत्तम संस्कृत अध्ययन करून तो निपुण पंडित झाला. त्यामुळेंच हरिपंडित हें सार्थ नामाभिधान पावला. पण एक वाईट झालें. त्याला आपल्या विद्वत्तेचा अभिमान उत्पन्न झाला. घटपटादि चर्वितचर्वणांतच त्याला मोठेपण वाटूं लागलें, वडिलांनीं संस्कृताचा अनादर करून मराठींत व्याख्यान द्यावें. हरिकीर्तन करावें हें त्यास बिलकुल आवडेनासें झालें. या बाबतींत पितापुत्राचे वादविवाद होऊं लागले. नाथ का अशा वादविवादांत हार जातात! हरि पंडित त्रासून सहकुटुंब सहपरिवार वाराणशीला राहावयास गेला. त्याला तीन मुलगे. त्यांपैकीं सगळ्यांत धाकटा रावोबा आजोबांजवळ राहिला. संस्कृतज्ञ पंडित असल्यामुळें काशींत हरि पंडिताची चांगली मानमान्यता झाली. त्यानें तेथें स्वतःचें घरहि केलें.

विद्वान् पुत्राच्या जाण्यानें नाथांच्या मनाला थोडीतरी हुरहुर वाटल्याशिवाय राहिली नाहीं. आपल्या उपदेशानें असंख्य जडजीवांचा उद्धार करून त्यांना आपण भक्तिमार्गाला लावतों, पण प्रत्यक्ष आपला पुत्र अभिमानग्रस्त होऊन आपल्यापासून दूर जातो. तेव्हां भक्तीचा राजपंथ स्थापन करण्यांत संशय नाहीं का उत्पन्न होत? आपल्याच घरांत बंड राहिल्यानें लोक पाषांडी होतील. असा विचार मनांत आणून पुत्राला बोध करण्याच्या हेतूनें स्वतः काशीला जाऊन हरि पंडिताला घेऊन येण्याचें नाथांनीं योजिलें. पुढें ब्राह्मणाच्या हातीं निरोप पाठविला. पिताजी येत आहेत हें समजल्यावर हरि पंडिताला आनंद वाटला. ते आल्यावर त्यानें पितृसेवा तत्परतेनें केली. पुत्राची पितृभक्ति अनुभवून नाथांनाहि संतोष

वाटला. कांहीं दिवसांनीं नाथांनीं सहज म्हटलें कीं, तुझ्या सहवासानें मला आनंद होतो. मला आतां म्हातारपणीं सर्वस्वीं तूंच जोड आहेस. तुझ्याशिवाय मला पैठणांत कांहीं गोड लागत नाहीं. म्हणून मी येथें तुझ्याकडे आलों. आयुष्याच्या सायंकाळीं तुझा वियोग नको. पैठणला चल आणि तेथील सर्व व्यवहार संभाळ. तुझे दोघे पुत्र येथें राहून तुझा कार्यक्रम चालवतील. नाथांचें बोलणें ऐकून हरिपंडितहि सद्गदित अंतःकरणानें म्हणाला, आपली सेवा घडावी असा माझ्या मनांतहि उत्साह आहे. तिकडे यावें अशी मलाहि पण आस्था उत्पन्न झाली आहे. पण दोन गोष्टींची विनंती आहे. त्या मान्य झाल्यास बरें. महाराष्ट्र ग्रंथावरून पुराण न सांगणें आणि परान्न वर्ज करणें या त्या दोन गोष्टी. आपण वंद्य वरिष्ठ ब्राह्मण आहां आणि मी आपला मुलगा पंडित आहें. माझेंच पुराण ऐकावें व स्वगृहींच भोजन घेत जावें. हा वर मला कृपा करून द्या असें म्हणून चरणांवर माथा ठेवला. नाथ सहजस्थितींत राहणारे असल्यामुळें त्यांजपाशीं आग्रहाचें वारें नव्हतें. पुत्राची निग्रहोक्ति ऐकून त्यांनीं 'अवश्य' म्हणून म्हटलें. नाथ पुत्रासह पैठणास आले. वृद्धापकाळ झाला होता. हरिपंतांचे संस्कृत पुराण दररोज ऐकत. नाथांच्या पुराणाची त्याला सर नव्हती. पूर्वीइतके श्रोते येईनासे झाले. फक्त नाथांचें दर्शन घेऊन जाऊं लागले. हा फरक पंडिताच्या ध्यानीं येण्यास फार कालावधि लागला नाहीं. वाणीच्या प्रसादाची देणगी सर्वांनाच लाभते असें नाहीं.

पैठणास एक ब्राह्मणाची म्हातारी भिक्षा मागून आयुष्य कंठीत होती. पूर्वीं ती घरची श्रीमंत होती. श्रीमंती असतांना सहस्रभोजनांचा संकल्प केला होता. तो तसाच राहिल्यामुळें तिच्या मनाला हुरहूर लागली होती. मनाला टोंचणारें शल्य त्या बाईनें एका सत्त्वशील ब्राह्मणाजवळ बोलून दाखविलें. तो म्हणाला, माय, कष्टी होऊं नका. एक ब्रह्मनिष्ठ जेवूं घातलांत कीं सहस्र ब्रह्मवृंद जेवूं घातल्याचें श्रेय प्राप्त होईल. अशा लक्षणांनीं परिपूर्ण असा भगवद्भक्त एकनाथ ब्रह्मनिष्ठ आहे. त्यास

जेऊं घाला. हें लक्षांत वागवून तिनें हळुहळू सर्व तयारी केली. खिरीसाठीं स्वतःच्या हातचें वळवट केलें. वडे घातले. पापड लाटले. त्याकाळीं हे पदार्थ विशेष प्रसंगीं अधिक प्रिय आणि आवडणारे होते हें अगदीं उघड दिसतें. ही वहिवाट बुडाली असें म्हणतां येत नाहीं. शहरांतील गृहिणींना इतर विविध व्यवसायांमुळें हे पदार्थ बनविण्यास अवसर सांपडत नसल्यानें ते विकत मिळण्याची अलीकडे सोय झाली आहे. अस्तु. सर्व तयारी केल्यावर एके दिवशीं पुराणानंतर म्हातारीनें नाथांचे चरण धरले आणि म्हणाली, मी अनाथ आहें. पण माझा बहुत दिवस हेतु आहे कीं, आपण माझ्या घरीं भोजनाला यावें. दयाळु नाथ नाहीं कसें म्हणणार ? पण पुत्राशीं वचनबद्ध झालेले. नाथ पंडिताला म्हणाले, या वृद्ध बाई काय म्हणतात तें ऐका. अशांची स्वामीला तेंव्हांच करुणा येते हें जाणूनच पंडित म्हणाले, मी आपणाला वचनांत गोंवून घेतलें तें आठवा आणि काय करायचें असेल तें करा. एकीकडे सद्भाव तर दुसऱ्या बाजूला अभिमान. दोन्ही पक्ष साधण्याकरितां नाथांनीं तोड सुचविली. बाबा, हिचा पूर्ण भाव आहे, तो सफल व्हावा व तुझ्याशीं केलेला करारहि मोडूं नये एतदर्थ असें कर. तूं स्वयंपाक कर नि आपण दोघे जेवूं आणि बाईला परमसंतोष होईल. बाईला आपल्या हातचें वळवट नाथांना घालावयाचें होतें. तें आतां कसें साधणार म्हणून कष्टी झाली आणि पंडित तेथून आंत गेल्यावर नाथांजवळ तिनें बोलून दाखविलें, ‘ जैसा ज्याचा भावो । तैसा त्यासी देवो । म्हातारीसी शांतवुनी पहा हो । ’ नाथ म्हणाले, तुम्हाला जे पदार्थ करावयाचे असतील ते खुशाल करा. आम्ही जेवणास सुरुवात केल्यावर तुम्ही केलेले पदार्थ मला आणून वाढा. पंडितानें स्वयंपाक केला. पितापुत्र जेवावयास बसले. म्हातारीनें आपलें पदार्थ नाथांना वाढले, आणि हात जोडून उभी राहिली. पंडित रागावले आणि म्हातारीकडे रागानें पाहूं लागले. पण तिचें चित्त भावार्थीत गुंतलें आहे आणि ती हात जोडून

प्रार्थना करीत आहे, नाथहि समाधानानें भोजन करीत आहेत असें पाहून हरिपंताच्या कोपाला विवेकानें सांवरून धरलें. ‘ क्रोधान्मत्त गज उठिला जीवीं । परि विवेकांकुश तो सांवरी । अमर्यादा सहसा न करावी । ऐसिया भावीं निवांत झाला ॥ ’ भोजन झाल्यावर नाथ म्हणाले, ‘ बाई, तुम्ही सोवळ्यांतच बसा, हरी पत्रावळी काढील.’ आज्ञा मान्य करून तुळसीदल मुखशुद्धि घेतल्यावर लागलीच पत्रावळी काढण्यास आला. नाथांची पत्रावळ उचलल्यावर तिच्याखालीं पुन्हा दुसरी, तीहि उचलली तर तिसरी, अशा सहस्र पत्रावळी उचलून बिचारा पंडित भागला ! हें कौतुक पाहून म्हातारी व पंडित दोघेंहि थक्क झालीं. सत्पुरुषाची परपारता कळत नाहीं असें म्हणून हरीनें नाथांच्या चरणावर मस्तक ठेवलें. माझा ज्ञानाभिमान नष्ट झाला आहे, आपलें परिपूर्ण ऐश्वर्य पाहून माझें मन मुरालें असें पंडित नाथांना म्हणाला. या प्रसंगाला चरित्रकारानें चमत्काराचें स्वरूप दिलें आहे. वास्तविक तसें घडलें असेल कीं नाहीं देव जाणे ! नाथ, हरि आणि म्हातारी हेच काय ते साक्षी. हरि ज्ञानाभिमानी असला तरी तो नाथांचा पुत्र होता. नाथांच्या सहवासांत आतां पोक्तपणीं रहात होता. नाथांच्या जीवनाचा, दयाळूपणाचा, निराभिमानतेचा, समदृष्टीचा आणि सहजवृत्तीचा परिणाम पंडितावर झाल्याशिवाय कसा राहील ? हरीच्या चित्तांत विवेक जागृत झाला. अभिमानाचें स्थान विवेकानें पटकावलें. नाथांना त्यानें विनवलें कीं, मी अपराधी आहें, मला क्षमा करा. पूर्वीप्रमाणेंच आपलें पुराणकीर्तन चालूं द्या. ‘ तुझिया वाणीचें श्रवण । हेंचि जड जीवां उद्धरण— ’ पुढें हरि पंडित नाथांची सेवा अतिप्रीतीनें भावार्थयुक्त करीत राहिला. घरांतला विरोध नाहींसा झाला. पुत्र निस्सीम भक्त बनला. हरिनामाचा गजर पूर्ववत् नाथांच्या वाड्यांत होऊं लागला. विवेकवाणी दुमदुमूं लागली. नाथांनीं अनेक चमत्कार केल्याचें वर्णन त्यांच्या चरित्रांतून आहे. मनांत येईल तें आपोआप होणें इतकी ज्यांची इच्छाशक्ति सामर्थ्यवान् आहे, त्यांना काय

अशक्य आहे ? बिनतारी संदेश वगैरे आश्चर्यकारक अर्वाचीन शोध मनुष्याच्या बुद्धीच्या प्रभावाचे द्योतक आहेत. विभूतिमत्व असल्याशिवाय ते घडून आले नाहींत. सारासारविचारानेंच मानलेल्या सर्व चमत्कारांकडे पाहिलें पाहिजे.

## एकनाथांची ग्रंथसंपत्ति

—चतुःश्लोकी भागवत

संस्कृत पंडितांचा विरोध सहन करून ज्ञानदेवानें व एकनाथानें मराठींत ग्रंथ केले. ग्रंथ मराठींत आहेत म्हणून त्यांची अवहेलना करूं नका असें नाथांनीं बाजावून ठेवलें आहे. ते म्हणतात, ' देखोनि मराठी गोठी न म्हणावी या चावटी। पहावी निजबोध कसवटी। निजात्मदृष्टिं सज्जनिं ॥ '

(२९–१०२४).

नाथांचें पहिलें लेखन चतुःश्लोकी भागवतावरील मराठींत ओंव्या. मूळ चतुःश्लोकी भागवत संस्कृत भागवताच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायांतील ३२ ते ३५ श्लोक. त्यावर एकंदर ओंव्या १०३६. सृष्टीच्या अगोदर मीच होतों. सारें सृष्ट जग माझेंच स्वरूप आहे. प्रलयानंतर जें राहील तेंहि मीच. माया म्हणतात ती काय? जी नाहीं ती काय वर्णावी ? माझें दर्शन न होणें—द्वैतभाव असणें ही माया. भगवंतानें जगांत प्रवेश केला असें दिसतें. कारण सर्व विश्वांत तो भरला आहे. तत्त्वतः तसें नाहीं. सर्व कार्याचें कारण आहे म्हणून. सर्वत्र सर्वकाळ भरलेलें तें आत्मस्वरूप. याचेंच ज्ञान करून घ्यावयाचें. हें या चार श्लोकांचें सार. ब्रह्मदेवानें तप केल्यावर भगवंतांनीं त्याला तें दिलें. ब्रह्मदेवानें नारदाला, नारदानें व्यासमुनीला, व्यासांनीं शुकाचार्याला आणि त्याजकडून जगाला. या चतुःश्लोकीचा विस्तारपूर्वक भागवत ग्रंथ

व्यासांनीं लिहिला. चतुःश्लोकी आणि भागवत एकादशस्कंध मराठींत एकनाथांनीं ओवीबद्ध केले. गुरूची आवश्यकता, सद्गुरु, सच्छिष्य, सद्गुरुसेवा हे विषय त्यांत असून सदाचार आणि निर्मळ अंतरंग असल्याशिवाय तप आणि भक्ति नाहीं. ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग मुक्तीचें साधन खरें, पण सर्वांना सुगम असा भक्तिमार्ग, असें प्रतिपादन आहे. चतुःश्लोकी भागवतावर गुर्वाज्ञेनें मराठींत निरूपण करण्यास चंद्रावती नगरींत चंद्रमा भटजींच्या घरीं नाथांना स्फूर्ति मिळाली. नाथांच्या ग्रंथसंपत्तींतील निरनिराळ्या अलंकारांचें सविस्तर वर्णन वेगवेगळें स्वतंत्र लेखांत देण्यांत येणार आहे. तेव्हां येथें त्या संपत्तींतील रत्नांचा नामनिर्देश करून फक्त रूपरेषा दिली आहे. ग्रंथाची बैठक अध्यात्मावर आहे.

## हस्तामलक

एका दरिद्री ब्राह्मणाला बरींच अपत्यें होतीं. त्यांपैकीं एका पुत्राला हस्तामलक म्हणत. तो महाज्ञानी होता. तो जन्मल्यापासून कांहीं काळपर्यंत मुळींच बोलला नाहीं. पण 'स्वानंदें नित्य तृप्त' असें हें बालक. 'तेज अंगीं न समाये। देखतां तहानभूक जाये।' अशी त्याची शरीरकांति. हा ब्राह्मण ज्या गांवीं राहात होता त्या गांवीं एकदां आद्य श्रीशंकराचार्य आले. त्याच्या घरीं गेले. मुलाची आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली. आचार्यांनीं त्याला विचारलें, तूं कैचा, कोणाचा, कोठील, कोण, काय नाम, कोण वर्ण? तुझें कोठूनि आगमन, पुढारें गमन तुझें कोठें? या प्रश्नमालिकेला हस्तामलकानें उत्तर दिलें. बोलत नव्हता तो मुलगा एकदम बोलला. 'मी मनुष्य नाहीं, देवयक्ष नाहीं. ब्राह्मण–क्षत्रियवैश्यशूद्र नाहीं, ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी अथवा वानप्रस्थ आश्रमी नाहीं किंवा भिक्षूहि नाहीं. मी निजबोधरूप असा आहें.

**माझेनि देवा देवपण। परमात्मा परमेश मी।**
**जगताचा आदि जगदीश। सकल भूतांचा पालक।**

**माझेनि ब्राह्मणां ब्राह्मणपण । माझेनि क्षत्रियां क्षत्रियपण ।**
**माझेनि वैश्यां वैश्यपण । नीचां नीच मी आपण ॥**

असें नाथांचें त्यावर विवरण आहे. आचार्यांचें हें चौदा श्लोकांचें स्तोत्र आहे. या चौदा श्लोकांवर ६७४ ओव्यांचें सुबोध निरूपण करून त्यांत आपल्या ' हृदयींचें गुह्यज्ञान ' नाथांनीं प्रगट केलें आहे. नाथांना अध्यात्माची अपूर्व गोडी. त्याचा आविष्कार याहि निरूपणांत झाला आहे. हें विवेचन अभ्यसनीय आहे. त्यांत नाथांचें वेदांतविषयक ज्ञान आणि मनोगत खुलून दिसतात.

## शुकाष्टक

शुकाच्या वाणीनें बाहेर पडलेलें हें अष्टक. नाथ स्वानंदांत सदैव रममाण. त्यांनीं तें मराठींत केलें आहे. या अष्टकांतील श्लोकांचा चतुर्थ चरण ' निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ' असा आहे. ओव्या ४५८ श्लोकांसह.

**' जेव्हां भेदुचि नाहीं । तेव्हां अभेद तें काई ।**
**परी चिन्मात्र जें कांहीं । उभयातीत ॥ '**
**ऐसा अद्वय एकला । एकपणें संचला ।**
**आणि पापपुण्यादिकांच्या पार गेला ॥**
**गळाली संदेहवृत्ति । जाली निःसंदेहप्राप्ति ।**
**मग वोतली देहस्थिति । अक्षररसें ॥**
**ऐसिये निस्त्रैगुणमार्गीं । विचारतां जो राजयोगी ।**
**तयासी विधिनिषेधजगीं । वस्तुवेगळा कैंचा ॥**
**तो अद्वयानंदाचा केवळ । वोतीव नित्य निर्मळ ।**
**जाहला तो अढळ । आनंदरूप ॥**

विधिनिषेधापासून मुक्त, सर्वात्मकता, पंचतत्त्वें, आत्मावबोध, विधिनिषेधरहित सर्वज्ञ जीवन्मुक्त, त्याचें जीवन, त्याची समदृष्टि, अहंतेचा

सर्वात्मकतेंत लय, असे विषय आहेत. या शुकाष्टकांत ब्रह्मरस ओतला आहे. त्याची गोडी ज्याची त्यानें स्वानुभवानें चाखली पाहिजे. नाथांना ती गोडी प्राप्त झाली. इतरांनाहि ती मिळावी अशी त्यांची उत्कटेच्छा. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती !

## स्वात्मसुख

सद्गुरुरायाला प्रारंभीं नमन करून श्रीगुरूच्या भजनानें सायुज्यतेचें शिखर गांठतां येतें, सद्‌गुरुकृपेचें स्वरूप, सद्‌गुरुसेवेपासून प्राप्त होणारें सुख, यांचें वर्णन केलें आहे. सद्‌गुरु तोचि ब्रह्ममूर्ति । भावार्थे करितां अनन्य भक्ति । शिष्या स्वात्मसुखाची प्राप्ति । होय निश्चिति तत्काळ ॥' मुख्य भावार्थ पाहिजे असें सांगून भावार्थाचें महत्त्व सांगितलें आहे. शेवटीं नाथ म्हणतात, 'हे जीवा आंतुली गोडी । अनिर्वाच्य चोखडी । ते लाविली कवित्ववाढी । वाचेच्या आळां ॥ तेथ जनार्दन कृपाघन । वर्षताहे स्वानंदजीवन । तेणें एकाकी कवितावन । सफळित सदा ॥' सर्वच प्रकरण मुळांत पाहण्याची इच्छा झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांत ५११ ओव्या आहेत. वेदांतविषयक निरूपण आहे. सामान्य जनांना समजण्यास कठीण, पण अंतरंगांत स्वानुभवानें ज्यांचा प्रवेश झाला आहे त्यांना गोड.

## आनंदलहरी

हें एक दीडशें ओव्यांचें प्रकरण आहे. त्यांत खरोखर आनंदाच्या लहरी उसळल्या आहेत. नमन वाचनीय आहे. परमेश्वर हाच सद्‌गुरु. त्याची भक्ति केली कीं इतर साधनें नकोत. गुरुभक्त नेहमीं आनंदांत वावरत असतो. देहाचा देहभाव निरसून सुखानें स्वानुभव भोगतो. त्याला भवभ्रम कसला आणि जन्ममरणाची यातायात तरी कोठली ? सद्‌गुरुकृपेंवीण ही जीवन्मुक्तावस्था प्राप्त होणार नाहीं. कृपा

झाली कीं ‘ याचि देहीं याच डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा ॥ ’ म्हणून ‘ सकळां साष्टांग नमन । तुम्ही जावें सद्‌गुरूसी शरण । चुकवावें जन्ममरण । पावावें सुख मोक्षाचें ॥ अशी सर्वांना प्रार्थना आहे. सर्वच अध्यात्मनिरूपण.

मन असतां आनंदाभीतरीं । उठति सुखाचिया लहरी । म्हणोनि वदली वैखरी । प्रेम आनंदलहरी या नांव ॥

## चिरंजीवपद

फक्त बेचाळीस ओव्यांचें हें लहानसें प्रकरण आहे. अविनाशी ब्रह्मपद तेंच चिरंजीवपद. तें प्राप्त होण्यास वैराग्य लागतें. जे विषयोपभोगांत गुरफटले जातात, त्यांजपासून वैराग्य दूर पळतें. कृष्णचरणाची प्राप्ति होण्यास विकल्प नष्ट झाला पाहिजे असें नाथ म्हणतात. शेवटीं साधावया वैराग्यज्ञान । मनुष्यदेहीं करावा प्रयत्न । सांगे एका जनार्दन । आणिक यत्न असेना ॥ परमार्थाचा मार्ग चोखाळूं इच्छिणारांनीं हें प्रकरण मुळांत सबंध वाचून त्याचें मनन करावें, आणि आध्यात्मिक चिरंजीवपद प्राप्त करून घ्यावें.

## रुक्मिणीस्वयंवर

नाथांनीं भागवतांतील दशमस्कंधांतील आणि हरिवंशांतील रुक्मिणी-स्वयंवराच्या कथानकाचा आधार घेऊन लोकप्रिय झालेलें हें रुक्मिणी-स्वयंवर फारच हृदयंगम रीतीनें मराठींत उतरविलें आहे. काशींत संन्याशाच्या निमंत्रणावरून वास्तव्य असतांना शके १४९३ त रामनवमीच्या पुण्यदिनीं अठरा अध्यायांचा व १७११ ओव्यांचा हा सुंदर ग्रंथ नाथांनीं संपविला. रुक्मिणीस्वयंवराख्यान लोकांना फार आवडतें असल्यानें व कवींनाहि त्यावर काव्य करण्याची आवड असल्यानें भास्कर कवीश्वर, नरेंद्र पंडित, विठ्ठल, वीरेश्वर, श्रीधरस्वामी, मोरोपंत

वगैरेंनीं त्यावर काव्यरचना केली आहे. पण नाथांच्या रुक्मिणीस्वयंवराची बरोबरी दुसऱ्या कोणासहि करतां आली नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. नाथांच्या रुक्मिणीस्वयंवराचें पारायण करणारे अनेक आहेत. तरुण आणि तरुणी योग्य जोडीदार मिळावा म्हणून या ग्रंथाचें पारायण पूर्वी करीत असत. शाळेंत जाणाऱ्या चवथ्या किंवा पांचव्या इयत्तेंतील मुलांकडून हा ग्रंथ घरांतील वडील माणसें हटकून वाचून घेत. हल्लीं आर्थिक परिस्थितीमुळें म्हणा किंवा शिक्षणप्रसारामुळें म्हणा, मुलगेहि चांगलेच उपवर होतात, आणि अनेक मुलींवरहि चांगला वर कधीं आणि कसा मिळेल असें घोकीत बसण्याची पाळी येत असली, तरी त्या चिंतेंतून पार पडण्यास एक भाविक उपाय म्हणून रुक्मिणीस्वयंवर त्या वाचीत असतील असें वाटत नाहीं. पण ही एका तऱ्हेनें त्यांची मोठी चूक आहे. संकटांत सांपडलेल्या सर्व तरुणतरुणींनीं रुक्मिणीस्वयंवराच्या पारायणाचा उपाय करून पाहण्यास काय हरकत आहे? निदान एक सुंदर काव्य वाचल्याचें श्रेय त्यांना प्राप्त होईल. इच्छित मनोरथहि श्रीकृष्णकृपेनें पुरे होणार नाहींत कशावरून?

ग्रा. क्र. ९९३

श्रीखंड्याच्या तथा श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें हा ग्रंथ लिहिला. तो लिहितांना नाथ कथेशीं अगदीं समरस झाले होते असें सर्व प्रसंगांच्या वर्णनावरून सहज लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. या स्वयंवरांत श्रीकृष्ण-रुक्मिणीच्या मंगल विवाहाची सुरम्य कथा आहे. म्हणून भाविक तींत रमतो. अध्यात्मदृष्टीचा वाचक तींत प्रकृतिपुरुषाचें लग्न म्हणजेच जीवाशिवांचें ऐक्य प्रतिपादन केलें आहे, म्हणून गढून जातो, आणि बहारदार असें विवाहांतील निरनिराळ्या प्रसंगांचें वर्णन वाचतांना रसिक वाचक गुंगतो. नाथ म्हणतात, 'ये ग्रंथीचें निरूपण। जीवाशिवा होतसे लग्न। अर्थ पाहतां सावधान समाधान सात्विकां॥ येथें विवेकी व्हावा वक्ता। सावधान पाहिजे श्रोता। त्याचेनि संवादें हरिकथा। सुख समस्तां होईल॥'

'अनुभव कसवटी। कथा चालली मराठी।' 'मुखीं जनार्दनचि वक्ता। जनार्दनचि झाला श्रोता। जनार्दनचि ग्रंथ लिहिता। सत्य सर्वथा हे वाणी॥' इतक्या दृढ निष्ठेनें ग्रंथलेखन केल्यावर तो सुंदर कां वठणार नाहीं ?

श्रीकृष्णस्वरूप, रुक्मिणीचा भाऊ रुक्मी यानें केलेली कृष्णनिंदा, रुक्मिणीची कृष्णप्रीति, सुदेवप्रेषण, द्वारकावर्णन, कृष्णानें केलेला सुदेवसत्कार, रुक्मिणीपत्रिका, मंगलकार्याची तयारी, रुक्मिणीची उत्कंठा, कृष्णाचें आगमन, अंबालयांतून रुक्मिणीचें हरण वगैरे प्रकार पहिल्या सात प्रसंगांत वर्णन केल्यावर त्यांच्या पुढील चार प्रसंगांत बळराम वगैरे यादवांनीं शत्रूंची कशी दाणादाण उडवून दिली याचें वीररसप्रधान वर्णन आहे. त्यापुढच्या प्रसंगांत कृष्णानें रुक्मीचा पराभव केल्याची हकीकत आहे. तेराव्या प्रसंगांत बळरामानें रुक्मिणीची समजूत घातल्याचें वर्णन आहे. दोन पुराणांतील कथेचा नाथांनीं जरी आधार घेतला असला तरी त्यांचीं वर्णनें अगदीं स्वतंत्र आहेत. या सर्व प्रकरणांत नाथांचें अध्यात्म प्रामुख्यानें डोकावतें हें लक्षांत वागविलें पाहिजे. या ग्रंथावर एकनाथदर्शनांत स्वतंत्र लेख असल्यामुळें त्याविषयीं येथें अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. फक्त पुढील पांच ओंव्या देतों.

**हे कृष्णकथा अलौकिक। महादोषांसी दाहक।**
**भवरोगासी छेदक। अर्धमात्रा सेविलिया॥**
**हे मुमुक्षूची कुळदेवता। मुक्तांची तरी नित्यमुक्तता।**
**येरा संसारिया सर्वथा। निवविती नवरसें॥**
**येऱ्हवीं कोण्ही जरी स्वभावें पढे। उरीं उघडती कानींचीं कवाडें।**
**अर्थ ऐकतां निवाडे। पुढें पुढें अति गोड॥**
**गोडपणा पडतां मिठी। सुटती जीवशिवाच्या गांठी।**
**कृष्णकथा हे गोमटी। उठाउठी निजलाभु॥**

**येथें भीमकीचे पुरले अर्थ। तो हा आदरें वाचितां ग्रंथ।**
**श्रोतयांचे मनोरथ। कृष्ण समर्थ पुरवील ॥**

नाथ इच्छेनुरूप वाचकांचेहि मनोरथ पूर्ण होवोत।

## आख्यानें आणि चरित्रें

नाथांनीं कांहीं आख्यानें लिहिलीं आहेत. त्यांत दशावताराच्या कथा आहेत. नववा अवतार गौतम बुद्धाचा मानण्यांत येतो. पण नाथांच्या मतें विष्णु बौद्ध होऊन पंढरपुरीं कटिवर हात ठेवून विटेवर उभे राहिले तो नववा अवतार. एकादशी माहात्म्य, रुक्मांगदाची कथा, तुळशी माहात्म्य, कृष्णदान, श्रीदत्तात्रेयजन्म, हनुमानजन्म, प्रल्हादचरित्र, ध्रुवचरित्र, उपमन्युकथा, सुदामचरित्र, संदीपनकथा, काशीमहिमा, रामरावणएकरूपता, सीता-मंदोदरीची एकरूपता, शिवशक्तिविवाह, गंगागौरीकलह, हळदुली इतकीं पौराणिक कथानकें त्रोटक लिहिलीं आहेत. श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई यांचीं स्तुतिपर चरित्रें अभंगांत गायिलीं आहेत. गीतामाहात्म्याला पांच अभंग दिले आहेत. नामदेवचरित्र ८१ अभंगांत दिलें आहे. गोरा कुंभार तीस अभंगांत, सांवता माळी तेरांत, चोखामेळा आठांत वर्णिले आहेत. याशिवाय निरनिराळ्या विषयांवरील अभंगसंख्या ३२४३ आहे. उपदेशपर रूपकें २०० आहेत. आरत्यांचे अभंग २३ आहेत. या सर्वांतून कोठें उपदेश, कोठें उपहास, विनोद, हास्यरस वगैरे भरलेले आहेत. हे सर्व रचतांना भलत्याच चुकीच्या मार्गानें जाणाऱ्यांची कानउघाडणी करून त्यांची अध्यात्माकडे प्रवृत्ति वळावी अशी दृष्टि नाथांनीं प्रामुख्यानें ठेवली होती हें स्पष्ट दिसून येतें. या सर्व कवनांतून समाजस्थितीचें चित्र चांगलें रेखाटलें आहे.

## अनुभवानंद

काव्यसंग्रह ग्रंथमालेंत हें १९०३ मध्यें प्रसिद्ध झालें. यांत गुरुशिष्य संवाद आहे. मला ज्ञानसंपन्न केलें याची फेड मी कशी करावी, असा

प्रश्न शिष्य गुरूला करतो. त्याचें गुरु उत्तर देतो: आत्मा आणि परमात्मा एकच. तुझें एकत्व हेंच प्राणिमात्राचें. तूं आणि प्राणिमात्र एक. तेव्हां कोणाशीं वैरत्व न करितां सन्मार्गानें आणि दयाळुपणानें सर्वांशीं वागणें हाच गुरूच्या ऋणांतून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग, हा विषय अनुभवानंदांत आहे.

## गीतासार

या गीतासारांत श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद दिला आहे. हें गीतासार ६७ संस्कृत श्लोकांचें आहे. त्यावर नाथांच्या ३७९. ओंव्या आहेत. शेवटच्या श्लोकावरील ओंव्यांत नाथ आरंभीं म्हणतात :—

**अभ्यंतर करावया शुध्द्यर्थ । गीतानाम हरित्तकी विख्यात ।**
**अगा ! जनहो सुनिश्चित । कां हें सेवा ना तुम्ही ॥३६९॥**
**जेविं हरितकी दुर्मळनाशिनी । तेवि गीता हे कळिकल्मषरेचनी ।**
**शुद्ध करी अंतःकरणीं । खुंटवी येणें जाणें ॥३७०॥**

## भावार्थ रामायण

नाथांनीं उतारवयांत लिहावयास घेतलेला हा ग्रंथ. त्यांच्या सर्व ग्रंथांत हा मोठा. त्याच्या चाळीस हजार ओव्या आहेत. हें फार हृदयंगम काव्य आहे. या ग्रंथाचें ग्रंथकर्तृत्व नाथ आणि त्यांचे शिष्य गावबा यांजकडे आहे. पंचेचाळिसाव्या अध्यायापासून पुढचे अध्याय गावबाचे आहेत. दोन लेखक असले तरी शिष्याला गुरूच्या लेखनकौशल्याची हातोटी चांगली साधली आहे. संस्कृतमधील वाल्मीकि रामायण, अध्यात्मरामायण, आनंदरामायण, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथांचा आधार या ग्रंथरचनेला असला तरी ग्रंथांतील विवेचनपद्धति पूर्णपणें स्वतंत्र अशी आहे. या सर्व ग्रंथांत अध्यात्म ओतप्रोत भरलेलें आहे. या ग्रंथांवर महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध विद्वान् आणि चिकित्सक ग्रंथकर्ते श्री. तात्यासाहेब करंदीकर

यांचा लेख या दर्शनांत आहे. तेव्हां या ग्रंथाचें गुणवर्णन येथें करण्याची आवश्यकता नाहीं. तथापि गावबासंबंधानें थोडी माहिती देणें इष्ट आहे.

श्रीनाथांची परमख्याति पाहून श्रीराम त्यांस एकांतीं भेटले. माझें अवतारचरित्र वर्णन कर असें सांगितलें. म्हातारपण आलें आहे, रामराया, तुझें चरित्र महाथोर आहे, तें माझ्या हातून कसें पार पडेल असें नाथ म्हणाले. त्यावर राम म्हणाले, 'नित्यनेम संध्यास्नान। सर्वांची आतां बोळवण। अहर्निशीं रामायण। करावें वचन मानुनी ॥' श्रीरामासी अभिवंदन। करूनि म्हणे आज्ञा प्रमाण। तूं साह्य असतां आपण। सहज रामायण प्रगटेल पैं ॥ वस्तुतः अंतर्यामींचा रामच कार्याला स्फूर्ति देतो. तशी स्फूर्ति नाथांना झाली. कर्ता करविता रामच आहे अशी राममय नाथमूर्ति होती. नाथांनीं मोठ्या उत्कंठेनें आणि अविश्रांतपणें निरंतर ग्रंथरचना चालविली. युद्धकांडापर्यंत रचना करून नाथांनीं लेखणी खालीं ठेवली. पुढील भाग गावोबा समाप्त करील असें सांगितलें.

एक मूढ मुका पैठणनजीक गंगातीरींच्या एका खेड्यांतील कुळकर्ण्याचा सर्वांत धाकटा मुलगा. त्याला शब्दोच्चार धड करवत नसे. मुलगा अतिशय खेळाडू. दररोज पुरणपोळी खायला मागे. मातापिता त्रासून गेले. त्याच्याशीं कोणी धड शब्द बोलेना. पुरणपोळीसाठीं मारहि खाई. एकदां त्यानें फारच हट्ट घेतला तेव्हां माता कांहीं झालें तरी दयाळू, मायाळू. तिचें मन कळवळलें. बाळा, तुला सदा पुरणपोळी लागते. कोठून घालूं? प्रतिष्ठानांत नाथांकडे जा. तेथें तुला मिळत जाईल. बाळ आलं पैठणला आणि नाथांच्या अंगणांत उभं राहिलं. आईहि मागोमाग आली. त्या बाळाला काय पाहिजे म्हणून नाथांनीं प्रेमळपणें विचारलें. आईनें सर्व वृत्तान्त सांगितला. त्या मुलाला हातीं धरून नाथांनीं गिरिजाबाईकडे स्वयंपाकघरांत नेऊन त्याचें संगोपन करण्यास सांगितलें. नाथ त्याला जवळ घेऊन बसत. शिकवण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळें त्याचें खेळण्यावरचें मन उडालें नाथांच्या जवळ बसून रामायण श्रवण करी. नाथांनीं त्याला

सज्ञान केलें. गावबा रामायण संपूर्ण करील असें जेव्हां नाथ म्हणाले, तेव्हां या मूढाच्या हातून हें कसें होणार असें इतरांना गूढ पडलें. पण नाथांनीं त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला होता. त्याच्या अंगीं सांपूं तें करण्याची पात्रता आणली होती. त्याजविषयीं दृढ विश्वास होता. यासाठीं त्यांनीं आपली लेखणी कृपाप्रसाद म्हणून गावबाच्या हातीं दिली. नाथांच्या देखत त्यानें एक अध्याय केला. नाथांना संतोष झाला. इतरेजन नाथांच्या महिमानाचें कौतुक करीत राहिले.

एकनाथाचें अलौकिकत्व आणि थोरपण दाखविणाऱ्या गोष्टी कोणास खऱ्या वाटतील किंवा न वाटतील, पण त्यांनीं आपल्या समकालीन जनतेवर जो मोठा आणि उदारतेचा ठसा उमटविला त्याचें फार महत्त्व आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. नाथ पराकोटीचे भक्त तर होतेच पण त्यांची नीतिमत्ता अत्यंत श्रेष्ठ प्रतीची होती, हें त्यांच्या ग्रंथांवरून दिसतें. त्यांचें शील अत्युच्च असून जीवनाचीं ध्येयेंहि अत्युच्च होतीं. बाह्य कवचांवरून आंतील गाभ्यावर आपली दृष्टि ठेवली पाहिजे. तो गाभा आश्चर्यकारक पावित्र्यानें प्रकाशमान होतो. नाथांच्या चरित्रानें आपलें आयुष्य चांगल्या रीतीनें उच्च ध्येयासाठीं घालावें अशी स्फूर्ति मिळते. ग्रंथांच्या बाबतींत नाथ तुकारामाइतके जरी लोकप्रिय नसले तरी शील, ध्येयें, विद्वत्ता, सुसंगतपणा, उदात्त जीवन या बाबतींत सर्व महाराष्ट्रांत संतकवींत नाथ सर्वांत श्रेष्ठ होते. आपल्या पिढींतील समाजावर त्यांनीं आपल्या चारित्र्यानें आणि ग्रंथांनीं परिणामकारक ठसा उमटविला ही महत्त्वाची बाब आहे. त्या बाबतींत नाथांची बरोबरी करणारा दुसरा नाहीं, असे नाथांबद्दल आदराचे उद्गार महाराष्ट्रकविसंतमालेचे संपादक मिशनरी ॲबट या थोर गृहस्थानें नमूद केले आहेत.

## एकनाथी भागवत

मूळ भागवताच्या एकादशस्कंधावर एकनाथांनीं मराठींत ओवीबद्ध टीका केली. या ग्रंथास एकनाथी भागवत म्हणतात. त्यांत भागवतधर्म

प्रतिपादन केला आहे. भागवतधर्म हा भागवत सांप्रदायिकांचा धर्म. मराठी भाषा जाणणाऱ्यांत ज्ञानेश्वरांनीं आपल्या ज्ञानेश्वरीनें प्रथम या भागवतधर्माचा प्रसार करण्याचें अमोघ साधन निर्माण केलें. त्या साधनाचें विस्तारपूर्वक विवेचन नाथांनीं एकनाथी भागवतांत केलें. ज्ञानेश्वरींत आलेल्या साधनांचा, विषयांच्या प्रतिपादनाचा सविस्तर खुलासा नाथभागवतांतील स्पष्टीकरणांत मिळतो. भागवतधर्माचे हे दोन मुख्य ग्रंथ. वारकरी पंथांत ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, हे सर्वथैव वंदनीय. ज्यांनीं यांची ग्रंथनिर्मिति अभ्यासिली आहे त्यांना या सर्वांचें विचारसाम्य असल्याचें दिसून येतें. अखंड झरा ज्ञानदेव. त्यांतून बाकीच्या प्रवाहांचा उगम. खरी कळकळ, ढोंगीपणाचा अभाव, परमेश्वरभक्ति, मानवप्रेम, सत्य, सदाचार, प्रामाणिकपणा, वैवाहिक जीवनाचें पावित्र्य, अनीतीचा, स्वार्थाचा, लोभाचा, मद्यपानाचा आणि इतर व्यसनांचा धिःकार या गोष्टी नाथभागवतांत ठळक दिसतात. अर्थात् जनतेला सन्मार्गाला लावण्याचा नाथांचा स्पष्ट हेतु होता.

संत सज्जन एक वेळां । थोर करुनियां सोहळा । आज्ञापिलें वेळवेळां । ग्रंथ करविला प्राकृत ॥ एकांतिं आणि लोकांतीं । थोर साक्षेप केला संतीं ॥ असें भागवत रचनेसंबंधानें स्वतः नाथांनीं म्हटलें आहे. श्रीगुरुजनार्दनस्वामी आणि श्रीदत्तात्रेय यांच्या आज्ञेनेंच हा ग्रंथ लिहिला असाहि उल्लेख आहे. गुरूच्या कृपादृष्टीखालीं ग्रंथास सुरुवात झाली. जसें लिहिणें होत असे, तसें गुरु पहात आणि ‘ तुझा बोलुचि एकएकू । सोलीव विवेकाचा विवेकू । तो संतोषासी संतोषु । आत्यंतिकु उपजवी ॥ तुझेनि मुखें जें जें निघे । तें संतहृदयीं साचचि लागे । ’ अशी शाबासकी मिळे इतकी दाट कृपा शिष्यावर असल्यावर सच्छिष्यानें पुढील उद्गार काढावेत यांत नवल काय ?

**जनीं जनार्दनचि एकला । तेथ एकपणें एका मिनला ।**
**तेणें एकपणाचा ग्रास केला । ऐसा झाला महाबोधु ॥**

**श्रीभागवतीं संस्कृत । उपाय असतां बहुत ।**
**काय नेणों आवडलें येथ । करवी प्राकृत प्रबोधें ॥**
**म्यां करणें कां न करणें । हें हिरोनि नेलें जनार्दनें ॥**
**तैशीच हेही कथा । तूंचि ग्रंथु तूंचि कविता ।**
**तेथ कोणी घ्यावी अहंता । मी कर्ता म्हणोनी ॥**

याप्रमाणें निरहंकार वृत्तीनें ग्रंथकर्तृत्वाचें सर्व श्रेय सद्गुरु जनार्दनस्वामीला दिलें आहे. 'ग्रंथारंभीं प्रतिष्ठानीं । तेथ पंचाध्याय संपादुनी । इतर ग्रंथाची करणी । आनंदवनीं विस्तारिली ॥' आनंदवन हें वाराणसीचें नांव. काशीलाच वाराणसी म्हणतात. 'वरुणा पातकातें वारी । अशी महादोष संहारी । मध्यें विश्वेश्वरी नगरी । वाराणसी खरी या हेतु ॥' वाराणसी नांवाची व्युत्पत्ति नाथांनीं अशी दिली आहे.

**तया वाराणसी मुक्तिक्षेत्रीं । मणिकर्णिका महातीरीं ।**
**पंचमुद्रा पीठा माझारीं । एकादशावरी टीका केली ॥**
**ही टीका तरी मराठी । परी ज्ञानदानें होईल लाठी ॥**

असा या टीकेवर अभिप्राय देऊन गुरूंनीं शिष्याची पाठ थोपटली आहे. हा ग्रंथ शालिवाहन शक १४९५ श्रीमुखसंवत्सरीं समाप्त झाला. त्याचे एकतीस अध्याय आहेत. 'एकादश म्हणजे एकावर एक—तेथ दुजेपणाचा न रिघे अंक—' तेंच एकमेव परब्रह्माचें परमसुख एकादश इंद्रियांना प्राप्त करून देणारी ही टीका आहे. साधकांना येथें एकत्वाचें निजसुख मिळेल. 'जनीं जनार्दन एक' हें जो यापासून शिकेल तो भवचक्रांतून सुटेल असें नाथ म्हणतात. भिक्षु गीतेवरील नाथांच्या ओंव्या वाचल्या म्हणजे नाथांच्या उच्च नैतिक ध्येयाची ओळख पटते.

भागवताच्या शेवटच्या अध्यायांत नाथांनीं भागवताचें मनोरंजक आणि बोधपर वर्णन केलें आहे तें असें:—

श्रीभागवत महाक्षेत्र ( मोठें शेत )। तेथें ब्रह्म मुख्य बीजधर।
नारद तेथ मिरासीकर। पेरणी तेणें विचित्र केली॥
तेथें श्रीव्यासें अतिशुद्ध। बांधारे घातले दशविध।
पीक पिकलें अगाध। स्वानंदबोध निडारे ( विकासला )॥
तेथ शुक बैसला सोंकारा। ( राखण )।
तेणें फोडिला हरिकथा पागोरा।
पापपक्ष्यांचा थारा। उडविला पुरा निःशेष॥
त्याची एकादशीं जाण। उद्धवें केलीं संवगण।
काढिले निडाराचे कण। अतिसघन कृष्णोक्तीं॥
तेथ नाना युक्तिपडिपाडीं ( प्रश्नोत्तर प्रकारानें )।
उत्तमोत्तम प्रश्न परवडी।
केळीं पकान्नें चोखडीं। त्यांची नीत नवी गोडी अविनाशी॥
ते अविनाशी निजगोडी। पदोपदीं अतिचोखडी।
एकादशामाजी रोकडी। उद्धवाचिये जोडी उपकार जगा॥
त्या उद्धवाचे मागले पंक्तीं। भावार्थदीपिका धरोनि हातीं।
श्रीधरें दावितां पदपदार्थी। निजात्मस्थितीं निवाला।
जेथ देशभाषा पदपक्षेंसीं। एकाजनार्दनकृपेची माशी।
तृप्ति होय अवघ्यांसरसी। निषेध तिसी असेना॥
एकाजनार्दनीं मांजर वेडें। भावार्थदीपिका उजियाडें।
हे रस देखोनी चोखडे। ताटापुढें पैं आलें॥
मीयों मीयों करितां स्मरण। कृपेनें तुष्टले सज्जन।
शेष प्रसाद देऊनि जाण। संतृप्त पूर्ण पैं केलें॥
हो कां त्या समर्थाच्या ताटीं। पूर्ण ब्रह्मरसें भरली वाटी।
तें मी अत्यंत प्रेमें चाटीं। स्वानंदपुष्टीं संतोषें॥

या भागवतरूपी शेतांत जें परमपवित्र असें पीक पिकलें त्यायोगें ज्यांचा सर्वभूतांच्या ठायीं अत्यादर आहे असे साधकजन सुखी होतात असें नाथ म्हणतात.

एकादशांतला एकेक श्लोक संसारबंधन तोडणारा आहे. भागवतांत एकादश हें मोक्षाचें स्थान आहे. श्रीकृष्ण वेदांचें जन्मस्थान आहे. त्याच्या मुखांतून हें एकादशाचें निरूपण निघालें आहे. त्यांत सकळ वेदार्थ असा भागवतधर्म निरूपिला आहे. भागवताचा मथितार्थ त्यांत आहे. चार प्रकारच्या संन्याशांत जसा परमहंस श्रेष्ठ, रसांत जसें अमृत श्रेष्ठ, तसें एकादशाचें भागवतांत श्रेष्ठत्व आहे. अशा या ग्रंथार्थाचें मराठी भाषेंतील लेखन स्वतः जनार्दनानेंच केलें आहे. देशभाषेंत ग्रंथ केला म्हणून पंडितांनीं त्याची उपेक्षा करूं नये अशी प्रार्थना आहे.

**या ग्रंथा आदर करिती । अथवा जे कां उपेक्षिती ।**
**केवळ जे कोणी निंदिती । तेही आम्हां ब्रह्ममूर्ति सद्‌गुरुरूपें ॥**

असें नाथ म्हणतात. एकनाथदर्शनांत एकनाथी भागवतावर सविस्तर लेख असल्यामुळें त्याचें येथें फक्त दिग्दर्शन केलें आहे.

## गीता – ज्ञानेश्वरी

गुरुगृहीं असतांना ज्ञानेश्वरीचा परिचय नाथांना झाला असावा. नाथभागवतावर तर ज्ञानेश्वरीचा पूर्ण ठसा उमटलेला दिसतो. भागवत लिहिण्यापूर्वीं आणि लिहीत असतांना ज्ञानेश्वरीचें नाथांनीं पूर्ण अवगाहन केलें असलें पाहिजे याची साक्ष भागवत वाचतांना पटते. ज्ञानेश्वरांनीं गीतेला शास्त्रेश्वरी म्हणून तिचा यथायोग्य गौरव केला आहे. एकनाथांनींहि ‘ जयाचे अंतरीं वसे नित्य गीता । पावन तो तत्त्वतां नित्यरूप ॥’ असें म्हटलें आहे. आणि ‘ ब्रह्मविद्या गीता मोक्षाचें साधन ’ असा गीतेचा गौरव केला आहे. ज्ञानेश्वरीचीं पारायणें करा म्हणजे गीतारहस्य उमगेल असें त्यांनीं ठिकठिकाणीं सांगितलें आहे. ज्ञानेश्वरीच्या अध्ययनाचा सुंदर ठसा त्यांच्या ग्रंथसंपत्तींत उमटला आहे.

ज्ञानेश्वरीसंबंधीं त्यांच्या हातून जें कार्य घडलें त्याचें निवेदन या चरित्रांत झालें नाहीं तर ती उणीव राहील. ज्ञानेश्वराचें समाधिस्थान

पाहण्याची फार इच्छा आहे असें नाथ एकदां म्हणाले. कालानुक्रमानें नाथांच्या आयुष्यांतील महत्त्वाचे प्रसंग केव्हां घडले हें निश्चित नमूद केलें नसल्यानें मोघम 'एकदां' असें निरुपायानें म्हणावें लागतें. उद्धवानें जाण्याची तयारी केली व आपल्याबरोबर लोकसमुदाय येऊं इच्छीत आहे असें सांगितलें. नाथांनीं संमति दिली. कारण कोणाचा उत्साहभंग करावयाचा नाहीं हा त्यांचा बाणा. पैठणाहून आळंदीला नगराहून जावें लागतें. तेव्हां नगरास त्यांचा मुक्काम पडला असावा हें निश्चित. ही यात्रा, प्रवासांत मुक्कामाचे ठिकाणीं कीर्तनें करीत, हरिनामाच्या जयजयकारांत इंद्रायणीच्या तीरीं येऊन पोहोंचली. तेथें दाट अरण्य होतें. त्यांत श्वापदें होतीं. त्यांचा किलबिलाट कानीं पडल्यावर मंडळी भयभीत झाली. अभय राहा असें नाथांनीं त्यांस सांगितलें. नाथांच्या भेटीनंतर आळंदीला हल्लींचें रूप आलें हें उघड दिसतें. ज्ञानेश्वरीच्या समाधीचें ठिकाण शोधण्याकरितां त्या वनांत ते शिरले. त्या झाडींत एक सुंदर अजान वृक्ष दुरून दिसला. समाधान वाटलें. कारण समाधिनजीक अजानवृक्ष आहे असें त्यांच्या कानावर आलें होतें. अजानाजवळ दुसरेहि पुष्कळ मोठाले वृक्ष होते. नक्की ठिकाण कोणतें याचा निश्चय होईना. सायंकाळ झाला. स्वस्थ चित्तवृत्तीनें नाथ तेथेंच राहिले. कृपामूर्ति ज्ञानेश्वर प्रकट झाले. नाथाला भेटले. आनंद झाला. नाथाला हातीं धरून समाधीचें मुख्य स्थान दाखविलें आणि ज्ञानदेव म्हणाले :—

**अजान वृक्षाची मुळी । आली असे मस्तकाजवळी ।**
**ते काढून वेगळी । समाधि प्रांजळ करावी ॥**
**म्हाळसाग्रामीं गीतार्थ । माहाराष्ट्र वाणीचा ग्रंथ ।**
**जाला तो हा काळपर्यंत । शब्द अशुद्ध होत पाठांतरीं ॥**
**अवलोकून तेथील अर्थ । शोधिला पाहिजे तो ग्रंथ ।**
**ऐकोनी दोनी कार्यार्थ । होत श्रीनाथ सुखाचा ॥**

त्यावर नाथांनीं समाधि उघडून मुळी दूर केली व नंतर ज्ञानेश्वरीचें संशोधन केलें, या त्यांच्या कार्याला वरील ओव्यांचा आधार आहे. नाथांना ज्ञानेश्वरांचा साक्षात्कार झाला म्हणून भक्तिभावानें ती गोष्ट केली. नाथांनीं या दोन गोष्टी केल्यानंतर यावरील ओव्यांची रचना चरित्रकारानें केली आहे हें उघड आहे. हल्लींहि एखाद्या प्रा. वाडेकरांना समाधि खोलून पाहण्याचा साक्षात्कार झाला नसेल कशावरून ? संशोधक दृष्टीनें आळंदीच्या विश्वस्तांच्या साहाय्यानें प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. हजारों वर्षे योगी समाधि अवस्थेंत राहूं शकतात या गृहीत गोष्टीस प्रत्यंतर सांपडण्याचा संभव आहे.

चमत्कार निर्माण करण्याकरित चरित्रकारानें नाथाला त्या झाडींत तीन दिवस अहोरात्र ठेविलें. लोकांच्या अन्नपाण्याची सोय लावण्याकरितां वाण्याचें दुकान आणिलें. त्यानें सात दिवस पुरेसा शिधा पुरविला. नंतर दिलेल्या सामानाची किंमत न घेतां अदृश्य झाला ! प्रत्यक्ष विठ्ठलानें वाण्याचें रूप घेऊन तेथें दुकान थाटलें आणि कार्यभाग झाल्याबरोबर अदृश्य झाला असें त्या कार्याला स्वरूप मिळालें. नाथमहिमा या वेळ-पावेतों बराच गाजला होता. महान भगवद्भक्त आपल्या परिवारासह आला आहे असें समजल्यावर त्याची सेवा घडावी आणि जमल्यास व्यापारहि व्हावा या हेतूनें एखादा व्यापारी आपलें दुकान तेथें घेऊन येणें साहजिक आहे. मनुष्याची बहुधा चांगल्याकडे अधिक प्रवृत्ति असते. त्यांतून सत्पुरुषाचें दर्शन होऊन सहवास घडल्यास ती बळावते. यात्रेकरूंचा नाथांविषयीं प्रेमभक्तिभाव प्रत्यक्ष पाहिल्यावर औदार्यबुद्धीचा मनावर पगडा बसून स्वार्थी क्षुद्र मनोवृत्ति मावळली. नाहींतरी जनीं जनार्दन पाहण्यास लावणारा जनार्दनाचा अंश प्रत्येकांत आहेच. तो जागृत झाला म्हणजे आपपरभाव लयाला जाऊन जनहिताचीं कार्यें घडत असतात. नाथ म्हणाले, तुमचें आचरण पवित्र म्हणून हा प्रकार घडला. आणि तेंच खरें ! अद्यापहि आपण पहातों

कीं शेकडों वारकऱ्यांना अन्नदान करणारे सध्यांहि कांहीं ठिकाणीं उदारात्मे आहेत !

तीन दिवसांनीं नाथ परत आल्यावर त्यांनीं समस्त मंडळीला सर्व वृत्तांत निवेदन केला. युक्तीनें सावधानपणें मुळी काढण्याकरितां परत त्या अरण्यांत गेले. जागा काळजीपूर्वक साफ केली. कंठाला लागलेली मुळी दूर केली. लोकांनीं जयजयकार केला. फक्त नाथाला ज्ञानेश्वरदर्शन झालें. केशवसुताच्या चारित्रांत फक्त इंद्रायणीतीर असा उल्लेख असून तेथें वस्ती असल्याचा उल्लेख नाहीं. नाथांच्या यात्रेचा वृत्तांत ऐकल्यावर मग प्रांताधिकाऱ्यानें अळंकापुरीं वस्ती वसवली आणि ग्राम अधिकारी नेमला. तेथून पुढें आळंदीच्या यात्रेचा प्रघात पडला असावा.

नाथ पैठणला परत आल्यावर त्यांनीं शोधक दृष्टीनें ज्ञानेश्वरी पुन्हा अवलोकन केली.

**श्रीनाथ शोध परिपाठी । ज्ञानेश्वरी प्रगट सृष्टी ।**
**येथील वक्तृत्वाची पुष्टी । आम्हाच दृष्टि न कळे पैं ॥**

ज्ञानेश्वरीचा प्रसार करून तिचा लाभ महाराष्ट्रास घडवून देण्याचें श्रेय सर्वथैव नाथांस आहे. त्यांनीं महाराष्ट्रास कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरींत प्रतिपादिलेल्या तत्त्वानुरोधानें वागून आणि नाथांनीं दाखविलेला ज्ञानयुक्त भक्तिमार्ग पाळून हें ऋण फेडण्याचा प्रत्येक महाराष्ट्रीयानें प्रयत्न केला पाहिजे. संतचरित्रें हेंच शिकवितात.

## अभंग, भारुडें वगैरे

नाथांचे अभंग सहस्रावधि आहेत. ते साध्या लोकभाषेंत आहेत आणि त्यांतील उपदेश सहज मनावर ठसण्यासारखा आहे. नाथांच्या वाङ्मय सृष्टींत अध्यात्माचा प्राण आहे. कांहीं कांहीं अभंग केवळ

आध्यात्मिक असले तरी फार प्रेमळ आहेत. कांहीं अभंगांचा व भारुडांचा रूपकात्मक अर्थ लागला म्हणजे नाथवाङ्मयाचें फार कौतुक वाटूं लागतें. नाथांचें समाजस्थितीचें निरीक्षण फार बारीक दृष्टीनें होतें, हें त्यांच्या निरनिराळ्या कवनांवरून दिसतें. त्यांत लोकांची करमणूक करून त्यांना बोधामृत पाजलें आहे. जेथें सर्वच गोड तेथें कमीअधिक चांगल्याची निवड कशी करावी ?

## नाथप्रणीत भागवतधर्म

प्राचीन काळापासून जो सनातन आर्यधर्म प्रचलित आहे, त्याचेंच साधेसुधें स्वरूप म्हणजेच भागवतधर्म. जगांत निरनिराळ्या भागांत लोकस्थितीला अनुरूप असे धर्मपंथ महान् विभूतींनीं मोक्षसाधनाकरितां निर्माण केले. ते त्या विभूतींच्या नांवावर चालू आहेत. सनातन आर्यधर्माचें तसें नाहीं. तो मानवधर्म आहे. सर्व मानवजातीला मार्गदर्शक असा आहे. त्यांत परमेश्वर आणि त्याचा भक्त माणूस यांचा प्रत्यक्ष संबंध आहे. मध्यस्थाची गरज नाहीं. तो जगदुत्पत्तीपासून चालत आला आहे. वटवृक्षाप्रमाणें तो वृद्धिंगत होणार आहे. त्याला अनेक फांद्या फुटल्या तरी बुंधा एकच. प्रेमरसांत त्याची वाढ. सर्वांभूतीं अभेदभाव हें त्याचें मुख्य लक्षण. भागवतधर्म हें त्याचें आधुनिक सुंदर स्वरूप. नाथांच्याच शब्दांत त्यांचीं कांहीं लक्षणें येथें दिल्यास त्याचें ज्ञान होण्यास साधन होईल.

**दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण ।**
**हे भागवतधर्म पूर्ण । मुख्य तें भजन या नांव ॥**

भक्तीचें महत्त्व —

**सकळ योगांचें योगगव्हर । वेदांत निजभांडार ।**
**सकळ सिद्धींचें परमसार । भक्ति साचार हरीची ॥**

हरीची भक्ति म्हणजे काय तर —

**जीव परमात्मा दोनी एक। ऐसें जाणणें तें ज्ञान देख।**
**ऐक्य भोगणें परमात्मसुख। विज्ञान सम्यक् त्या नांव॥**

भाग्यशाली नरदेहाचा लाभ झाल्यानें माणसानें नेहमीं मनांत वागवावें कीं—

**भरतखंडीं नरदेहप्राप्ती। हे परमभाग्याची संपत्ती।**
**तेथही विवेकु परमार्थी। त्याचा वशवर्ती मी परमात्मा॥**
**मीचि देवो मीचि भक्तु। पूजोपचार मी समस्तु।**
**मीचि मातें पूजितु। ही इत्थंभूत उपासना॥**
**भक्ति म्हणजे सर्वांभूतीं। सप्रेम भजनयुक्ती॥**

असा भक्तिभाव धरून—

**अन्नवस्त्र दान मान। पोटींच्या कळवळ्यान जाण।**
**करावें भूतीं प्रियाचरण। हा स्वधर्म जाण सर्वांचा॥**

स्वधर्माचें किती गोड वर्णन आहे हें! स्वधर्माचरण करीत असतांना सदैव भावना बाळगावी कीं ' पिता स्वयमेव नारायण। माता प्रत्यक्ष लक्ष्मी आपण। ऐसे भावें ज्याचें भजन। सुपुत्र जाण तो एक॥ ' जें सुपुत्राला लागूं तेंच सुपुत्रीलाहि. त्याकरितां अनुसंधान लागतें. तें कोणतें म्हणाल तर—

**काया वाचा आणि मन। दृढ आवरावे आपण।**
**तुटों नेदावें अनुसंधान। सदा सावधान निजरूपीं॥**

असें अनुसंधान बाळगल्यावर नरदेहाची खंती वाटणार नाहीं. उलट

**धन्य नरदेहाची प्राप्ति। धन्य साधूंची संगती।**
**धन्य धन्य ते भावार्थी। जे भगवद्भक्तीं रंगले॥**

अशी दृढ भावना होईल. मग

**अभेद भक्ति वैराग्य ज्ञान। स्वयें आचरोनि आपण।**
**देखीं लावावे इतर जन। लोकसंग्रह जाण या नांव॥**

अशा रीतीनें जो लोकसंग्रह करीत राहून ' मीचि विश्व हें आलें बोधा । स्तुतिनिंदा निमाली ॥ ' ही अवस्था त्यास लाधेल आणि

**' सत्यापरतें नाहीं तप । सत्यापरता नाहीं जप ।**
**सत्यें पाविजे सद्रूप । सत्यें निष्पाप साधक होती ॥ '**

असें आचरणानें जनतेला उदाहरण घालून देईल.

**अंतरशुद्धीचें कारण । मुख्यत्वें हरिकीर्तन ।**
**नामापरतें साधन । सर्वथा आन असेना ॥**
**सांडूनि संसारस्फूर्ति । चित्स्वरूपीं जडे वृत्ती ।**
**जीवशीव एकत्वा येती । योगसंग्रहस्थिति या नांव ॥**

जेथें जो गुण दिसेल तो ग्रहण करावयाचा असें संग्राहक धोरण भागवतधर्माचें आहे. पूर्वापार चालत आलेली धार्मिक परंपरा संभाळून भागवतधर्माचा उपदेश नाथांनीं केला. स्वतः आचरण ठेवलें. जगाला मार्ग दाखवला. जन्माचें सार्थक केलें. नाथमहाराज, आपल्याविषयीं काढावे तितके धन्योद्गार अपुरेच पडणार ! आपणांस शतशः प्रणाम. हें भागवतधर्माचें थोडक्यांत सार आहे. भागवतधर्माचें विस्तारशः विवेचन स्वतंत्रपणें झालें असल्यामुळें येथें एवढेंच दिग्दर्शन पुरे.

नाथमहाराजांनीं आपल्या सर्व लहानमोठ्या ग्रंथांतून एकेश्वरी मताचा प्रचार केला आहे. मुसलमानांच्या आक्रमणानें सर्व समाज विस्कळित झाला होता. खऱ्या धर्माचें ज्ञान लोपलें. अर्थात् जनहिताच्या तळमळीनें त्यांनीं जोराचा प्रचार केला असला तर तो यथाकाळीं अवश्य होता. संतांनीं प्रचारकार्य केलें यांत त्यांच्या सद्धेतूकडे न पाहतां दोष लावण्याची प्रवृत्ति क्षम्य नाहीं. गेल्या शतकांतील सुधारकाग्रणी महाराष्ट्राचे थोर द्रष्टे न्या. रानडे यांनीं भागवतधर्मावर आणि भागवतधर्म मीमांसा या विषयावर दिलेल्या दहा व्याख्यानांत भागवतधर्माचें सोज्ज्वळ स्वरूप वर्णिलें आहे. ज्यांस शक्य असेल त्यांनीं न्या. रानड्यांचीं धर्मपर व्याख्यानें हें पुस्तक वाचावें.

# अं त का ळ

नाहीं जन्म धरितां। भय नाहीं देहीं वर्ततां। भय नाहीं देह त्यागितां। हें ब्रह्म परिपूर्ण हरी दावी ॥ ( भा. ३०–४११ )

गावबानें लिहिलेला एक अध्याय श्रवण करून नाथांनीं संतोष प्रगट केला. रामायण ग्रंथ गावबा संपूर्ण करील असें सर्वांस सांगितलें. ज्यांनीं स्वतःच्या शरिरावर विजय मिळविला आहे त्यांना इच्छामरण असतें. ‘ मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ’ हें तत्त्व त्यांच्या अंतःकरणांत ठसलेलें असतें. आपलें अवतारकार्य संपलें. आपल्या हातून जेवढें घडावयास पाहिजे तेवढें घडलें. आतां जडदेहाचा त्याग सुखानें करावा असें मनांत आल्याबरोबर इहलोकींच्या पसाऱ्यांत न घुटमळतां ते झडझडून बाहेर पडतात. नाथांनीं सर्वांना पुसून स्वेच्छेनें तनूचा त्याग केला. असें इच्छामरण भाग्यशाली विभूतींना लाभतें. जनांना नाथांच्या प्रयाणाची वार्ता कळल्याबरोबर जनसमुदाय नाथगृहाकडे दर्शनाकरितां धांवला. अंतकाळीं सुद्धां नाथांची मुद्रा नेहमींप्रमाणें प्रसन्न आणि सतेज होती. जे विरुद्धवादी होते ते म्हणूं लागले, एवढा मोठा सत्पुरुष, आणि मरण सामान्य माणसाप्रमाणेंच येणार काय ? त्यावर

**श्रीनाथ स्वानंदस्थिति। स्वलीला बैसोन स्वेच्छागती।**
**काय बोलिला जनाप्रती। तेंचि श्रोतीं परिसावें॥**
**भगवज्जनाचें मरण। केवी होय सकळां समान।**
**म्हणोनि येवढें महिमान। देवें आपण प्रगटविलें॥**

असें बोलून उद्धवाला दिंडीसमारंभ सिद्ध करण्यास आज्ञा केली. नाथांचें निजधामगमन होणार म्हणून प्रसिद्ध झालें. लहान, थोर, सर्व ग्रामस्थांची नाथदर्शनाला गर्दी लोटली. आसपासचे शेकडों लोक आले. थोर थोर महाजन समारंभ साहित्यासहित दर्शनाला प्राप्त झाले. दिंडीची

सिद्धता आणि पताकांची शोभा व जनसमुदायाच्या उचंबळलेल्या वृत्ती यामुळें या थोर पुरुषाचा आतां वियोग होणार याचें कोणासहि भान राहिलें नाहीं. या समारंभांत पुत्र, मित्र, भक्त आणि इतर जन सहभागी झाले.

दिंडीची सर्व सिद्धता झाली आहे असें उद्धवानें सांगितल्याबरोबर लागलीच नाथ आसनावरून स्वतः उठले. गंगाजळानें आपल्या हातानें स्नान केलें. नंतर धूतवस्त्र परिधान करून गोपीचंदनाचा तिलक लावला. खांद्यावर वीणा घेतला आणि हरिकीर्तन करीत हरिजन समुदायासह चालले. मार्गावर पदोपदीं जनांनीं प्रेमानें पूजन केलें. सुमनांच्या आणि तुळशीच्या माळा जनांनीं नाथांच्या कंठीं घातल्या. कोणी आरत्या ओवाळल्या. कोणी चरणावर मस्तक ठेवूं लागले. नाथवदनाकडे प्रेमानें पाहून आतां हें दर्शन दुर्लभ होणार म्हणून अनेकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा घळघळूं लागल्या. अशी ही नाथांची निर्वाणीची मिरवणूक हरिनामाच्या जयघोषांत गंगातीरावर लक्ष्मी तीर्थापाशीं वाळवंटावर जाऊन पोहोंचली. मूळ नाथांचें कीर्तन गोड. श्रोत्यांना श्रवणाची आवड. अर्थात् भक्तिरस उत्पन्न झाला गाढ. सगळे एकाग्रचित्त झाले. विद्वज्जनांनीं प्रश्न विचारला, असा पुन्हा अवतार केव्हां होणार? त्यावर नाथांनीं अभंग म्हटला:

**आम्ही कां संसारा न येणें । करोनियां हरीभक्ति ।**
**रामनाम कीर्ती । जड जीव उद्धरणें ॥ ध्रु० ॥**
**साच असतां तरी । धाक धरितां चित्तीं ।**
**भव विभव प्राप्ती । समूळ मिथ्या ॥**
**जैं धैर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।**
**तैं आम्हां येणें पडे । संसारास्थिति ॥**
**नानामतें पाषांड । कर्माठायीं अतिबंड ।**
**तयाचें ठेचावें तोंड । हरिभजनें ॥**

**सर्वभूतीं भगवद्भावो । भक्तीचा निर्वाहो ।**
**धर्माचा अहंभावो । वाढवणें ॥**
**सर्वभूतीं भगवद्भक्ति । प्रतिपादसी वेदोक्ति ।**
**हेंचि एक निश्चिती । करणें आम्हां ॥**
**एकाजनार्दनीं विश्वरूप गोविंद । भेद धरितो निंद्यहि अतिनिंद्य ॥**

नंतर नाथांना सर्वांनीं सप्रेम वंदन केलें. नाथहि सकळांना नमन करून संपूर्ण कृपा असूं द्या असें शेवटचें वचन बोलले. मग आरती झाली. नंतर तनुत्याग करण्यासाठीं गंगेच्या प्रवाहांत नाभीला पाणी लागेपर्यंत जाऊन 'स्वलीळा सोडित देहासी.' पुढचा संस्कार यथाविधि हरिपंडिता-कडून ब्राह्मणांनीं करविला. ज्या ठिकाणीं देहदहन केलें होतें, त्या ठिकाणीं दुसरे दिवशीं कृष्णतुळशीचें रोप आणि पिंपळ पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. अर्थात् तेथें समाधि बांधून पादुका स्थापन करण्यांत आल्या. सर्वांसुखीं मंगल बोलवून, जन्माचें सार्थक करून, अखंड कीर्ति मागें ठेवून गेलेल्या थोर महात्म्या संताची पुण्यतिथि तेव्हांपासून आजवर भक्तिभावानें लाखों लोक पाळीत आहेत. धन्य एकनाथमहाराज! ज्या महाराष्ट्राला अभेदभक्तीचें बाळकडू तुम्हीं पाजलें तोहि धन्य!!

## नाथांची शिकवण

भरतखंड ही पुण्यभूमि आहे. त्या पुण्यभूमीचा महाराष्ट्र हा एक प्रमुख भाग आहे. त्यांत थोर थोर संत, शूर योद्धे, राज्यकर्ते, विद्वान्, कवि आणि ग्रंथकर्ते होऊन गेले. त्यांनीं आपली कीर्ति अजरामर करून ठेवली. आधुनिक काळांत सुद्धां राष्ट्रोद्धारासाठीं सर्व आयुष्य खर्चणारे दादाभाई, सर्व हिंदुस्थानची सर्वांगीण सुधारणा होण्याचे उपाय चिंतून सुचवणारे महादेव, समाजाची हीन स्थिति अवलोकन करून त्याला जागे करण्याचे प्रयत्न करणारे लोकहितवादी, साहित्यांत नवचैतन्य

ओतणारे शास्त्रीबावा, मागासलेल्या समाजाची उन्नति करण्यासाठीं अहर्निश झटणारे ज्योतिबा, कळकळीचे समाजसुधारक आगरकर, देशसेवेंत सर्वस्वाची आहुति देणारे गोखले, पारतंत्र्यशृंखला तोडण्याकरितां स्वराज्याची घोषणा करून हालअपेष्टा सोसणारे टिळक आणि स्त्रीजातीचा उद्धार करण्याचें कार्य दीर्घकाल करणारे कर्मवीर अण्णा आणि इतर लहानमोठे समाजसेवक या महाराष्ट्रांत झाले आहेत. त्यांनीं महाराष्ट्राचा लौकिक वाढविला आहे. ज्ञानेश्वर, एकनाथांपासून जें संतमंडळ होऊन गेलें, त्या मंडळाच्या समाज सेवेची परंपरा कोणत्या ना कोणत्या रूपानें तरी त्यांनीं कायम ठेवली आहे.

ज्ञानेश्वरापासून पेशवाईचा उदय होई तों जे कवि होऊन गेले त्यांचे संतकवि आणि पंतकवि असे दोन वर्ग करतां येतात. ज्यांनीं सुबोध आणि प्रासादिक वाणीनें जनांस सद्धर्माचा उपदेश केला आणि त्यांना सन्मार्गास लावलें तें संतकवि. ज्यांनीं निरनिराळ्या वृत्तांत काव्यरचना करून शब्दचमत्कार आणि अर्थचमत्कार यांच्या साहाय्यानें वाङ्मयविहार करून लोकांचें मनरंजन केलें तें पंतकवि. संतकवींचें ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास हें प्रमुख संतपंचायतन होय. त्यांपैकीं एकनाथाचें चरित्र येथवर कथन केलें आहे. आतां उपसंहाराच्या दृष्टीनें एकनाथांच्या शिकवणीचा ठोकळ मानानें परिचय करून घेऊं.

एकनाथमहाराज आपल्या शुद्धाचरणानें व वसुधैवकुटुंबवृत्तीनें सर्वांस पूज्य झाले. हातीं घेतलेल्या कार्यांत यशस्वी, अभयवृत्तीचे म्हणून सामर्थ्यवान, सत्यापरता नाहीं धर्म हा बाणा म्हणून सत्यनिष्ठ, विद्या-पारंगत म्हणून विद्यावंत, पवित्र कुळीं जन्मलेले कुलवंत, सदैव शुचिर्भूत आचरण करणारे शुचिष्मंत, प्राणिमात्रावर कृपाळू दृष्टि ठेवणारे दयाळू, कधींहि न उगमगणारे धैर्यशाली, संतुष्ट, निःस्पृह, वैराग्यशील, आनंदरूप आणि ऐक्यरूप असे एकनाथ श्रेष्ठ सिद्ध होते. राष्ट्राच्या अभ्युदयार्थ

अशा विभूति जन्मास येत असतात. आपल्या पुण्यभूमीला मधूनमधून काळोखांत काळ कंठावा लागला. त्यांतून बाहेर पडण्यास ज्ञानदीप उजाळून जनतेला सन्मार्गाला लावण्यास साधुसंत आणि कर्तृत्ववान् पुरुष अवतीर्ण झाले. बुडत्या काळीं ज्यांनीं जनतेला हात दिला, हताश जनतेंत आशांकुर उत्पन्न केला, राष्ट्रीयत्वाची कल्पना उत्पन्न केली, आपलेपणा कायम राखण्यास उत्तेजन दिलें, ऐक्यवृद्धीचें महत्त्व सिद्ध केलें, समाजाच्या उत्कर्षास अपायकारक, वेडगळ चाली-रीतींचा उघडपणें निषेध केला व सनातन आर्यधर्माचें सोज्वळ स्वरूप कायम राखलें अशा थोरांचें पुण्यस्मरण ठेवणें सर्व समजूतदार माणसांचें कर्तव्य आहे. नाथांनीं हें समाजोद्धाराचें कार्य किती कळकळीनें केलें हें त्यांच्या ग्रंथसमुच्चयांतील अनेक उद्गारांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

अलीकडे क्रांतिवादी वा पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या कांहीं अहंमन्यांचें मत असें प्रगट होत असतें कीं, ज्ञानेश्वर एकनाथादि होऊन गेल्याला कांहीं शतकें लोटलीं. त्यांना देशसेवेची, देशकल्याणाची आणि समाजो-द्धाराची हल्लींसारखी व्यापक कल्पना नव्हती. त्यांनीं देशकल्याण काय साधलें? कोणता पुरुषार्थ संपादन केला? कोणते इष्ट फेरफार घडवून आणले? उगीच पूर्वीं होऊन गेलेलीं माणसें चांगलीं या अंधश्रद्धेनें त्यांचे विनाकारण देव्हारे माजविण्याचें काय प्रयोजन आहे? अशा वितंडवादी लोकांशीं रामदासांनीं सांगितल्याप्रमाणें वादाविवाद करीत कालक्षेप करूं नये हा उत्तम मार्ग होय. पूर्वसंचिताचा त्याग अगर तिटकारा करणें केव्हांहि हितकर नाहीं. थोर पुरुषांच्या ईश्वरी प्रसादामुळें त्यांचे आपल्या समाजावर अत्यंत उपकार झाले आहेत. ज्ञानेश्वर एकनाथादि संतांचीं चरित्रें व त्यांचे ग्रंथ आजवर एकसारखे अनेकांस स्फूर्तिदायक होत आले आहेत, ही गोष्ट कोणाहि विचारवंतास नाकबूल करतां येणार नाहीं. ज्यांना त्यांची योग्यता ओळखतां येत नाहीं ते अभागी होत असें समजलें पाहिजे.

' यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत-संभवामि युगे युगे ' या भगवद्वाक्यांत एका अर्थी तथ्यांश आहे. प्राचीन काळाकडे धांव न घेतां अलीकडचा दोन-चारशें वर्षांचा काळ जरी घेतला तरी आपल्या या प्रिय मातृभूमींत निरनिराळ्या प्रांतांत जे संत, मुत्सद्दी, राज्यसंस्थापक, विद्वान् ग्रंथकार होऊन गेले ते सर्व ईश्वरी अंशरूपानें जगदुद्धारार्थ अवतारच समजावयाचे.

**' संसार म्हणिजे महापूर । माजीं जळचरें अपार ।**
**डंखूं धावती विखार । काळसर्प ॥ '**

अशा या संसारांत आशा नांवाची सुसर जाभाड पसरून गिळण्यास, काम मगरमिठी मारण्यास, वासना धामीण विळखे घालून बद्ध करण्यास आणि अभिमान चोर सर्वस्व हरण करण्यास टपून बसलेले असतात. अशा संकटमय प्रसंगांतून पार पडण्यास साधन असल्याशिवाय तरणोपाय नाहीं. दलदलीच्या अथवा मार्गरहित डोंगराळ प्रदेशांतून अगर घोर अरण्यांतून मार्ग काढण्यास माहीतगार वाटाड्याची आवश्यकता असते. अर्जुन मोहपाशांत गुंतून कर्तव्य-पराङ्मुख झाला. काय करावें हें त्यास सुचेनासें झालें. अशा किंकर्तव्यमूढतेच्या प्रसंगीं त्यास जसा श्रीकृष्णवचनामृताचा लाभ झाला तसा लाभ-तशा उपदेशाची आवश्यकता-संसारी माणसांना अडचणीच्या वेळीं होणें अगत्याचें आहे. गीतारहस्य प्राकृत जनांच्या परिचयाचें झाल्यानें श्रेयस्कर होईल हें जाणून ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी लिहिली. तेंच रहस्य जास्त स्पष्ट रीतीनें व सविस्तर स्वतःच्या आचरणानें लोकांच्या मनावर ठसविण्याकरितां नाथांनीं आपली ग्रंथसंपत्ति निर्माण केली. ज्ञानेश्वरांनीं रचलेल्या पायावर एकनाथांनीं उभारलेल्या इमारतीस सौंदर्य आणून पूर्ण करण्याचें काम नामदेव-तुकाराम-रामदासादि संतांनीं केलें. जनसेवा हें त्यांचें ध्येय होतें. जनांचा उद्धार व्हावा ही त्यांची तळमळ. त्याकरितांच त्यांचे अवतार. म्हणूनच ते वंद्य झाले.

त्यांनीं आपल्या जन्माचें साफल्य केलें, म्हणून त्यांच्या नांवाचा जयघोष होतो. नाहींतर अवतार सगळ्यांचेच आहेत. रानड्यांनीं एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें कोणाचा अवतार लोभाचा, कोणाचा आळसाचा, कोणाचा व्यसनाचा, तर कोणाचे अनेक दुर्गणांचे व कांहींचे सद्‌गुणांचे. दुर्गुणांचे दुष्परिणाम मनुष्यास अधोगतीस मिळवितात हें पटविण्याकरितां सद्‌गुणमूर्ति लागतात. साधारण जनसमूहास व अविचारी लोकांस बुद्धिमांद्यामुळें व विषयाधीनतेमुळें सदाचरणाचें महत्त्व समजत नाहीं. तें समजावें म्हणून शंकराचार्य, नानक, कबीर, चैतन्य प्रभु, ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास, दयानंद, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद वगैरेंनीं सतत प्रचारकार्य केलें. तें आवडीनें आणि कर्तव्य-बुद्धीनें केलें. प्रचारकी कार्य म्हणून जे कोणी त्याला कमी लेखतात ते आपल्या मनाचा कोतेपणा मात्र व्यक्त करतात.

सच्छील आणि पवित्र अंतःकरणाचा साधुपुरुष हा मानवदेहांत वास करणारा ईश्वरी अंश आहे असें एका तत्त्ववेत्त्यानें म्हटलें आहे. अशा साधुपुरुषांवर लोकांची श्रद्धा असते. एकंदर सृष्टिक्रमांत सत्त्वगुणास विशेष प्राधान्य आहे. पृथ्वीच्या पाठीवर सत्यास एक क्षणहि न विसंबणारे महात्मे आहेत म्हणून जग चाललें आहे असें वृद्ध माणसांच्या तोंडून आपण ऐकतों. अशाच अर्थाचे उद्गार अमेरिकेंत होऊन गेलेल्या इमर्सन नांवाच्या सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्यानें नमूद करून ठेवले आहेत. असे महात्मे प्रत्येक समाजांत वेळोवेळीं अवतीर्ण होतात म्हणूनच त्या समाजाला स्थैर्य प्राप्त होतें व तो प्रगतिपथावर राहतो. अशांच्या सहवासाचा ज्यांना प्रत्यक्ष लाभ होतो ते खरोखर भाग्यशाली होत. असा लाभ सर्वांनाच मिळणें शक्य नसतें. त्यांनीं त्यांच्या ग्रंथांतील उपदेशामृताचें ग्रहण करून आत्मोद्धाराचा मार्ग चोखाळावा.

सत्पुरुषांच्या कीर्तीचा परिमळ फार दूरवर पसरण्यास फारसा कालावधि लागत नाहीं. वाऱ्यासरसा जसा सुमनांचा सुगंध पसरत जातो, तसेंच

सत्पुरुषांच्या कीर्तीचें आहे. नाथांच्या चरित्रांत आपल्याला तेंच आढळून आलें. इकडे द्वारकेपासून काशी व काशी ते पैठण आणि पैठण ते तुंगभद्रेपर्यंत नाथांची कीर्ति पसरली होती आणि दूरदूरचे लोक नाथदर्शनास येत. अगदीं अलीकडच्या काळांत श्रीरामकृष्ण परमहंसांचेंहि असेंच झालें. महात्मा गांधींच्या प्रार्थनेलाहि लाखों लोक जमत. हा त्यांच्या सच्चारित्र्याचा प्रभाव असतो. पण या असामान्य विभूतींच्या भोंवतालची मंडळी त्या थोर पुरुषांच्या चारित्र्याकडे भाविक बुद्धीनें पहात असते व त्यांच्या प्रत्येक कृतीला दैवी चमत्काराचें स्वरूप देण्याची त्यांची तयारी असते. त्यामुळें संतमंडळीसारखें आचरण आपल्या हातून घडण्याची गोष्ट सोडून द्या, असे उद्गार त्यांच्या तोंडून निघत असतात. म्हणून संतांचें चरित्र लोपल्यासारखें झालें आहे. संताला देवकोटींत बसविणें आणि त्यानें मिळविलेलें पद इतरांनीं मिळविण्याचा प्रयत्न करणें मानवाला अशक्य अशी समजूत करून घेणें म्हणजेच त्या संताविषयीं पूज्य बुद्धि दाखविण्यासारखें आहे असें संताचे अनुयायी मानीत असतात. असें जरी आहे तरी संतांच्या शिकवणीनें लोकप्रवृत्ति सन्मार्गावर राखिली आहे हें निर्विवाद आहे. महाराष्ट्रांत संतांच्या अनुयायी वारकऱ्यांनीं आपला पंथ टिकविला आहे हें कशाचें द्योतक आहे? फाल्गुन वद्य षष्ठीला—जिला नाथषष्ठी म्हणण्याचा प्रघात पडला आहे—हजारों लोक आनंदानें पैठणास नामघोष दरवर्षी करीत असतात हें कशाचें दर्शक आहे? आमचें संतमंडळ व्यावहारिक दृष्टीनें दरिद्रीनारायण असलें तरी पारमार्थिक संपत्तीनें त्यांनीं भरलेलीं भांडारें कधींहि रितीं व्हावयाचीं नाहींत! सालोसाल लक्षावधी लोक तीं लुटण्यास येतात—परंतु ती जशींच्या तशीं ओतप्रोत भरलेलीं आहेत! जाणतेपणानें त्यांचा उपयोग केला तर समाजोन्नति अधिक द्रुतगतीनें होईल.

कोणत्याहि राष्ट्राचा अगर समाजाचा लौकिक वाढविण्यास त्यांतील थोर पुरुष कारण होतात. आज सर्व जगांत हिंदुस्थानविषयीं आदरबुद्धि

वसत आहे याचें कारण उपनिषद्कर्ते ऋषि, शंकराचार्य, गौतमबुद्ध वगैरे महात्मे होत. देहूसारख्या खेड्याला, आळंदीसारख्या लहानशा गांवाला आणि पैठणसारख्या क्षेत्राला जी तीर्थाची महती प्राप्त झाली आहे, ती कोणामुळें? मराठा या शब्दांत ओजस्विता कोणी ओतली? लक्षावधि जन्मतात आणि मरतात. त्यांपैकीं एखादा दुसराच चमकतो आणि आपल्या आंगच्या तेजाच्या प्रकाशानें मार्गदर्शक होतो. त्याच्या अंगच्या अलौकिक गुणांनींच हें घडतें. सूर्योदय झाल्याबरोबर सूर्यकिरण प्रथम उंच उंच पर्वतराजींच्या शिखरांवर पडतात व पुढें सावकाश त्यांचा शिरकाव दऱ्याखोऱ्यांतून होतो. तद्वत् ज्ञानी पुरुष समाजांतील उंच अधिष्ठानें होत. त्यांना ज्ञानप्राप्ति अगोदर होते. ते ज्ञानप्रकाशांत आयुष्य कंठतात. अज्ञजनांना प्रकाशाचा फायदा करून घेतां येत नाहीं व त्याचें महत्त्वहि त्यांना कळत नाहीं. तें समजावून देण्याचें काम नाथांसारखे समदृष्टीचे थोर संत आपल्या वाणीनें आणि कृतीनें करतात.

मानवप्राणी जन्माला आल्यावर त्याचें बालपण मर्यादित क्षेत्रांत जातें. जसजसें वयोमान वाढत जातें तसतशी त्याच्या कार्यक्षेत्राची व्याप्ति वाढत जाते. कर्तव्याची जाणीव उत्पन्न होते. ज्ञानसंपादनानें आणि अनुभवानें ती बळावत जाते. संसारांत एकमेकांना एकमेकाची गरज लागते. केवळ स्वतःभोंवतीं पाहून चालावयाचें नाहीं हें समजूं लागतें. स्वार्थी अथवा कृपण माणसालादेखील, इच्छेविरुद्ध कां होईना, थोडाफार स्वार्थत्याग करावा लागतो. त्यागाचे दोन प्रकार आहेत. स्वार्थबुद्धीनें केलेला आणि निःस्वार्थ बुद्धीनें केलेला. पहिल्याला महत्त्व नाहीं. दुसरा मोलाचा. साखरेच्या अंगीं गोडी आणि मिठाच्या अंगीं खारटपणा हे जसे स्वाभाविक धर्म तसें स्वहितासाठीं परहित ही लोकप्रवृत्ति पण स्वाभाविक. परंतु थोर मनाचे लोक स्वहिताचि भावना न बाळगतां परहित साधण्याकरितां झटत असतात. स्थितप्रज्ञ संतांचा उद्योग लोकांनीं एकमेकांच्या उपयोगी पडावें, समदृष्टि व्हावें व त्यांच्यांत ऐक्यवृद्धि व्हावी याकरितां असतो. ' आपपरभाव जया नाहीं । चैतन्या जैसें '

या तत्त्वानुरूप त्यांची वागणूक असते. या देशांतील तत्त्वज्ञान्यांची 'एका' वर दृष्टि विशेष. सर्वांचें मूळ एक व लयहि एक असा घोष. त्याचा उत्कृष्ट उत्कर्ष निर्व्याज भक्तींत दिसून येतो. या भक्तीचें उत्तमत्व वेदांत, भगवद्गीता आणि भागवत यांत आणि संतांनीं निर्माण केलेल्या वाङ्मयांत संपूर्णतया भरलेलें आहे. सर्वत्र समबुद्धि ठेवा असा घोष दुमदुमत आहे. शत्रु असो, मित्र असो, श्वान असो वा ब्राह्मण असो, वा कोणी असो, सर्वांच्या ठायीं ईश्वराचें वास्तव्य आहे असें भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें. तेंच संतांनीं जनतेला सांगितलें. 'ऐसें भाग्य कईं लाहातों होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप' ही तुकोबांची सुप्रसिद्ध उक्ति आहे. नाथांच्या चरित्राची सर्व उभारणी याच उदात्त ध्येयावर झाली होती. अनेकांनीं अनेक वेळां छळ केला तरी मनाचा शांतीचा भंग होऊं न देतां त्यांनीं आपली समाजसेवेची ध्येयदृष्टि विचलित होऊं दिली नाहीं आणि प्राणिमात्रावरचें प्रेम कायम ठेवलें. अत्यंजाचें मूल तापलेल्या वाळूंत तळमळतांना पाहून ज्यानें त्याला कुरवाळलें, अस्पृश्य मानलेल्या महाराची निष्ठा पाहून त्याचे मनोरथ पूर्ण केले, अतिशूद्रांची इच्छा तृप्त केली, छळणाऱ्या ब्राह्मणांस शांतीचा पाठ दिला, जनांस भक्तिमार्ग दाखविला, त्या एकनाथांचें पद फार श्रेष्ठ होतें यांत शंका नाहीं. या सर्व गोष्टी मनावर उत्तम बिंबवणारा एकनाथी भागवत हा उत्तम ग्रंथ आहे. त्यांत प्रतिपादन केलेल्या भक्तिप्रधान भागवतधर्माचें यथार्थ स्वरूप थोडक्यांत महाराष्ट्राचे आधुनिक नेते न्या. रानडे यांनीं आपल्या भागवतधर्मावरील व्याख्यानांत सुंदर रीतीनं सांगितलें आहे. वाचकांनीं अवश्य पहावें.

सत्संगतीचा महिमा संतांनीं फार वर्णिला आहे. 'संतसंग देईं सदा' असें तुकोबाराय म्हणतात; आणि 'संतसंगें अंतरंगें नाम बोलावें' असें नाथ सांगतात व संतांची थोरवी एवढी आहे कीं तिला कसलीच उपमा देतां येत नाहीं, असें ज्ञानदेव म्हणतात. सत्यव्रत आचरण्यास, स्वधर्म पाळण्यास

आणि परोपकार करून जनसेवा करण्यास संत शिकवितात. अशा रीतीनें वागल्यास तुमचा संसार सुखाचा होईल अशी नाथांसारख्या सत्पुरुषांची शिकवण आहे. आपल्यापेक्षां जे श्रेष्ठ असतील त्यांच्याकडे जाऊन त्यांना सन्मानानें वागवा व त्यांचा विचार घ्या. जे विचारवंत दयाळू आणि धर्मकाम असतात त्यांना श्रेष्ठत्वाची पदवी प्राप्त होते. अशा पदवी-धरांमध्यें पहिल्या वर्गांत पहिले आलेले नाथांच्या काळीं नाथ हे पदवीधर होते, असें आधुनिक भाषेंत म्हणतां येईल.

एका उपनिषदाच्या प्रारंभीं परमेश्वर पूर्ण आहे, परमेश्वरापासून झालेलें हें जग पूर्ण आहे, कारण पूर्णापासून झालेलें पूर्ण असलेंच पाहिजे व पूर्णांमधून पूर्ण वजा केलें असतां शेषहि पूर्णच असें म्हटलें आहे. परमेश्वर पूर्ण सुखमय आणि आनंदमय आहे असें असतां जगांत अपूर्णता कां दिसावी? दुःख, पाप, दुष्ट कृत्यें कां आढळावीं? जगांत जें अपूर्णत्व दिसतें तें कायमचें आहे काय? जगाचा प्रवाह चालला आहे. नदीला जसे दोन्ही बाजूंना तीर असतात तशा जगप्रवाहाला मर्यादा आहेत. त्या पूर्णत्वाकडे धांवण्याची गति देतात. जगांत दुःख, पाप संकटें आहेत. परंतु त्याबरोबरच सौंदर्य, आनंद, साधुत्व, प्रेम, हींहि आहेत. जें कांहीं पूर्ण दिसतें तें पूर्ण पुरुषाचें स्वरूप प्रगट करीत आहे.

दुःखें आणि संकटें चिरकाल टिकणारीं नसतात. तीं सहन करून प्रपंच करून परमार्थ साधावा असा उपनिषदकारांचा उपदेश आहे. जगत् म्हणजे गमनशील अशा त्या जगांत वास्तव्य करणाऱ्या मनुष्यास प्रागतिक करण्याचा उपनिषदांचा उद्देश असल्यानें जगाचा त्याग करून ईश्वराराधना करावी असें उपनिषदें सांगत नाहींत. ईश्वरानें सगुणरूप धारण करून आम्हां मानवांसाठीं त्याग केला आहे व करीत आहे. याकरितां जगाचा त्याग न करितां ईश्वरानें लावून दिलेल्या नियमानें जगाचा पूर्ण आस्वाद घेऊन जीवित सुखमय करावें असाच ईश्वरी संकेत आहे.

' सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा ' असें भगवद्वचन आहे. तो यज्ञ सतत चालू आहे. ईश्वर स्वतः यज्ञयाग करीत आहे. त्याप्रमाणें मनुष्यानें हा यज्ञ चालविला पाहिजे. यज्ञ म्हणजे त्याग. स्वतःचा यज्ञ केला पाहिजे. जग माझें एकट्याचें नसून सर्वांचें असल्यामुळें इतरांच्या सुखाच्या आड मी येणार नाहीं, शक्य तोंवर त्यांच्याकरितां त्याग करीन, त्यांना सुखी करीन, अशी वृत्ति ठेवली पाहिजे. प्रपंचांत हें धोरण कायम राहाण्यास दृष्टीची व्यापकता वाढत गेली पाहिजे. हा व्यापकपणा बाणल्यावांचून

**यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः ।**
**तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ॥**

अशी स्थिति प्राप्त व्हावयाची नाहीं. अशी निरामय स्थिति नाथांची होती. त्यांची दृष्टि व्यापक झाल्यामुळें त्यांना सर्वत्र एक दिसत होतें— एका परमेश्वराचें रूप दिसत होतें. ऐक्यांत म्हणजेच अभेदभावांत त्यांनीं जीवन सच्चिदानंदमय करून सोडलें. विश्वव्यापक दृष्टीमुळें नाथांच्या अंतःकरणांत समबुद्धि जागृत राहिली. सर्वांना समान देखलें. उच्चनीच-पणाची भावना त्यांना शिवली नाहीं. हल्लीं निर्माण झालेला समतावाद, अस्पृश्योद्धार, समाजसत्तावाद वगैरे समाजाला प्रगतिपथावर जोरानें नेणाऱ्या प्रवाहांचा नाथांना गंधहि नव्हता, राजकारण तर त्यांस मुळींच अवगत नव्हतें असें पुरोगामी लेखक आणि वक्ते यांचें म्हणणें आहे. पण आक्षेपक हें विसरतात कीं, त्या काळांत आणि या काळांत किती अंतर आहे, परिस्थिति किती बदलली आहे, जग प्रगमनशील आहे, कल्पनांचा विकास होणें अगदीं साहजिक आहे. पण हें लक्षांत वागवाव-यास पाहिजे कीं, हल्लींच्या समाजाच्या उन्नतीच्या सर्व चळवळींचीं बीजें प्राचीनांच्या वचनांत आणि शिकवणुकींत आहेत. मुसलमान राज्यकर्त्यांच्या जुलुमांचा निषेध करून हिंदु आणि मुसलमान यांत प्रेमभाव सतत वसावा म्हणून परिणामकारक उपदेश त्यांनीं केला हें विसरतां कामा नये.

'क्रियायां वाचि च महतामेकरूपता' 'बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें' या पंक्तींतील साधूंचीं नांवें अजरामर होतात. त्यांचे जडदेह नष्ट झाले असले तरी त्यांनीं आपले आत्मे आपल्या ग्रंथांत ओतले असल्यामुळें आपणांस म्हणजे त्यांच्या ग्रंथांचा परिचय करून घेणारांस त्यांचा स्फूर्तिदायक समागम घडत असतो. ज्या कांहीं चांगल्या संस्था अस्तित्वांत आल्या आहेत त्या थोर पुरुषांच्या छाया होत असें इमर्सननें म्हटलें आहे. संस्था म्हणजे पुढील पिढ्यांनीं वळविण्याकरितां घालून दिलेले घडेच होत. ते वळविणें आपलें कर्तव्य आहे. त्यांत हेळसांड झाली तर 'अभाग्याच्या घरीं बाबा कामधेनु आली। अभागी पाहुनी पळे दुरी॥' अशी गत व्हावयाची!

नाथांच्या चरित्रावरून एक गोष्ट प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस येते कीं, नाथांचा विशेष भर भागवतधर्माच्या प्रसारावर होता. नाथांचा भागवतधर्म या विषयावर या ग्रंथांत स्वतंत्र विवरण आहे तेव्हां येथें अधिक विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं. त्यांनीं एकनाथी भागवतांत भागवतधर्म तर सांगितलाच पण स्वतःच्या चरित्रांतहि तो दाखविला. चरित्रांत दाखविणें हें विशेष भाग्य नाथांचें होतें. सांगणें सोपें असतें पण आचरणें कठीण. परंतु नाथांनीं गृहस्थाश्रमांत राहून यथासांग संसार करून भागवतधर्म आचरून दाखविला. हरिभक्ति करावी. योगसाधनाची आवश्यकता नाहीं. हरिभक्तीनें विषयासक्ति कमी होते. इंद्रियांना भगवंताच्या सेवेस लावावें. विषय भगवंताला अर्पण करून भक्त नित्यमुक्त होतात. दारा, सुत, गृह, प्राण भगवंताला अर्पण करणें हाच पूर्ण भागवतधर्म. त्याला मुख्यत्वें भजन हें नांव. 'बुडताति जन। पाहवेना डोळां' असें वाटणाऱ्या संतांना जनहिताची अतिशय कळकळ. ज्ञानदेव म्हणतात,

**वेद अत्यंत कृपणु जाला। त्रिवर्णांचे कानिं लागला।**
**स्त्रीशूद्रादिकांशीं अबोला। धरुनि ठेला अद्यापि॥**

इतरांची वाट काय? ती वाट ज्ञानदेव–एकनाथांनीं मोकळी करून दिली आहे. नाथ म्हणतात :

**स्त्रीशूद्रादि आघवे । घालूनियां ये नावे (भागवतधर्मरूपी) ।**
**एकच खेपे स्वयें न्यावें । भजनभावें परतीरा ॥**

अनन्यभावानें ईश्वराला शरण जाणें हा सर्वांस सुलभ असा भागवतधर्म आहे. सुखस्पृहतेचा त्याग करून सर्व कर्मे परमेश्वराला अर्पण करणें आणि प्रपंचाचा गाडा चालविणें असा भागवतधर्माचा सदुपदेश आहे. तो खरोखर अमोलिक प्रसाद आहे. त्याची गोडी नाथांनीं आपल्या चरित्रानें लोकांच्या प्रत्ययास आणून दिली.

नाथांचा दुसरा एक विशेष गुण म्हणजे प्राणिमात्राविषयीं निस्सीम प्रेम व सर्वत्र समबुद्धि.

**वैष्णवसेवा अत्यंत कठीण । तेथें जातीचें नाहीं गा प्रमाण ।**
**न म्हणावा शूद्र ब्राह्मण । भक्तिप्राधान्य भावार्थें ॥**
**जाति उत्तम भक्तिहीन । तो वैष्णव नव्हे जाण ।**
**अथवा करी दांभिक भजन । वैष्णवपण त्या नाहीं ॥**
**जाणीव, शहाणीव ज्ञातेपण । सांडुनी जातीचा अभिमान ।**
**जो मज होय अनन्यशरण । वैष्णव जाण तो माझा ॥**

यांत वर्णन केलेले श्रेष्ठ प्रतीचे वैष्णव स्वतः नाथ होते.

जन्मास येऊन जन्मास येण्याचें ध्येय साधलें तरच जन्मास आल्याचें सार्थक. प्रत्येकानें ध्येयावर दृष्टि ठेवावी. तें गांठण्याचा प्रयत्न करणें हाच पुरुषार्थ. प्रपंच साधून परमार्थ संपादन करणें हेंच तें उच्च ध्येय. सर्वसामान्य जनांना तेंच साध्य होण्यासारखें. म्हणून त्यावरून दृष्टि ढळूं देऊं नये असा नाथांचा विशेष कटाक्ष. नाथांचे त्याविषयीं स्पष्टोद्गार आहेत :

**पावोनियां मनुष्यपण । जो न साधी ब्रह्मज्ञान ।**
**तो दाढीचा घोडा जाण । विषयाचरणा विचरत ॥**

मनुष्यदेहाचेनि ज्ञानें । सच्चिदानंद पदवी घेणें ।
एवढा अधिकार नारायणें । कृपावलोकनें दिधला ॥
मनुष्यदेहीं ब्रह्मज्ञान । पुढील जन्मीं मी करीन ।
म्हणे तो नागवला जाण । सोलीव अज्ञान त्यापासीं ॥
छेदूनियां आळसासी । दवडूनियां निद्रेसीं ।
आत्मचिंतन अहर्निशीं । अविश्रमेंसी साधावें ॥
काळाचा चपेटा घात । जंव वाजला नाहीं येथ ।
तंव साधावया परमार्थ । आयुष्य व्यर्थ न करावें ॥
नरदेह परमपावन । पावोनी न साधे ब्रह्मज्ञान ।
तो लांडा गर्दभ जाण । पुच्छेवीण दुपाई ॥

दंभस्फोट करण्यांत आणि स्पष्टवक्तेपणानें सत्यकथन करण्यांत सडेतोड भाषा वापरतांना नाथ कोणाचीहि भीड बाळगीत नसत.

अध्यात्मज्ञान संस्कृतांत सांठवलेलें. सामान्य जन त्याला पारखे. नाथपंथानें लोकभाषेंत तें आणण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वरांनीं तें निश्चयपूर्वक केलें. 'माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परि अमृतातें पैजा जिंके' अशी प्रतिज्ञा करून ती सिद्धीस नेली आणि 'मऱ्हाटिचिये नगरीं' ब्रह्मविद्येचा सुकाळ केला आणि ज्ञानेश्वरी गीता आबाळ सुबोध केली. ज्ञानेश्वरांचें अनुकरण करून नाथांनीं भागवतांतील अध्यात्मज्ञानाचा एकादशस्कंध मराठी केला. त्यामुळेंच स्वधर्म व संस्कृति यवनांचे जोराचे हल्ले आले असतांहि टिकून राहिली.

मराठ्यांच्या सत्तेचा उदय या रानड्यांच्या बहुमोल पुस्तकांत महाराष्ट्रांतील संतांची कामगिरी हें फार महत्त्वाचें प्रकरण आहे. शक्य असेल त्यांनीं वाचावें. परमेश्वराच्याच वाणीचा अनुवाद करून आमच्या संतांनीं शिकविलें कीं, ईश्वराच्या घरीं जातिभेद नाहीं, श्रेष्ठकनिष्ठ नाहीं, स्पृश्य, अस्पृश्य असा भेद नाहीं, सर्व सारखे. ज्ञानदेव–एकनाथ यांनीं समतेवर भर दिला, मोक्षसाधनाला भक्तिमार्ग सर्वांना खुला आहे असें

परिणामकारक रीतीनें प्रतिपादन केलें आणि बहुजनसमाजांत समता उत्पन्न केली. परमेश्वरभक्ति करावी आणि नामस्मरणाचा आश्रय करावा या सार्वत्रिक प्रचारानें यवनांच्या आक्रमणास बंधन पाडलें. बहुतेक धर्मभ्रष्ट झाले होते. स्वधर्मत्याग मात्र त्यांनीं केला नव्हता, तो केवळ ज्ञानेश्वर–एकनाथ यांच्या धर्मप्रचारामुळें. त्यांनींच महाराष्ट्राला महाराष्ट्रधर्म दिला व भारतसंस्कृतीचें रक्षण केलें.

'श्रीज्ञानेश्वरांनंतर मोठे प्रभावी संत श्रीएकनाथ होत. त्यांच्या कथन केलेल्या चरित्रावरून ते लोकोत्तर असल्याची खात्री पटते.त्यांची गुरुनिष्ठा, ज्ञानलालसा, सहनशीलता, समदृष्टि, सूक्ष्म निरीक्षण आणि विस्तृत ग्रंथरचना या सर्व लोकोत्तरच होत. राजवाडे म्हणतात, या साधुसंतांनीं महाराष्ट्रांतील दुर्दैवी प्रजा दोन अडीचशें वर्षें आर्य समाजांत मोठ्या शिताफीनें थोपवून धरिली. तेव्हां आपल्या या देशावर त्यांचे उपकार बिनतोड झाले यांत काडीचाहि संशय नाहीं.

नाथांची आठवण कायम ठेवण्यासाठीं त्यांची पुण्यतिथी पाळण्यांत येते. त्यांच्या उदात्त चरित्राचें मनन व्हावें व आपल्या हातून कांहींतरी घडावें हा त्याचा हेतु आहे. नाथांसारखे भाग्यवान् पुरुष आपल्या देशांत झाले. त्यांचे विचार आमच्यांत कां असूं नयेत ? ' एकनाथ खरे महाराष्ट्राचे नाथ होते. गीतारहस्य सुलभ करण्याकरितां ज्ञानेश्वरांनीं अवतार घेतला, सामर्थ्य दाखविण्याकरितां रामदास जन्मले व तुम्हां-आम्हांकरितां एकनाथांचा जन्म होय. त्यांनीं भक्त कसा असावा व देव कोणाला म्हणावें, या गोष्टी भागवतांत सांगितल्या आहेत. त्यांत माझे विचार सांपडले म्हणून मी त्याची विशेष महती गातों, असें कोणी समजूं नये. भागवत वाचलें असतां मनाला शांति वाटून कृतार्थता वाटेल. बायकामुलांनीं जर विचारलें कीं आमचें कल्याण कशानें होईल, तर त्यांना सांगावें कीं, भागवतधर्म पाहिल्यानें. सारांश, हरिभक्ति करावी, साधुसमागम ठेवावा व ईश्वरावर निर्मळ प्रेम ठेवावें. असो. शेवटीं भागवतधर्म

कसा आहे हें समजून घेण्याकडे आपली प्रवृत्ति व्हावी असें मी इच्छितों, हे न्या. रानड्यांचे उद्गार सर्वांनीं ध्यानीं बाळगावे अशी प्रार्थना करून हा लेख नाथचरणीं अर्पण करतों.

# नाथकालीन लोकस्थिति

ज्ञानेश्वरांनंतर नाथकाळापर्यंत मुसलमानी अमलाचा दक्षिणेंत चांगलाच पगडा बसला होता. मुसलमान राजे धर्मवेडानें पछाडलेले असत. धर्मप्रसारासाठीं क्रूर कर्में करावयासहि ते मागेंपुढें पहात नसत. भोळ्याभाबड्या, पोटार्थी, अज्ञ आणि अडाणी हिंदूंना मुसलमानी धर्माच्या जाळ्यांत अडकाविण्यासाठीं फकीर, दावलमलिक वगैरे अनेक प्रकार सुरू झाले. सार्वत्रिक धर्मप्रचाराचा अभाव हिंदुधर्मानुयायांत असल्यामुळें आणि त्याचा उलट प्रखरतेनें आणि जबरदस्तीनें परधर्मानुयायी मुस्लिम धर्मांत ओढण्याचा धडाका सुरू असल्यामुळें धर्मक्षेत्रांत हिंदूंच्या बाबतींत बेबंदशाही सुरू झाली होती. धर्माविषयीं अनास्था, कर्तव्याचा विसर, ज्ञानसंपादनाची नावड, इत्यादि समाजस्थैर्यास विघातक गोष्टींमुळें हिंदुसमाजाची स्थिति सर्व तऱ्हेनें हीन, दीन झाली होती. कांहीं थोड्या समंजस आणि विचारी माणसांना ही शोचनीय अवस्था पाहून तळमळ वाटे. परंतु परकीयांच्या जुलमी अंमलानें निर्माण झालेल्या असहायतेमुळें समाजाची घडी पूर्वापार संस्कृतीस धरून बसविण्याचें कार्य त्यांच्या हातून होईनासें झालें. दोन्ही धर्मांचे एकमेकांवर काय परिणाम घडले व त्या योगें दोन्ही धर्मांच्या समाजरचनेला कोणत्या प्रकारचें इष्ट वा अनिष्ट वळण लागलें हें पाहणें मनोरंजक आणि बोधप्रद होणार आहे. पण तो स्वतंत्र विषय आहे. ऐतिहासिक माहितीच्या आधारानें त्याचा ऊहापोह कोणातरी जिज्ञासू संशोधकानें करणें अवश्य आहे. एवढी गोष्ट खरी कीं, धार्मिक दृष्टीनें झालेली आणि होणारी समाजाची अवनति पाहून नाथांचें अंतःकरण तळमळत होतें. हें त्यांच्या अभंगांतील अनेक कळकळीच्या उद्गारांवरून

प्रत्ययास येतें. अनेक दैवतांबरोबर मुसलमानी पीर अस्तित्वांत आले. शहरांतील लोकांना ऐकून देखील माहीत नाहींत अशा अनेक देवतांचें भक्त खेडेगांवांतून होते. ज्यानें उठावें त्यानें मन मानेल तें दैवत कल्पावें आणि भोळ्याभाबड्यांचा कळप जमवावा व त्यास अघोरी मार्गांनीं त्या त्या दैवतांची पूजा करण्यास लावावें, असा क्रम सर्रास सुरू होता. त्या काळीं संन्यासी तर होतेच. हल्लींसुद्धां असून त्यांत अनेक प्रकार आहेत. त्याशिवाय जोगी, जंगम, मानभाव, संत, कुडमुडे जोशी वगैरे मोक्षाचें द्वार खुलें करून स्वर्ग प्राप्त करून घेण्याचा सोपा मार्ग दाखविणारे होते. वेताळ, फेताळ, फेसको, मारको, मैराळ, मेसाई, जानाई, सटवाई, म्हसोबा, बहिरोबा वगैरेंचा उल्लेख स्वतः नाथांनीं केला आहे. हे सर्व प्रकार खऱ्या धर्माविरुद्ध रूढ झाले होते. वर निर्दिष्ट केलेल्या क्षुद्र देवतांना प्रसन्न करण्याकरितां कोंबड्याबकऱ्यांची हत्या मोठ्या प्रमाणावर होत होती. कोणत्याहि एका देवावर श्रद्धा नाहीं. सैरावैरा धांवणाऱ्यांप्रमाणें वाटेल त्या देवतेची पूजा करणारांचें ज्ञानेश्वरांनीं वर्णन केलें आहे. तसेंच नाथांनींहि पण केलें आहे. 'मेंढरें बोकड मारिती । परतोनी आपणाचि खाती ॥ नैवेद्या नारळ नेऊन फोडिती । खोबरें एकमेकांसी वांटिती । नुसती नरोटी देवापुढें ठेविती । लटिके धूप दाउनी चाळविती ॥ जाउनि देवऋषि आणिती घरा । त्याकडून लाविती अंगारा' वगैरे. 'नरदेहा येउनि नरा । करिताती आयुष्याचा मातेरा ॥' असे कळकळीचे उद्गार लोकांचें भ्रष्ट आचरण पाहून नाथांनीं काढिले आहेत. सर्व वर्णांमध्यें श्रेष्ठ म्हणविणाऱ्या ब्राह्मणांचीहि स्थिति नाथांनीं वर्णिली आहे.

'हे ब्राह्मणादि वर्ण पाहा हो । ज्यापासोनि जन्म प्रभवो । तो न भजतां देवाधिदेवो । उत्तम देहो अधःपातीं ॥ 'शब्द ज्ञानी अतिचतुर' जे पंडित । ज्ञानाभिमानें अति उन्मत्त 'यापरी ज्ञानाभिमानी विन्मुख झाले हरिभजनीं । ते जरी वर्णांमाजी अग्रगणी । तरी अधःपतनीं

पडतील ॥ हो कां वर्णांमाजी अग्रगणी । जो विन्मुख हरिचरणीं । त्याहुनी श्वपच श्रेष्ठ मानी । जो भगवद्भजनीं प्रेमळ ॥ भा. ५-५२-६०.

अशाच अर्थाचे समाजस्थितीचे दर्शक विचार नाथांनीं ठिकठिकाणीं आपल्या ग्रंथांत प्रगट केले आहेत. ज्या साधनांनीं परमार्थ साधावयाचा त्यांचा अव्हेर करून ब्राह्मण भलत्याच खटाटोपांत पडतात :

**येथ भोग भोगावे चोखडे । आणि पुढें स्वर्गभोग जडे ।**
**येणें वचनें बापुडे । यागाकडे धांवती ॥**
**कर्ता सर्वस्वें नागवो । परि आचार्यत्व आम्हां येवो ।**
**ऐशियाची बुद्धि पाहा हो । यागप्ररोहो आरंभिला ॥**
**तैसें केवळ पतनात्मक । त्या नांव म्हणती स्वर्गसुख ।**
**जाणोनी प्रवर्तती मूर्ख । फळ कामुक अभिळासी ॥** भा. अ. ५

याच अध्यायांत ज्ञानाभिमानी आणि कर्मठ संसारनिमग्न होऊन कसें आचारण करीत आहेत याविषयींचें व्याख्यान वाचनीय आहे. तसेंच याज्ञिक, स्त्रीकामुक, सौंदर्याभिमानी, साधुनिंदापरायण यांचाहि चांगला समाचार घेतला आहे. लोकांची, अभक्ष्यभक्षण, मद्यपान आणि विषयसेवन यांजवर आसक्ति दिसून येत होती. ‘ मांससेवन मद्यपाना । मिथुनीभूत मैथुना । ये अर्थीं सर्व जना । तीव्र वासना सर्वदा ॥ ’ असे उद्गार त्यांनीं काढले आहेत. सत्कार्यासाठीं किंवा सत्पात्रीं दान करण्याचा अभाव त्यांना दिसून आला.

**विषयांचिया कामना । सर्वस्वें वेंचिती धना ।**
**तेंचि धर्मार्थ वेचितां जाणा । सांडिती प्राणा कवड्यांसाठीं ॥**
**चंद्रास्तव वाढती कळा । जीवनास्तव जिव्हाळा ।**
**तेविं धनास्तव सोज्वळा । धर्माचा सोहळा धार्मिकां घरीं ॥**
**धर्म तेथें शुद्ध ज्ञान । ज्ञान तेथें विज्ञान ।**
**विज्ञान तेथें समाधान । शांति संपूर्ण नांदे तेथें ॥**

धनाचें वास्तविक एवढें महत्त्व असून त्याचें फळ दवडून काय करितात तर –

**'येवढें फळ ज्या धनापासीं । मूर्ख वेंचिती विषयासी ॥**

ब्राह्मण 'क्रियाकर्म' स्वधर्म सांडून 'दंभार्थ' करीत होते. 'दांभिक वाढवावया स्थिति । वैष्णवदीक्षा अवलंबिती । देव पूजा झळफळित दाविती । शंख लाविती दो हातीं ॥' असें अवडंबर माजवतात पण 'परमार्थाचिया चाडा । कोणी वेचिना कवडा ॥' अशी दुस्थिति होती.

ब्राह्मण स्वतःला सर्व वर्णांमध्यें श्रेष्ठ आणि भूदेव मानतात. त्यांचें आचरण सदैव शुद्ध आणि पवित्र असावयास पाहिजे. परंतु पहावा तो सर्वत्र विपरीत प्रकार. त्यामुळें नाथांच्या पवित्र अंतःकरणाला फार पीडा झाली असेल आणि म्हणूनच ब्राह्मणांच्या डोळ्यांत अंजन घालण्याचा निर्भीडपणें कळकळीनें अट्टाहास केला आहे.

समाजाची आचारविचारांत किती अवनति झाली आहे याचें नाथांनीं सूक्ष्म निरीक्षण केलें आणि समाजाला तरणोपायाचा मार्ग दाखविला. या बाबतींतील त्यांच्या तळमळीचा निदर्शक असा पुढील उतारा आहे.

**पशूसी ऋतुकाळीं मैथुन । मग स्त्रियेशीं नातळे मन ।**
**पुरुषासी नित्य स्त्रीसेवन । गरोदरही जाण न सोडी ॥**
**कामक्रोधसलोभता । चिंता निंदा अतिगर्विता ।**
**हें मनुष्याचेनि माथा । पशूसी सर्वथा असेना ॥**
**न साधितां आत्मज्ञान । केवळ जे विषयी जन ।**
**ते श्वानशुकरापरीस हीन । माणुसपणा त्यां नाहीं ॥**
**मनुष्यदेहप्राप्ति दुर्लभ । ऐसा नरदेह पावोनि देख ।**
**जो न साधीचि ब्रह्मसुख । तो जनामाजीं परम मूर्ख ।**
**विश्वासघातक देवाचा ॥**

परकीयांचा अंमल किती बोचक आणि जाचक होता हें पुढील उद्गारांवरून स्पष्ट होतें.

शूद्राहुनि अति कनिष्ठ । ते राजे होती परमश्रेष्ठ ।
वर्णावर्ण करिती भ्रष्ट । अति पापिष्ट अधर्मी ॥
अपराधेंविण वितंड । भलत्यासी करिती दंड ।
मार्गस्थाचा करितो कोंड । करिती उदंड सर्वापहरण ॥
अबळांचें निजबळ राजा । तो राजाचि स्वयें नागवी प्रजा ।
ऐसा अनर्थ उपेक्षिति भुजा । तें गरुडध्वजा न साहवे ॥
जेव्हां स्वधर्माचें जिणें । अधर्मीं लागे गांजणें ।
यालागीं श्रीनारायणें । अवतार धरणें कल्की नामा ॥
तो शस्त्रधार प्रबळ । नष्ट राजे निर्दाळील सकळ ।
महामोहाचें मूळ । स्वयें समूळ उच्छेदिल ॥
तेव्हां धर्माची पहांट फुटेल । सत्यासी सत्य चौपटें ।
तेव्हां वेदोक्त विधान प्रगटे । स्वधर्मराहाटें राहटती सर्व ॥

पहिल्या तीन ओव्यांत त्यावेळच्या निधर्मी राजांच्या करड्या आणि अधर्मी राज्यकारभाराचें वस्तुस्थितिनिदर्शक असें वर्णन असून हें अधर्माचरण गरुडध्वज भगवान श्रीकृष्णाला सहन होणार नाहीं असें भविष्यकथन केलें आहे. नाथकालीं अनेक बाबतींत समाजस्थिति कशी बहुविध होती, हें त्यांच्या ग्रंथांच्या आधारें देतां येण्यासारखें आहे. पण तो स्वतंत्र विषय आहे.

## नाथांची कांहीं बोधवचनें

देशभाषा— जे पाविजे संस्कृत अर्थें । तेंचि लाभे प्राकृतें ।
तरी न मनावया येथें । विषम चित्तें ते कायी ॥
देशभाषा वैभवें । प्रपंच पदार्थीं पालटलीं नांवें ।
परि रामकृष्णादि नाम नव्हे । भाषावैभवें पालटूं ॥
संस्कृतवाणी देवें केली । प्राकृत काय चोरापासूनि झाली ।
असो या अभिमानभुली । वृथा बोली काय काज ॥
जैं हरिभक्तांची भेटि घडे । त न बाधी संसार सांकडें ॥

सत्संग—सत्संग म्हणो निधिसमान । निधि जोडल्या हरपे जाण ।
सत्संगाचें महिमान । साधक संपूर्ण सद्रूप करी ॥

हरिकीर्तन— मनें करावें हरीचें ध्यान । श्रवण करावें कीर्तिश्रवण ।
जिव्हे करावें नामस्मरण । हरिकीर्तन अहर्निशीं ॥

भागवत—हें भागवत नव्हे नव्हे । भवाब्धि तरावया भजन भावें ।
महानाव देवें निर्माण केली ॥
हेतुक अथवा अहेतुक । वैदिक लौकिक स्वाभाविक ।
भगवंतीं अर्पे सकाळिक । या नांव देव भागवत धर्म ॥

निष्काम कर्म— कर्मकलापु आघवा । आचरोनि आणी गौरवा ।
परि कर्तेपणाचीया भावा । अहंभावा स्पर्शेना ॥
अगाध गुरूचें महिमान । तो भाग्येंवीण भेटेना ॥

भक्ति—भक्ति म्हणिजे सर्वभूतीं । सप्रेम भजनयुक्ती ।

प्राप्ति—प्राप्ती म्हणिजे अपरोक्षस्थिति । भगवत्स्फूर्ति अनिवार ॥

विरक्ति —विरक्ति म्हणिजे अहंभावो । समूळ जेथें होय वावो ॥

अनुभवी—जेणें स्वयें चाखिली नाहीं चवी ।
तो दुजयातें गोडी केविं लावी ।
यालागीं जो पूर्ण अनुभवी । तो तारी सद्भावें सच्छिष्यासी ॥

मैत्री—सर्वभूतांच्या ठायीं । सुहृदानांचोनि दुजें नाहीं ।
तरी न करितांची मैत्री पाही । ठायींचे ठायीं अलौकिक ॥

मन—मन मळीण वासनामळें । तें न करितां सोवळें ।
बाह्य पवित्रता अहंबळें । तें जाण आंधळें न्याहाळी जैसें ॥

अहिंसा—भूतीं देतां दुःखलेशु । भूतीं दुखवेल भूतेशु ।
ऐसा ज्याचा दृढविश्वासु । तेथ रहिवासु अहिंसेचा ॥

सत्य—सत्यापरतें नाहीं तप । सत्यापरता नाहीं जप ।
सत्यें पाविजे सद्रूप । सत्यें निष्पाप साधक होती ॥

आयुष्याचें मोल—आयुष्याची अर्धघडी । वेचितां न मिळे लक्ष कोडी ॥
तेणें आयुष्यें परमार्थ जोडी । विषयाच्या कोडीं थुंकोनी सांडी ॥

भक्ति—भक्तीपाशीं नित्य तृप्ति । भक्तीपाशीं नित्य मुक्ति ।
भक्तीपाशीं भगवत्प्राप्ति । मायानिवृत्ति हरिभजनें ॥

परमशांति—अपकाऱ्या उपकार करिती । त्यासी नांव गा परमशांति ॥

अवतार—शूद्राहुनी अति कनिष्ठ । ते राजे होती परमश्रेष्ठ ।
वर्णावर्ण करिती भ्रष्ट । अति पापिष्ट अधर्मी ॥
अपराधेंवीण वितंड । भलत्यासी करिती दंड ।
मार्गस्थाचा करिती कोंड । करिती उदंड सर्वापहरण ॥
अबळांचें निजबळ राजा । तो राजाचि स्वयें नागवी प्रजा ।
ऐसा अनर्थ उपेक्षिति भुजा । तें गरुडध्वजा न साहवे ॥
जेव्हां स्वधर्माचें जिणें । अधर्मीं लागे गांजणें ।
यालागें श्रीनारायणें । अवतार धरणें कल्कीनामा ॥
तो शस्त्रधार प्रबळ । नष्ट राजे निर्दाळील सकळ ।
महामोहाचें मूळ । स्वयें समूळ उच्छेदिल ॥

तेव्हां धर्माची पहांट फुटे। सत्यासी सत्य चौपेटें।
तेव्हां वेदोक्त विधान प्रगटे। स्वधर्मराहाटें राहटती सर्व।

नाथांच्या त्या वेळच्या राज्यपद्धतींचें यांत चित्र असून भविष्यहि आहे.

संत—संतचरणीं जो विनटला। तो निजप्राप्तीसी पावला॥

अज्ञानी—शेळी उसाची चवी गाढी। नेणोनि पाचोळा करांडी।
तेवीं नेणोनि हरिभक्तीची गोडी।
अज्ञानें बापुडीं विषयलुब्ध॥

श्रेष्ठ कोण—हो कां वर्णामाजी अग्रगणी। जो विन्मुख हरिचरणीं।
त्याहुनी श्वपच श्रेष्ठ मानी। जो भगवद्भजनीं प्रेमळ॥

धर्म—धर्म तेथें शुद्ध ज्ञान। ज्ञान तेथें विज्ञान।
विज्ञान तेथें समाधान। शांति संपूर्ण नांदे तेथें॥

कीर्तन—स्त्रीशूद्र अंत्यजन। उद्धरण हरिनामें।
कीर्तनें स्वधर्म वाढे। कीर्तनें स्वधर्म जोडे।
कीर्तनें परब्रह्म आतुडे। मुक्ती कीर्तनापुढें चालोनि जाय॥

कलिप्रभाव—कली वाढेल अतिविषम। ब्राह्मण सांडितील स्वधर्म।
स्वभावें नावडे दानधर्म। क्रियाकर्म दंभार्थे॥

दांभिक—दांभीक वाढवावया स्थिति। वैष्णवदीक्षा अवलंबिती :
देवपूजा झळफळित दाविती। शंख लाविती दों हातीं॥

सद्बुद्धीचा अभाव—सद्बुद्धि नाहीं ज्यापासीं।
तो संसाराची आंदणी दासी।
उसंत नाहीं अहर्निशीं। दुःख भोगासीं अनंत॥

अधर्म—स्त्रैण पुरुष ते नराधम। वेश्यागामी त्याहूनी अधम।
त्यांत कृपण तो अधमोधम॥

मनुष्य देह—मनुष्यदेहींचे नि ज्ञानें। सच्चिदानंद पदवी घेणें।
एवढा अधिकार नारायणें। कृपावलोकनें दिधला॥

झालिया मनुष्यदेह प्राप्ति । परमार्थ साधूं भोगाअंतीं ।
येवढी येथें नाहीं निश्चिती । मृत्युप्राप्ति अनिवार ॥

आत्मचिंतन— छेदूनियां आळसासी । दवडुनियां निद्रेसी ।
आत्मचिंतन अहर्निशीं । अविश्रमेसी साधावें ॥

नरदेह—ऐसा नरदेह पावोनि देख । जो न साधीची ब्रह्मसुख ।
तो जनांमाजी परममूर्ख । विश्वासघातक देवाचा ॥

निंदा— जेणें निजनिंदा केली । तो मानी हित माउली ।
पापमळाची क्षाळणता झाली । शुद्ध केली माझी वृत्ति ॥

काळ— काळ न म्हणे हाटघांट । न म्हणे आवशी पहांट ।
न म्हणे देश विदेश वाट । नाशी उद्धट निजतेजें ॥

पोकळ ज्ञान—दृढ धनमान करोनि पोटीं । सांगतां ब्रह्मज्ञान गोठी ।
त्यास आत्मसाक्षात्कार भेटी । नव्हे कल्पकोटी गेलिया ॥

नाम— वेदशास्त्रासि अधिकारी ब्राह्मण ।
नामासी अधिकारी चारी वर्ण ।
जग उद्धरावया कारण । नाम जाण पैं माझें ॥

प्रेम— प्रेमाची जाति ऐशी । आठव येऊं नेदी आठवणेशीं ।

समदर्शी जेणें आपणया होय दुःख । तें परासी न करी निःशेख ।
जेणें आपणासि होय सुख । तें करी अवश्यक प्राणिमात्रां ॥

संत— ऐसे सत्यास आधारभूत । ज्यांचे पाखोवा सत्य जीत ।
ज्याचेनि बळें सत्य समर्थ । ते शुद्ध संत जाणावे ॥

पापिष्ठ— एक अरतीरीं असती नष्ट । तरलों म्हणती अकर्मनिष्ट ।
स्वकर्म त्यागी कर्मभ्रष्ट । जाण पापिष्ठ पाषांडी ॥

सत्संगति—सत्संगति वेगळें जाण । तत्काळ पावावया माझें स्थान ।
आणिक नाहींच साधन । सत्य जाण उद्धवा ।

सद्गुरु—जो स्वरूपीं करी समाधान। तोचि सद्गुरु सत्य जाण।
त्यावेगळें सद्गुरुपण। व्हावया कारण असेना॥

हरिभक्ति—सर्वसुखाचा आराम। निजहृदयीं आत्माराम।
सर्वदा असे सम। भजावें सप्रेम ते ठायीं॥
स्वाध्याय जें वेदाध्ययन। तप जें वातांबु पर्णाशन।
त्याग जो संन्यास ग्रहण। माझे भक्तीवीण बापुडी॥
जैशी नाकेंवीण वस्त्र। कां शिरेंवीण अवयव।
भर्तारेंवीण अहेव। जाण पां तो सर्व विटंबु॥
सकळ योगाचें योग गव्हार। वेदांत निजभांडार।
सकळ सिद्धीचें परमसार। भक्ति साचार हरीची॥

संन्यासदीक्षा व्यर्थ—जैं नुपजे अनुताप जाण। न करी मनन श्रवण।
आदरें न साधीच साधन। ज्यासी ब्रह्मज्ञान नव्हेचि॥
त्याचा व्यर्थ संन्यास जाण। व्यर्थ त्याचें दण्डन मुण्डन।
व्यर्थ काषायवस्त्र ग्रहण। वेषधारण नटाचें॥

गृहस्थाश्रम—असिलेनि सामर्थ्यें जाण। अन्नधान्य वस्त्र जीवन।
तृणपर्ण निवासस्थान। देउनि दीन रक्षावे॥

ज्ञानाचें श्रेष्ठत्व—एवं तपादिक जें साधन।
या सकळांची शुद्धि गहन।
तें ज्ञान लेशासमान। पवित्रपणें तुळेना॥
ज्ञानेंवीण वैराग्य आंधळें। तें अरडी दरडी आदळे।
वैराग्येंवीण ज्ञान पांगळें। युक्ति देखे परि न चले पुरुषार्थ।

देवपूजा—सांडूनी अहंकार दुजा। सर्वभूतीं भावो माझा।
हे उत्तमोत्तम माझी पूजा। मज अधोक्षजा पढियंता॥

भक्ति—वैराग्ययुक्त करितां भक्ति। होय देहाभिमानाची निवृत्ति।
तैं घर रिघे ज्ञानसंपत्ति। पायां लागती मुक्ति चारी॥

विवेक वैराग्य—संसार मिथ्या तोंडें म्हणतां।
न सुटे सुखदुःखभय व्यथा।
जन्ममरणादी अवस्था। अहंममता सुटेना॥
विवेकें वैराग्य धरितां पूर्ण। भवबंधन निवारे॥

लोभ—लोभाची वस्ती जिये ठायीं। तेथ स्वप्नींही सुख नाहीं।
मित्र मित्रासीं वेंचिती प्राण। तेथें प्रवेशोनियां धन।
विकल्या आणी मित्रपण। भेद दारुण धनापाशीं॥
अर्थापाशीं पंधरा अनर्थ।

निजविवेक—दुस्तर तरावया भवसागरु। हा विवेकू सुकल्प तारूं।
एथ सद्‌गुरु कर्णधारू। परात्पर पारू पाववी॥

गुंती—आपली गुंती आपल्यापाशीं। तेंचि आम्हांसी कळेना॥

नरदेहाचें ध्येय—ज्या नरदेहाकारणें। अमर उत्कंठित मनें।
त्या देहाचें जाहलेपणें। ज्ञान पावणें निश्शंक॥

दुर्जनसंगति—दुर्जनाची संगती। क्षणार्धें पाडी अनर्थीं।
मुमुक्षु ऐसिया प्रती। अनुमात्र वस्ती न वचावें॥

साधु—अग्निपाशीं प्रबळ धूम। साधु निष्क्रोध निर्धूम।
अग्नि पोळी अधमोत्तम। साधु सर्वसम सुखदाते॥

भगवद्भक्ति—सांडूनि लोकरंजन व्यापार। त्यजुनी दांभिक उपचार॥
दवडुनि शठत्वाचा व्यवहार। भजनतत्पर सद्भावें॥

उपासन—मूर्तीमाजीं अतिप्राधान्य। मनोमयी मूर्ति पावन।
जिचें करितां उपासन। समाधान साधकां॥
तेथ मनाचि होय माझी मूर्ति। मनोमय उपचार-संपत्ति।
निर्लोभें जे मज अर्पिती। तेणें मी श्रीपति संतुष्ट॥

श्रद्धा—सकळ पूजेचें कारण। मुख्य श्रद्धाचि गा प्रमाण।
अत्यंत श्रद्धें जो संपन्न। तो देवाचा पूर्ण पढियंता॥

अभिमान — अभिमानाची जाति कैसी। अधिक खवळे सज्ञानापाशीं।
तो दाखवी गुणदोषांसी। निंदास्तवनासी उपजवी ॥
अभिमाना ऐसा वैरी। आन नाहीं संसारी।
तो हा ज्ञानाभिमानें करी। घाली दुस्तरीं सज्ञाना ॥

जनीं जनार्दन — जनीं जनार्दन एक। जाणे तो सुटला निःशेख।
हेंचि नेणोनियां लोक। गुंतले अनेक भवचक्रीं ॥

परमार्थ—जैसा बोले तैसा क्रियार्थ। या नांव मुख्य परमार्थ ॥

जीवन्मुक्ति - देही असोनी विदेहस्थिति। ज्यासी नाहीं विषयासक्ति।
त्यासी बोलिजे जीवन्मुक्ति। जाण निश्चित रघुनाथा ॥

शास्त्रार्थ—शिष्याचे विकल्प समस्त। खंडोनि निर्विकल्प करीत।
तेंचि ज्ञान अखंडित। शुद्ध शास्त्रार्थ या नांव ॥

पुरुषार्थ—मनें मना सावधान। मनें मना निर्दाळण।
मनें मना अनुसंधान। या नांव पूर्ण पुरुषार्थ ॥

मनोनिग्रह—मनें मनातें आवरावें। मनें मनातें निग्रहावें।
मनें मनातें धरावें। मनें मनातें मारावें ॥ या नांव मनोनिग्रह.

नमन माझें गजवदना। सर्वभावें धरी चरणा ॥
अर्पूनियां देवा भावाचे मोदक। भावें विनायकपूजा करूं ॥
सकळारंभीं निजा सहजीं सहजा। एका जनार्दनीं एकत्वें सारजा।
ज्ञानदीपिका उजळली। नाहीं चिंतेची काजळी ॥
जनार्दनकृपेस्तव जाण। समूळ निरसलें भवबंधन ॥
ज्ञानदेवें बोध जणासी पैं केला। एका जनार्दनीं घाला पूर्ण बोधें।
एका जनार्दनीं गुरुपदीं लीन। ब्रह्म परिपूर्ण अनुभविलें।
एका जनार्दनीं गुरुपरब्रह्म। तयाचें पैं नाम सदा मुखीं।
मोकळें तें मन ठेविलें बांधोनी। जनार्दनचरणीं सर्वभावें।
एका जनार्दनीं गुरुकृपें दृष्टि। दिसे सर्व सृष्टि परब्रह्म।
एका जनार्दनीं निर्धार। तेथें प्रगटे विश्वंभर।

आम्हा ध्येय जनार्दन ध्यान जनार्दन। एका जनार्दन ज्ञानरूप।
शिष्यापासून सेवा घेणें। हें तों लक्षण अधमाचें।
गुरुभेटी होतां चित्त स्थिर होय। तळमळ जाय मनाची ते।
शिष्यवत्सालागीं पाजी ज्ञानदुग्ध। तेणें देह शुद्ध होय त्याचा।
एका जनार्दन गुरुपायीं लीन। ब्रह्म परिपूर्ण अनुभविलें।
ज्याचे पोटीं दृढ अभिमान। तो सदा इच्छी सन्मान।
सकल सुखाचें जें सुख। तेंचि सोलीव श्रीमुख।
एका जनार्दनीं जीवींचें जीवन। विठ्ठल निधान विटेवरी।
भोळा देव भोळा देव। उंच नीच नेणे भाव।
भक्ति भावार्थें भुकेला। एका जनार्दनीं विकला।
जें सुख संतसज्जनाचे पायीं। तें सुख नाहीं आणिके ठायीं।
पेठ पिकली संताची। अवघीं स्वरूपें मुदळाचीं।
रामनाम जप सोपा। तेणें नेणो पुण्यपापा।
विठ्ठल म्हणतां विठ्ठलचि होसी। संदेह ये विषयीं धरूं नको।
एका जनार्दनीं सेवेवांचून। आन नेणें जाण दुजें कांहीं।
एका जनार्दनीं गर्भवास सोसूं। संताचा सौरस हातीं लागे।
एका जनार्दनीं असत्याची वाणी। तोचि पापखाणी दुष्टबुद्धि।
जन का निंदीना निंदीना। तसेंच निंदूं द्या ना।
कलिमाजी संत जाले। टिळाटोपी लाविती भले।
नाहीं वर्माचें साधन। न कळे हृदयीं आत्मज्ञान।
मना तूं एक करी। वाचें आठवी श्रीहरी।
संतांच्या विभूति जगासि उपदेश। देताती सौरस सर्वभावें।
नमितां ज्ञानदेवा पावलों विसावा। अंतरीचा हेवा विसरलों।
ज्ञानेश्वरी तीन सप्तकें। जो श्रवण करील विवेकें।
तो होय ज्ञानी अधिकें। येथे संशय नाहीं॥
संत पोटीं देव वसे। देवा पोटीं संत असे।

शुद्धबुद्ध नाम निवृत्तीचें वाचें। एका जनार्दनीं साचे।

ऐसी शांति ज्यासी आहे। त्याचे घरीं देव राहे।

पाहिजे समता सर्वांभूतीं भाव। मुंगी आणि राव सारखेची।

काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ पांडुरंग।

देखिली पंढरी जनींवनीं। एका जनार्दनीं वारी करी।

सुखें संसार हा करी। वाचे उच्चारावा हरी।

जाणत्या नेणत्या हाचि उपदेश। विठ्ठल वाचे जप सुखें करा।

अल्प आयुष्य नरदेहीं जाण। कांहींतरी भजन करी वाचे।

नामपाठकीर्ति सर्वांत वरिष्ठ। नको साधन कष्ट–आणिक कांहीं।

एका जनार्दनीं एकत्वाचा छंद। तेणें परमानंद प्रगटला।

नामपाठें ज्ञान नामपाठें ध्यान। नामपाठें मन स्थिर होय।

चंचळ तें मन मुष्टीमाजी धरी। नामपाठ हरि गाये सदा।

नामपाठ गोविंद हाचि लागो छंद। न करी भेदाभेद हृदयामाजीं

जया परमार्थीं चाड। तेणें सांगावें लिगाड।

एकाजनार्दनीं नको योगयाग। म्हणावा श्रीरंग वाचे सदा।

येवोनि ये जनीं जन्म उत्तम योनी। कां रे भजन नारायणीं चुकलासि।

अभिमान सांडोनी झडकरी। एक जनार्दनीं दास्य करी।

निंदेपरतें नाहीं पाप। सत्य जाणा माझे बाप।

अंतरीं भरला विषय स्वार्थ। माळा मुद्रावरी नव्हे परमार्थ।

त्याचे आम्ही सेवूं चरण। ज्याचेनि बोधें होय समाधान।

अग्निमुखाहुनि द्विजमुख थोर। वेदांचा उच्चार जया मुखें।

विचारुनी घेई विषयाचा ग्रास। विवेकें करी सर्वांठायीं वास।

भगवद्भावो सर्वांभूतीं। हेंचि ज्ञान, हेंचि भक्ति।

विवेक विरक्ति। याचि नांवें ॥

गोड ऊंस झाला तरी काय मुळासकट खावा।

गांवचा प्रभु झाला म्हणून काय गांवाचि बुडवावा।

शीतल चंदन झाला म्हणुन काय उगाळून प्यावा ।
सोन्याची सुरी झाली म्हणुन काय उरींच खोवारी ।
संकल्प नाशी तो संन्याशी । तेथें तों कल्पना कायसी ।
नित्यनैमित्तिक कर्मे आचरावीं । तींही ते पावावी चित्तशुद्धि ।
येउनि नरदेहीं वायां जाय । नेणें संतसंग कांहीं उपाय ।
ज्यांसी नाहीं संतसंग । ते अभंग दुःख भोगिती ।
संतसंगतीनें झालें माझें काज । अंतरीं तें निज प्रगटलें ।
कीर्तनीं आवडी जया नरा देखा । चुकतील खेपा जन्म कोटी ।
कीर्तनश्रेष्ठ कलियुगीं सेवा । तरले पातकी ते देवा ।
योगी शिणती साधनीं । पवन होती ते कीर्तनीं ।
कीर्तनीं स्वधर्म वाढे । कीर्तनीं जोडे चित्तशुद्धि ।
हेंचि कलिमाजीं साधन । आवडी कीर्तन हरीचें ।
म्हणोनि एका काकुलती । कीर्तन करा दिनरातीं ।
संसारा आलिया जा रे पंढरपुरा । पांडुरंग सोयरा पहा आधीं ।
दक्षिणद्वारका पंढरी । शोभतसे भीमातीरीं ।
महाक्षेत्र पंढरपुर । नांदे विठ्ठल साचार ।
उदंड तीर्थे पृथ्वीचिया ठायीं । ऐसा महिमा नाहीं कोणें जाणीं ।
बहुता काळींचें हें क्षेत्र । सकाळ देवांचें माहेर ।
सकळ संतांचें निजमंदिर । पंढरपूर ॥
देवासी तो पुरे एक प्रेमभाव । पूजा अर्चा वाव सर्व जाणा ।
हरिभक्तीचें सुख जे नर नेणती । त्यांसि भक्तिपदप्राप्ति कैंवि होय ।
सर्वभूतीं भगवद्भाव । तंव तो भावचि झाला देव ।
एका जनार्दनीं नैराश्य तो धन्य । ज्यासी नारायण सांभाळितु ।
जो जो धरसील भाव, तें तें देईल देव । ये अर्थी संदेह मानूं नको ।
पोटासाठीं लागे नीचाचियां पायां । करीना भलीया नमस्कार ।
सज्जनांचा धर्म सर्वांभूतीं दया । भेदाभेद तयां न कळे कांहीं ।
संतांचा तो धर्म अंतरीं ती शांति । एकाजनार्दनीं वस्ती सर्वांठायीं ।

वेदवाणी देवें केली। येर काय चोरापासून झाली।
भजन चालिलें उफराटें। कवण जाणे खरें खोटें।
एका जनार्दनीं अनुभवावांचोनी। कोरडी ती कहाणी ब्रह्मज्ञान
कलिमाजी दैवतें उघड दिसती फार।
नारळ आणि शेंदूर यांचा भडिमार।
येउनी नरदेहा भूतातें पूजिती। परमात्मा नेणती महामूर्ख।
हृदयींच देव हृदयींच भक्त। हृदयींच होत पूजा सर्व।
झाली संध्या संदेह माझा गेला। आत्माराम हृदयीं प्रकाशला।
त्यागुनीया स्त्री संन्यासी जे होती। पतनातें जाती अंतकाळीं।
एकाजनार्दनीं संकल्पाचा त्याग। सुखें संन्यास मग घ्यावा आधीं।
दुजेंपण नको पाहूं सर्वांठायीं। एकरूप देहीं देव दिसे।
गेलिया देहासी देह अहंता। मग जगही ब्रह्म स्वभावता।
जेथें सत्त्वाचें प्राधान्य। जेथें सात्विकाचें आचरण।
तो परलोक साधून। साधुनि गेला।
पाहला तो दिन हरिखाचा आम्हां।
सर्वांभूतीं अभिन्न सदा देखों श्रीरामा।
उत्तम पुरुषाचें उत्तम लक्षण। जेथें भेदशून्य सकळहि।
सर्वांभूतीं देव वसे। नीचाठायीं काय नसे।
एकाजनार्दनीं बोधु। यातिकुळींचा फिटला संबंधु।
सूर्याचे उदयीं अंधार हा नासे। तैसें ज्ञानें नासे अज्ञान सर्व।
गुरुकृपा भागीरथी। यमुना निजशांति।
स्वानुभव सरस्वती। गुप्त वाहे।
देह हें उखळ, मन हें मुसळ। कांडिले तांदुळ विवेकाचे।
रयतेचें फार हित करावें। धन्याचे कामासी रुजू असावें।
धनीसेवेसी तत्पर व्हावें। लागतें कीं जी मायबाप।
झाडाला बाकी तर तुम्ही व्हाल सुखी। हें सत्य तिहीं लोकीं॥

॥ समाप्त ॥

REFBK-0008913
REFBK-0008913
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८९१३